CMYK




सोलापूर
SOLAPUR TARUN BHARAT
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, ३० नोव्हेंबर २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४२ वे अंक १५ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



ग्रामीण जीवनात विकासाच्या दृष्टीने सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजनीतिक बाबींमध्ये नवे विचार आणणे आणि ते रुजविणे आवश्यक आहे. लोक ऐहिक चंगळवादाने भारलेले आहेत, जात, पंथ यात विभागले गेले आहेत. काळानुरूप नव्या जाणिवांनी त्यांना प्रेरित करून त्यांच्यामध्ये एकात्मता आणणे हे नितांत गरजेचे आहे.

**भारतरत्न नानाजी देशमुख**
संस्थापक, दीनदयाल शोध संस्थान

## महत्त्वाचे

### आरबीआयने एचडीएफसीला ठोठावला ९१ लाखांचा दंड

**नवी दिल्ली** : भारतीय रिझर्व्ह बँकेनं बँकिंग नियमन कायद्याच्या काही नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल एचडीएफसी बँकेवर ९१ लाख रुपयांचा दंड ठोठावला आहे. हा दंड खासगी क्षेत्रातील बँकेवर केवायसी संबंधित कायदेशीर आणि नियामक दायित्वांमधील त्रुटींसाठी लावण्यात आला आहे. हा दंड बँकेवर बँकिंग नियमन कायद्याच्या काही नियमांचे उल्लंघन करणे, कर्जावरील व्याजदराशी संबंधित अटींचे पालन न करणे, वित्तीय सेवांसाठी जोखीम व्यवस्थापन आणि आचारसंहितेच्या मार्गदर्शक तत्त्वांचे तसेच केवायसीशी संबंधित काही निर्देशांचे पालन न केल्यामुळे लावण्यात आला असल्याचे रिझर्व्ह बँकेने स्पष्ट केले आहे. ३१ मार्च २०२४ पर्यंत बँकेच्या आर्थिक स्थितीनुसार बँकेचे देखरेख मूल्यांकन करण्यासाठी वैधानिक तपासणी करण्यात आली होती.

# भारताचा अमेरिकेसोबत आठ हजार कोटींचा करार

### नौदलासाठी खरेदी करणार हेलिकॉप्टर, क्षेपणास्त्रे, रडार प्रणाली
### चीनच्या आक्रमकतेला प्रत्युत्तर, द्विपक्षीय संबंध बळकट करणार





◆ **नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**


हिंद महासागर क्षेत्रातील चीनच्या वाढत्या प्रभावाला प्रत्युत्तर आणि सागरी शक्तीला बळकट करण्यासाठी भारताने अमेरिकेसोबत ७,९९५ कोटींचा संरक्षण करार केला. या करारांतर्गत नौदलासाठी २४ एमएच-६० आर सीहॉक रोमियो हेलिकॉप्टर, क्षेपणास्त्रे, रडार प्रणाली आणि पाणबुडींची खरेदी करण्यात येणार आहे. द्विपक्षीय संबंध बळकट करणे आणि नौदलाची क्षमता वाढविणे हा या कराराचा उद्देश आहे.

अमेरिकेने भारतावर लादलेल्या ५० टक्के शुल्कानंतर हा तिसरा करार आहे. संरक्षण मंत्रालयाने जारी केलेल्या निवेदनात म्हटले की, संरक्षण सचिव राजेश कुमार सिंह यांच्या उपस्थितीत राजधानी दिल्ली येथे करारावर स्वाक्षरी करण्यात आली. नौदलासाठी २४ एमएच-६० आर सीहॉक रोमियो हेलिकॉप्टरचा पुरवठा आणि देखभालीशिवाय रडार प्रणाली, क्षेपणास्त्रे आणि पाणबुडीच्या खरेदीसाठी अमेरिकेसोबत शनिवारी ७,९९५ कोटी किंमतीचा संरक्षण करार करण्यात आला. हा करार नौदलाची ऑपरेशनल क्षमता वाढवेल, तसेच धोरणात्मक भागीदारी मजबूत करण्यासाठी महत्त्वाचा असेल. अमेरिका २४ एमएच-६० आर सीहॉक रोमियो हेलिकॉप्टरच्या देखभालीसाठी पाच वर्षांपर्यंत मदत करणार आहे. भारतीय नौदलाने २०२० मध्ये अमेरिकेकडून २४ मल्टी-रोल हेलिकॉप्टर्स खरेदी केले. यासाठी २.४ अब्ज डॉलर्सचा खर्च करण्यात आला. आतापर्यंत यापैकी पंधरा हेलिकॉप्टर नौदलात समाविष्ट करण्यात आले. प्रगत पाणबुडीविरोधी युद्धासह विविध आधुनिक लष्करी मोहिमांसाठी अमेरिकेकडून खरेदी केलेल्या हेलिकॉप्टरची मदत होणार आहे. हा करार २०२५ ते २०३० पर्यंत वैध असेल. (वृत्तसंस्था)

### देशातच होणार देखभाल, दुरुस्ती


अमेरिकेकडून खरेदी करण्यात येणाऱ्या संरक्षण उपकरणांची देखभाल आणि दुरुस्ती भारतातच होणार आहे. यासाठी सुविधांचा विकास करण्यात येईल आणि यामुळे स्वदेशी क्षमतांचा विकास होईल, तसेच अमेरिकेवरील अवलंबित्व कमी होणार आहे. हा करार सरकारच्या आत्मनिर्भर भारताच्या दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. यामुळे संरक्षण उत्पादन आणि सेवांमध्ये देशांतर्गत कंपन्यांना नवीन संधी देखील उपलब्ध होईल. हे हेलिकॉप्टर हेलफायर क्षेपणास्त्रे, टॉर्पिडो, सोनोबॉय आणि रडारने सुसज्ज आहेत.

### सागरी सुरक्षा होईल मजबूत



- २४ एमएच-६० आर सीहॉक रोमियो हेलिकॉप्टरची ऑपरेशनल उपलब्धता आणि देखभालक्षमता आणखी मजबूत होईल
- हेलिकॉप्टर सर्व हवामानात मोहीम राबवण्यासाठी सक्षम आहेत आणि शत्रूच्या पाणबुड्या शोधून त्यांना लक्ष्य करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज आहे
- नवीन करारामुळे, भारत-अमेरिका संरक्षण सहकार्य एका नवीन पातळीवर पोहोचले आहे आणि भारतीय नौदलाची सागरी सुरक्षा क्षमता मजबूत होईल
- करारांतर्गत, अमेरिका सीहॉक हेलिकॉप्टरसाठी सुटे भाग आणि सहाय्यक उपकरणे, वैमानिक आणि कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण आणि तांत्रिक सहाय्य प्रदान करेल.

# सर्वोच्च न्यायालय सरकारच्या दबावाखाली
# ...तर जिहाद पुकारला जाईल



**मौलाना महमूद मदनींची धमकी**

◆ **भोपाळ, २९ नोव्हेंबर**

जमियत-उलेमा-ए-हिंद या संघटनेचे अध्यक्ष मौलाना महमूद मदनी यांनी भोपाळ येथील कार्यक्रमात सर्वोच्च न्यायालयावर टीका करीत अत्याचार झाल्यास जिहाद पुकारला जाईल, अशी धमकी दिली आहे. मदनी यांच्या या विधानावर देशभरात टीकेची झोड उठली आहे.

देशात एका समुदायाला सातत्याने लक्ष्य केले जात आहे. देशातील ३० टक्के नागरिक मुस्लिमांच्या विरोधात आहेत. एकाच समुदायाला सातत्याने लक्ष्य केले जात आहे आणि असेच सुरू राहिल्यास जिहाद पुकारला जाईल, अशी धमकी दिली. सरकार आणि न्यायालयाकडून अल्पसंख्यकांना घटनेत दिलेले अधिकार डावलले जात आहेत. बाबरी मशीद प्रकरण असो की तीन तलाक, न्यायालय सरकारच्या दबावाखाली काम करीत असल्याचे दिसते. सर्वोच्च न्यायालयाला सर्वोच्च तेव्हाच म्हटले जाईल जेव्हा संविधानाचे संरक्षण होईल, असे विधान मदनी यांनी केले. भारतात लोकशाही व्यवस्था असल्याने कुणालाही हिंसा करता येणार नाही. येथील मुस्लिम संविधानाचे पालन करतात आणि नागरिकांच्या अधिकारांचे रक्षण करण्याची जबाबदारी सरकारची आहे, हे सांगण्यासही ते विसरले नाहीत. जमियत-उलेमा-ए-हिंदच्या राष्ट्रीय नियामक मंडळाची महत्त्वाची बैठक भोपाळ येथे झाली. बैठकीला मोठ्या संख्येने संघटनेचे सदस्य उपस्थित होते. विश्व हिंदू परिषदेचे राष्ट्रीय प्रवक्ते विनोद बन्सल यांनी मदनी यांच्या विधानावर टीका केली. (वृत्तसंस्था)

### जिहादबाबत चुकीची धारणा

जिहादबाबत सार्वजनिकरीत्या जे बोलले जात आहे ते चुकीचे आहे. कारण जिहाद हा शब्द पवित्र आहे. परंतु, सध्या लव्ह जिहाद, लॅण्ड जिहाद, थूक जिहादसारखे चुकीचे शब्द वापरले जात आहेत. जिहाद हा पवित्र शब्द होता आणि नेहमीच राहील. मात्र, प्रसारमाध्यमे आणि सरकार जिहादचा चुकीचा अर्थ लावत आहे, असा आरोप मदनी यांनी केला.

### न्यायालयाने स्वत:हून दखल घ्यावी : संबित पात्रा

मौलाना महमूद मदनी यांचे वक्तव्य अत्यंत चुकीचे आणि बेजबाबदार आहे. जिहादच्या नावाखाली केवळ भारतातच नव्हे तर जगभरात दहशतवाद पसरविला जात आहे. मदनी यांचे विधान स्फोटकच नव्हे तर देशाला विभाजनाकडे नेणारे आहे. सुप्रीम कोर्टावरही त्यांनी टीका केली आहे. त्यामुळे या विधानाची सुप्रीम कोर्टाने स्वत:हून दखल घेतली पाहिजे, असे भाजपचे खासदार संबित पात्रा यांनी म्हटले आहे.

# वर्षभरात ११८ पाकिस्तानी चौक्या केल्या नष्ट

◆ **नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

२०२५ या वर्षात आतापर्यंत सीमा सुरक्षा दलाच्या जवानांनी पाकिस्तानच्या ११८ चौक्या उद्ध्वस्त केल्या, असे सीमा सुरक्षा दलाच्या जम्मू फ्रंटियरचे महानिरीक्षक शशांक आनंद यांनी सांगितले.

ऑगस्ट-सप्टेंबरमधील पुरात खराब झालेले अँटी-इनफिल्ट्रेशन ग्रिड एका महिन्यात पूर्ववत करण्यात आले. तसेच ते दोन ते तीन पटीने मजबूतही करण्यात आले. ऑपरेशन सिंदूरमध्ये दोन जवान शहीद झाले तर एक जवान प्रगवालमध्ये ड्युटीवर असताना नदीत बुडाला पण त्याने आपली पोस्ट सोडली नाही. हे दर्शवते की सीमा सुरक्षा दल जवानांसाठी देश सर्वोपरी आहे, असे ते म्हणाले. शनिवारी जम्मू येथील सीमा सुरक्षा दल कॅम्पसमध्ये आयोजित वार्षिक पत्रकार परिषदेत ते सहभागी झाले होते. (वृत्तसंस्था)



दितवाह चक्रीवादळाने श्रीलंकेत प्रचंड नुकसान केले. हे वादळ आता भारताच्या दिशेने निघाले आहे. नुकसान टाळण्यासाठी मच्छिमारांनी आपल्या बोटी चेन्नई येथील कासिमेडू बंदरात नांगरून ठेवल्या आहेत.





# मूळ अभ्यास व अनुभूती घेऊनच साहित्य सृजन करा

### डॉ. मोहनजी भागवत यांचे आवाहन ● पुस्तक महोत्सवात 'भारत बोध' सत्रात युवा लेखक संवाद

◆ **नागपूर, २९ नोव्हेंबर**

मूळ अभ्यास व अनुभूती घेऊनच साहित्याचे सृजन करा, आपले साहित्य मानवाला घडवणारे असू द्या, जनकल्याणाचा भाव त्यात असू द्या, असे आवाहन रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी केले.

नॅशनल बुक ट्रस्टच्यावतीने महाराष्ट्र शासन व झिरो माईल यूथ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने रेशीमबाग मैदानावर आयोजित पुस्तक महोत्सवात सकाळी 'भारत बोध : युवा लेखक संवाद' सत्र झाले. महाराष्ट्रासह देशातील विविध भागांतून आलेल्या सुमारे ३०० युवा लेखकांचा सहभाग होता. रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, राष्ट्रीय पुस्तक न्यासचे अध्यक्ष प्रो. मिलिंद मराठे व झिरो माईल फाऊंडेशनचे संचालक प्रशांत कुकडे व्यासपीठावर होते.



साहित्य सृजनता हा लेखकांचा स्वभावधर्म आहे. ते शब्दसृष्टीचे ईश्वर आहेत. शब्दाचा वापर त्यांनी चुकीचा केला तर त्याचे परिणाम उलट होतात. म्हणूनच लेखक जे लिहितात ते समाजहितकारीच असावे, ही श्रद्धा कायम आहे. त्यामुळेच त्या सर्व मानवहितकारी लेखकांना कृतज्ञतापूर्वक अभिवादन करतो, असे विचार रा. स्व. संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत यांनी प्रारंभीच व्यक्त केले.

सरसंघचालक म्हणाले की, स्व-हिताचे सारथ्य करणारे व मानवाला उन्नत करणारे सृजन म्हणजे साहित्य होय. त्यामुळे लेखकाच्या शब्दांचा परिणाम सर्वांनाच भोगावयास मिळतो. आपल्याकडील साहित्य विभिन्न प्रादेशिक भाषांमध्ये भावांतरित होत असतानाच ते आता विदेशी भाषांमध्ये भाषांतरित होण्याची गरज आहे.

आपल्याकडील भाव कुठल्याही 'इझम'मध्ये बंदिस्त नाही. म्हणूनच राष्ट्र हा आपल्यासाठी वादाचा विषय कधीच ठरत नाही. लेखन करण्यापूर्वी खरा इतिहास जाणून घ्यायला हवा. लेखनाचा भाव मनुष्याच्या हिताचा आहे की नाही, याचा विचार व्हावा. ज्या भाषेत लेखन करतो त्यातील शब्द भाव पोहोचविणारे हवेत. भावना असावी व त्यावर चित्ताचे नियंत्रण असावे. पुरस्काराची आस ठेवून लिहू नका. 'खूप छान लिहिले आहे' असे ऐकणे हाच पुरस्कार आहे, याकडे डॉ. मोहनजींनी युवा लेखकांचे लक्ष वेधले.

प्रारंभी डॉ. भागवत यांच्या हस्ते पीएम युवा लेखक अमरावतीचे श्रेयस कोल्हेकर यांचा सत्कार करण्यात आला.

रा. स्व. संघाचे विदर्भ प्रांत सहसंघचालक श्रीधर गाडगे, संपर्क प्रमुख अरविंद कुकडे, महानगर संघचालक राजेश लोया, सुष्मिता सिंह, समय बनसोड व कल्याण देशपांडे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. (तभा वृत्तसेवा)

### 'ग्लोबलायझेशन' शुद्ध भ्रम

युवा लेखक संवादात ४८ युवा लेखकांकडून प्रश्न प्राप्त झाले होते. निवडक प्रश्नांची उत्तरे डॉ. भागवत यांनी दिली. त्यांत एआय, आधुनिक शिक्षण प्रणाली, वैश्वीकरण, डिजिटल युग, जेन झी, इतिहास या विषयांचा समावेश होता. डॉ. मोहनजी भागवत यांनी युवा लेखकांना कनेक्ट करण्याचा प्रयत्न केला. 'ग्लोबलायझेशन' हा शुद्ध भ्रम असून एकमेकांवर आपले मत थोपवण्याचा प्रयत्न आहे. म्हणूनच प्रत्येक देश एकमेकांसोबत युद्ध करत असल्याचे दिसते. 'ग्लोबलायझेशन'मुळे कम्युनिकेशन व दळणवळण सोपे झाले. परंतु, जवळ येण्याचा भाव निर्माण झालेला नाही. 'वसुधैव कुटुंबकम्' हा आपला भाव सनातन आहे व त्याच दृष्टीने आपणा लेखकांना कार्य करायचे असल्याचे ते म्हणाले. 'जेन-झी'ने राष्ट्राची परंपरा मूळ स्रोतातून जाणून घेण्याचे आवाहन सरसंघचालकांनी केले.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे...




### शेतकऱ्यांना समस्या निवारण्यासाठी संभाजी ब्रिगेडकडून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील शेतकरी बांधवांच्या विविध समस्या निवारण्यासाठी येथील संभाजी ब्रिगेडच्या वतीने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांना निवेदन देण्यात आले. महाराष्ट्रामध्ये शेतकऱ्यांच्या आत्महत्येचे प्रमाण जास्त असताना त्यात शासनही शेतकऱ्यांना आणखी अडचणीत आणत आहे. कृषी खात्यात चौकशी केली असता फळबाग लागवड योजनेसाठी मिळणारे अनुदान मिळत नाही म्हणाल्यावर कृषी खात्याकडे निधी उपलब्ध नसल्याचे सांगून उडवाउडवीचे उत्तर दिले जात आहे. यामुळे जिल्हाधिकाऱ्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणी दूर कराव्यात अशी मागणी करण्यात आली आहे. याप्रसंगी संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले, महानगरप्रमुख जगदाळे, महिला आघाडी जिल्हाध्यक्ष मीनल दास, वकील आघाडीचे जिल्हाध्यक्ष कदम, शहराध्यक्ष मनीषा कोळी, जिल्हा कार्याध्यक्ष शेखर भोसले, उद्योग आघाडी शहर अध्यक्ष संतोष सुरवसे,जिल्हा सचिव सिद्धाराम सावळे, शहर कार्याध्यक्ष सतीश वावरे उपस्थित होते.



### माजी विद्यार्थ्यांनी पालटले महावीर हायस्कूलचे अंतरंग आणि बहिरंग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

विकास नगर येथील महावीर हायस्कूलचे माजी विद्यार्थ्यांनी शाळेचे अंतरंग आणि बहीरंग पालटले. गुरुदक्षिणा किंवा शाळेच्या ऋणातून मुक्त होण्यासाठी किंवा आपण या शाळेसाठी काहीतरी करू शकतो या उद्देशाने सन २००१ - २००२ चे माजी विद्यार्थिनी डॉ. अचला अरुण कांबळे हिने आई स्वर्गीय सौ. सुनीता अरुण कांबळे यांच्या स्मृती प्रित्यर्थ शाळेच्या संपूर्ण बाह्य भागाचे रंग रंगोटीचे काम करून दिले. यासाठीच्या संपूर्ण खर्चाचा भाग डॉ. अर्चना हिने एकटीच उचलली.डॉ. अचला कांबळे हिचे वरील उत्कृष्ट कार्य पाहून २००३-२००४ चे माजी विद्यार्थ्यांनी मिळून एकूण २० वर्ग खोल्यांचे आतील भागाचे रंगरंगोटी करून दिलेले आहेत. या कामासाठी मुख्याध्यापिका उज्वला पाटील सहशिक्षक विजय पाटील, राजेंद्र खोत, संजय बिडवाई, बसवराज बिराजदार, मनीषा निनगुरकर, शिक्षकेतर कर्मचारी दीपक चौधरी, आनंद कोटे, महेश म्हंता, मोहन साळुंखे यांनी परिश्रम घेतले.

### २ व ३ डिसेंबरला आठवडे बाजार बंद

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र यांनी राज्यातील २४६ नगरपरिषदा व ४२ नगरपंचायतींमधील सार्वत्रिक निवडणुकांसाठी प्रत्यक्ष निवडणूक कार्यक्रम २०२५ दि. ४ नोव्हेंबर रोजी घोषित केला आहे. निवडणूक कार्यक्रम जाहीर केल्याच्या दिनांकापासून आदर्श आचारसंहिता अंमलात आलेली आहे. ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोग महाराष्ट्र राज्य यांचेकडील प्राप्त निर्देशानुसार मतदाना दिवशी मतदान केंद्राच्या परिसरात कायदा व सुव्यवस्थेच्या अंमलबजावणीच्या अनुषंगाने आवश्यक त्या सर्व उपाययोजना करुन मतदान प्रक्रिया निष्पक्ष वातावरणात पार पाडणे आवश्यक असल्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. सार्वत्रिक नगरपरिषद / नगरपंचायत निवडणूक २०२५ च्या जाहीर कार्यक्रमानुसार सोलापूर ग्रामीण जिल्ह्यातील मतदान दि. २ डिसेंबर व मतमोजनी दिनांक ३ डिसेबर रोजी असल्याचे जाहीर करण्यात आले आहे व यास अनुसरुन सोलापूर ग्रामीण जिल्ह्यात मतदाना दिवशी वार मंगळवार दि. २ डिसेंबर व मतमोजनी दिवश बुधवार दि.३ डिसेबर खालील तक्त्यात नमुद नगरपरिषद/नगरपंचायत हद्दीतील आठवडा बाजार भरविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुसार जिल्हादंडाधिकारी, कुमार आशीर्वाद यांच्या अधिकारान्वये महाराष्ट्र पोलीस अधिनियम, कलम ३७(३) व दि. मार्केट ॲण्ड फेअर ॲक्ट १८६२ मधील कलम ५ (ग) अन्वये प्राप्त अधिकाराचा वापर करुन, सार्वत्रिक नगरपरिषद, नगरपंचायत निवडणूक- २०२५ च्या अनुषंगाने मतदान केंद्राच्या परिसरात आठवडा बाजार दि.२ व ३ डिसेंबर रोजी भरविण्यास मनाई करण्याचा आदेश देण्यात आले आहेत.

# धरमसी लाईन येथे २ कोटींचा निधी वितरित

## राष्ट्रवादीचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या हस्ते विकासकामांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**




धरमसी लाईनसह परिसरात संतोष पवार यांच्या माध्यमातून विकास झालेला आपण पाहत आहोत, असे गौरोवद्गार विधानसभेचे उपाध्यक्ष आणि राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी काढले. धरमसी लाईन येथील विविध विकासकामांचे उद्घाटनप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले, राज्यात महायुतीचे सरकार असताना प्रत्येक पक्षाचे बलाबल जास्त असल्याने निवडणूक स्व:बळावर निवडणूक लढविणार आहे. काही ठिकाणी मैत्रीपूर्ण लढत होईल.

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार म्हणाले, सोलापूर शहराच्या विकासासाठी राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी कोट्यवधींचा निधी दिला आहे. आणखी विकास कामांसाठी लागणाऱ्या निधीची कम तरता पडू देणार नाही, अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. जिल्हाध्यक्ष या नात्याने आपण स्वतः आणि कार्याध्यक्ष जुबेरभाई बागवान यांनी धरमसी लाईन येथे विविध विकास कामासाठी सुमारे २ कोटी ६० लाखांचा निधी मंजूर केला आहे. प्रभाग क्रमांक ७ मधील धरमसी लाईन येथील अंतर्गत ड्रेनेज लाईन काम पूर्ण झाले असून यासाठी सुमारे ३५ लाख निधी मिळाला आहे. येथील अंतर्गत पिण्याच्या पाईपलाईनसाठी १५ लाखांचा निधी मिळाला आहे. तसेच सभागृहाच्या बांधकामासाठी २५ लाखांचा निधी मिळाला आहे. अंतर्गत सिमेंट रस्त्याच्या कामासाठी सुमारे ६५ लाख रुपयांचा निधी मिळाला आहे.

धरमसी लाईन येथील अंतर्गत उर्वरित ट्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी २७ लाख मंजूर झाले आहेत. मनोहर नगर अंतर्गत ड्रेनेज लाईनच्या कामासाठी ४८ लाख रुपये मंजूर झाले असून येथीलच अंतर्गत सिमेंट रस्त्यासाठी आणखी ५ लाख रुपये मंजूर झाले आहेत. आ. विजयकुमार देशमुख यांच्या माध्यमातून प्रभाग क्रमांक ७ मधील धरमसी लाईन येथे अंतर्गत सिमेंट रस्त्यासाठी ३० लाख तसेच अंतर्गत उर्वरित पाण्याच्या पाईपलाईन टाकण्याच्या कामासाठी १० लाखांचा निधी मंजूर झाला आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार, आमदार विजयकुमार देशमुख यांच्या माध्यमातून सुमारे २ कोटी ६० लाखांच्या निधी मंजूर करण्यात आले. यावेळी राजन जाधव, जुबेर बागवान, किसन जाधव, आनंद चंदनशिवे, संगीता जोगधनकर, नूतन गायकवाड, चित्रा कदम, महेश गाडेकर, प्रमोद भोसले, प्रकाश जाधव, अनिकेत पवार, शाम गांगर्डे, बालाजी मास उपस्थित होते.

# भंडारकवठेच्या एसटी बस फेऱ्या वाढवण्यात आल्या

## सरपंच बबलेश्वर; शाळेच्या विद्यार्थ्यांची सोय

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील भंडारकवठे गावाला येणाऱ्या एसटी बस फेऱ्या कमी केल्यामुळे प्रवाशांसह शाळेच्या विद्यार्थ्यांची गैरसोय झाले होते. म्हणून सोलापूर एसटी आगाराच्या ठिकाणी आंदोलन करण्याचा इशारा दिल्यानंतर सोलापूर आगाराकडून एसटी फेऱ्या वाढविण्यात आले असून शाळेच्या विद्यार्थ्यांच्या प्रवासाची सोय झाल्याचे भंडारकवठेचे सरपंच भीमाशंकर बबलेश्वर यांनी सांगितले. त्यामुळे भंडारकवठे ग्रामस्थांनी राज्य परीवहन महामंडळाच्या निर्णयावर समाधान व्यक्त केला आहे.

भंडारकवठे दक्षिण सोलापूर तालुका व भीमा नदीकाठावरील मोठे गाव. सोलापूरसह इतर ठिकाणी ये जा करणाऱ्या प्रवाशी अधिक असल्याने परीवहन महामंडळाकडून एसटी फेऱ्या वाढविण्यात आले. त्यामुळे येथील नागरीकांनी खासगी वाहनांच्या प्रवासावर बहिष्कार टाकून एसटीने प्रवास सुरू केला. त्यामुळे या परीसरातील फेऱ्या फायद्यात असताना आगाराकडून एक महिन्यापूर्वी अचानक फेऱ्या कमी करण्यात आले. त्यामुळे शाळा व महाविद्यालयाला जाणाऱ्या विद्यार्थी व प्रवाशांचे हाल होत असल्याने सरपंच बबलेश्वर यांनी आगारप्रमुखांना निवेदन देऊन एसटी फेऱ्या वाढविण्याची मागणी केली होती. शिवाय एसटी फेऱ्या सुरळीत न झाल्यास आंदोलन करण्याचा इशाराही दिला होता. त्याची दखल घेऊन सोलापूर आगाराकडून

फेऱ्या वाढवून विद्यार्थी व प्रवाशांची सोय केल्याने सरपंच व नागरीकांनी एसटी महामंडळाचे आभार मानले आहेत.



## जय भारत शाळेत महात्मा फुले यांची पुण्यतिथी साजरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

जय भारत प्राथमिक शाळेत क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सचिव दिपक फुले होते. तर प्रमुख पाहुणे चेअरमन सिद्राम फुले, मुख्याध्यापक नारायण सूर्यवंशी उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरवात महात्मा फुले यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.

यावेळी संकेत गायकवाड, संदेश गवळी, संस्कृति आसादे या विद्यार्थ्यांनी भाषण केले. प्रास्ताविक रेश्मा म्हेत्रे यांनी केले तर सूत्रसंचालन किरण गाटे यांनी केले. आभार भाऊसाहेब गवळी यांनी मानले.

# आर्थिक फसवणुकीबद्दल जागृती करण्यासाठी कार्यशाळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**



मायक्रोफायनान्स इंडस्ट्री नेटवर्कने सोलापूर जिल्ह्यात एमएफआयएन अंतर्गत वाढत्या आर्थिक फसवणुकींबद्दल लोकांना जागृत करण्यासाठी मायक्रोफायनान्सच्या कार्यशाळेचे आयोजन केले होते. यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे प्रबंधक राम वाखरडे, पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, पोलीस निरीक्षक पेटकर, देवदत्त शहापूरकर (प्रादेशिक प्रमुख, महाराष्ट्र, गुजरात आणि गोवा राज्ये, एमएफआयएन) आणि सायबर तज्ञ अविनाश पाटील उपस्थित होते.

जिल्हा अग्रणी बँकेचे वाखरडे यांनी सांगितले की, नागरिकांनी योग्य बजेट आणि खर्च नियोजन करण्याची गरज असून, आरबीआय-मान्यताप्राप्त संस्था, एमएफआय, आरबीआयच्या सूचना आणि मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करत आहेत. कर्जदारांनी कर्जमाफीबाबत कोणत्याही चुकीच्या माहितीला बळी पडू नये आणि दिशाभूल होऊ नये, कारण त्याचा त्यांच्या क्रेडिट रेटिंगवर परिणाम होईल; यामुळे ते आरईसाठी भविष्यातील कर्ज मिळविण्यास अपात्र ठरतात.

पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, आर्थिक साक्षरता कार्यक्रम समाजातील सामान्य स्तरातील लोकांना आणि दुर्गम भागात राहणाऱ्या लोकांना वित्तीय सेवांशी जोडण्याचा आणि त्यांना आर्थिक व्यवहार, गुंतवणूक, विमा आणि फसवणूक कशी टाळायची याबद्दल जागरूक करण्याचा प्रयत्न आहे. आर्थिक फसवणूक कशी टाळायची याबद्दल लोकांमध्ये जागरुकता वाढवण्याची वेळ आली आहे. दिशाभूल करणाऱ्या मोहिमांबद्दल सावधगिरी बाळगली पाहिजे. एमएफआयएनचे प्रतिनिधी देव शहापूरकर यांनी सांगितले की, एमएफआयएन भविष्यातही असे कार्यक्रम आयोजित करण्याची योजना आखत आहे. याचा फायदा सर्वसामान्य नागरिकांनाच नाहीतर सर्वांनाच होणार आहे.

# पूल पाडकामा दरम्यान नागरिकांना त्रास होऊ नये

## खा.प्रणिती शिंदे; बैठकीत रेल्वे अधिकाऱ्यांना दिले निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**



रेल्वे पूल पाडकामापूर्वी वाहतूक आराखड्याचा खा.प्रणिती शिंदे यांची रेल्वे अधिकाऱ्यांसोबत बैठक घेण्यात आली. पूल पाडकामाच्या दरम्यान नागरिकांना कोणताही त्रास होऊ नये, यासाठी पर्यायी मार्ग व्यवस्थित, सुरक्षित आणि व्यवहारी असावा. असे निर्देश खासदार प्रणिती शिंदे यांनी प्रशासनाला दिले.

अण्णाभाऊ साठे भैय्या चौक ते मरीआई चौक येथील रेल्वे पूल १४ डिसेंबर २०२५ रोजी पाडण्यात येणार असून या कामामुळे १ ते १.५ लाख नागरिकांच्या दळणवळणाचा मोठा प्रश्न निर्माण होणार आहे. या पार्श्वभूमीवर पर्यायी मार्गांची आखणी व नागरिकांना होणाऱ्या गैरसोयींचा आढावा घेण्यासाठी खासदार प्रणिती शिंदे यांनी शुक्रवारी बैठक घेण्यात आली.


यासाठी खा. प्रणिती शिंदे यांनी मरीआई चौक ते नागनाथ मंदिर मार्ग ते रेल्वे स्टेशन आवारातील मागील रस्ता ते इराण्णा वस्ती ते मोदी अंडरपास ते मोदी पोलिस चौकी असा मार्ग सुचवला. प्रशासनाने या मार्गाला सकारात्मक प्रतिसाद देत तातडीने आवश्यक नियोजन करण्याचे आश्वासन दिले.

बैठकीनंतर खासदार प्रणिती शिंदे यांनी रेल्वे व महानगरपालिका अधिकाऱ्यांसमवेत प्रत्यक्ष पर्यायी मार्गाची पाहणी केली. मार्गावरील अडथळे, गर्दीचे ठिकाणे, सुरक्षिततेच्या उपाययोजना यासंदर्भात काही महत्त्वाच्या सूचना प्रशासनाला देण्यात आल्या.

बैठकीस सोलापूर विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजीत मिश्रा, महानगरपालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक योगेश पाटील, काँग्रेस शहर अध्यक्ष चेतन नरोटे, सामाजिक कार्यकर्ते माऊली पवार, माजी नगरसेवक विनोद भोसले, युवक काँग्रेस अध्यक्ष गणेश डोंगरे, नगर अभियंता सारिका अकुलवार उपस्थित होते.

# पद्मशाली सखी संघमतर्फे कर्तृत्ववान महिलांचा ३१ जानेवारीला गौरव

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**



श्री मार्कंडेय सोशल फाउंडेशन संचलित, 'पद्मशाली सखी संघम'च्या वतीने पद्मशाली समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सत्कार दि. ३१ जानेवारी रोजी पद्मशाली समाजाचे कुलदैवत महर्षी चिरंजीव श्री मार्कंडेय महामुनी यांच्या जन्मोत्सवाचे औचित्य साधून करण्यात येणार असल्याची माहिती संस्थापक गौरीशंकर कोंडा, पद्मशाली सखी संघमच्या अध्यक्षा कल्याणी पेनगोंडा, सचिवा रुचिरा मासम, कार्याध्यक्षा सविता येदूर यांनी दिली.

पद्मशाली समाजात विवाहित महिला उद्योग व व्यवसाय करण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील आहेत. तर काही महिला घरातून, हातगाडी, शॉप्स आदींच्या सहाय्याने छोट्या उद्योगातून मोठ्या उद्योग, व्यवसायात प्रगती करणाच्या प्रयत्नात आहेत. सोलापूरसह महाराष्ट्र आधी राज्यातील पद्मशाली समाजाच्या महिलांना पुरस्कार देउन गौरविण्यात येईल.

पुरस्काराचे स्वरुप स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र, सोलापूरी टेरी टॉवेल, पुष्पगुच्छ असे राहील. यासाठी नांवे सूचवण्यासाठी किंवा प्रस्ताव पाठवण्यासाठी पद्मशाली महिलांनी व समाज बांधवांनी आपल्या निदर्शनास आलेल्या महिलांचे नावे, माहिती, मोबाईल क्रमांकासह ९०२१५५१४३१ या क्रमांकाच्या व्हाटस्पवर किंवा वर्षा रबर स्टॅम्प १३०४, भद्रावती पेठ, सोलापूर- ४१३००५ या पत्त्यावर पाठवावेत, असे आवाहन सहसचिव वनिता सुरम, श्रावणी कनकट्टी, खजिनदार गीता भूदत्त, सहखजिनदार हेमा मैलारी, समन्वयिका पल्लवी संगा, ममता तलकोकूल आणि भाग्यलक्ष्मी तुम्मा यांनी केले आहे.

# शासन निर्णयाची पायमल्ली करणारे पत्र रद्द करा

## शिक्षक सहकार संघटनेची मुख्यमंत्र्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

राज्यातील अतिरिक्त झालेल्या प्राथमिक शिक्षकांच्या समायोजना संदर्भात २० नोव्हेंबर रोजी शिक्षण संचालयाने काढलेले पत्र तात्काळ रद्द करावे अशी मागणी शिक्षक सहकार संघटनेने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. १५ मार्च २०२४ शासन निर्णयान्वये सन २०२४- २५ च्या संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन ५ डिसेंबर पर्यंत करण्याचे आदेश शिक्षण संचालयाने राज्यातील सर्व जिल्हा परिषदेला दिले आहेत.

२० नोव्हेंबरच्या पत्रानुसार समायोजन करताना करताना तालुका स्तरीय समायोजन ,जिल्हास्तरीय समायोजन, विभाग स्तरीय समायोजनाचे तारखेनुसार वेळापत्रक दिले आहे. परंतु १५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयामध्ये मुद्दा क्रमांक ८ नुसार संचमान्यतेनुसार अतिरिक्त शिक्षकांचे समायोजन करताना शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय आणि महाराष्ट्र खासगी शाळा कर्मचारी नियमावली १९८१ मधील तरतुदी आणि त्या अनुषंगाने निर्गमित करण्यात आलेले प्रचलित निकष कायम राहतील असे सांगण्यात आले आहे. २० नोव्हेंबर २०२५ रोजी प्राथमिक शिक्षण संचनालय पुणे यांनी काढलेले पत्र वरील दिनांक १२ मे २०११ व दिनांक १५ मार्च २०२४ या दोन्ही शासन निर्णयाच्या विरुद्ध असून समायोजन करण्यापूर्वी पदोन्नती प्रक्रिया करूनच समायोजन करणे गरजेचे असताना शिक्षण संचालनालय पुणे यांनी काढलेल्या पत्रामध्ये पदोन्नती संदर्भात कुठलाच उल्लेख केला नाही. तसेच राज्यामध्ये सध्या नगरपरिषद निवडणुकीच्या आचारसंहिता लागू असून निवडणूक आचारसंहितेच्या काळात समायोजन न करण्याचे शासन निर्णयात नमुद केले आहे. त्यामुळे सदर पत्र रद्द करून सन २०२४ - २५ च्या अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनापूर्वी राज्यातील सर्व जिल्हा परिषदेमध्ये सध्या रिक्त असलेल्या विस्तार अधिकारी,केंद्रप्रमुख ,मुख्याध्यापक प्राथमिक पदवीधर या सर्व पदांची पदोन्नती करण्याचे वेळापत्रक तात्काळ जाहीर करून सर्व जिल्हा परिषदांना सदर पदांची पदोन्नती करायला लावावी व त्यानंतरच २०२४-२५ च्या संच मान्यतेनुसार अतिरिक्त झालेल्या शिक्षकांचे समायोजन करण्याचे आदेशित करावे अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनात करण्यात आली आहे. त्याचबरोबर आंतर जिल्हा बदलीचा सातवा टप्पा तात्काळ मार्गे लावा, टीईटी संदर्भात शासनाने केंद्र शासनाकडे ठोस भूमिका मांडून सर्वोच्च न्यायालय पुनर्विचार याचिका दाखल करावी,आंतरजिल्हा बदली झालेल्या शिक्षकांची मूळ सेवा धरण्यात यावी, संच मान्यतेत अतिरिक्त झालेल्या शिक्षकांच्या समायोजन दरवर्षींना करतात दर तीन वर्षांनी समायोजन करण्यात यावे.

१५ मार्च २०२४ संच मान्यतेचा शासन निर्णय ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांचे शैक्षणिक जीवन नष्ट करणार असून तो तात्काळ रद्द करण्याबाबत पुनर्विचार करावा या मागण्या निवेदनात करण्यात आल्या आहेत. निवेदनावर राज्याध्यक्ष संतोष पिट्टलवाड, राज्य सरचिटणीस निलेश देशमुख, राज्य कोषाध्यक्ष मनोज बनकर, राज्य कार्याध्यक्ष दिपक परचंडे, महिला राज्याध्यक्षा शुभांगी चौधरी, जिल्हाध्यक्ष रविंद्र जेटगी, जिल्हा उपाध्यक्ष सचिन निरगिडे यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# 'वात्सल्य' रोटरी ह्युमन मिल्क बँक ठरणार बालकांसाठी जीवनदायी : डॉ.ओंबासे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**




शहरातील माता व नवजात बालकांच्या आरोग्य संवर्धनासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या 'वात्सल्य' रोटरी ह्युमन मिल्क बँक, सोलापूर या अभिनव प्रकल्पाचा कार्यारंभ सोहळा पार पडला. महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, उपायुक्त आशिष लोकरे, वैद्यक अधिकारी डॉ. राखी माने, डॉ. वैशाली शिरशेट्टी, रोटेरियन सुनील दावडा, डॉ. बाळासाहेब शितोळे, डॉ. किरण सारडा, डॉ. जानवी माखिजा, संतोष भंडारी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

महापालिका आयुक्त डॉ सचिन ओंबसे म्हणाले की, सोलापूर महापालिका आणि रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थ यांच्या संयुक्त विद्यमाने संचालित होणारा हा उपक्रम शहरातील आरोग्य क्षेत्रातील क्रांतिकारक पाऊल ठरत असून, मातृदूधाची गरज भासणाऱ्या नवजात बालकांसाठी जीवनदायी ठरणार आहे. या उपक्रमामुळे नवजात शिशू मृत्यूदरात घट, आरोग्य जटिलता टाळणे, बालकांचे सर्वांगीण पोषण, तसेच मातृत्वाबद्दल सकारात्मकता निर्माण होईल, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

उपायुक्त आशिष लोकरे यांनी सांगितले की, वात्सल्य रोटरी ह्युमन मिल्क बँक मार्फत गरजू, अकाली जन्मलेली, कमी वजनाची किंवा गंभीर आरोग्यस्थितीतील नवजात बालकांना शास्त्रोक्त प्रक्रिया करून सुरक्षित, शुद्ध व पोषक मातृदूध उपलब्ध करून देण्यात येणार आहे. अनेक मातांना वैद्यकीय कारणांमुळे स्वतःचे दूध देणे शक्य नसते, अशा मातांसाठी व बालकांसाठी ही मिल्क बँक मोठा आधार ठरणार आहे.

डॉ. निहार बुरटे व सह-प्रमुख डॉ. मिलिंद शाह यांनी प्रकल्पाची कार्यपद्धती, प्रक्रिया, तांत्रिक सुधिा आणि भविष्यातील कार्ययोजना सविस्तर मांडली.

रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे अध्यक्ष संतोष सपकाळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, ''माता-बालकल्याण क्षेत्रात सोलापूर शहरास अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची सामाजिक बांधिलकी आहे.

ह्युमन मिल्क बँक हा प्रकल्प हजारो बालकांसाठी जीवनदायी ठरेल आणि रोटरीचा समाजोपयोगी कार्याचा वारसा पुढे नेईल.क्लबचे सचिव युगंधर जिंदे यांनी आभार प्रदर्शन केले.

# भारत लंकेच्या मदतीला

## एनडीआरएफचे जवान तैनात, मालवाहू विमाने सज्ज


श्रीलंकेची राजधानी कोलंबोमध्ये पाणीच पाणी साचले


मालवाहतूक विमानाद्वारे श्रीलंकेला पोहचविली मदत

◆ **नवी दिल्ली, २९ नोव्हेंबर**

दितवाह चक्रीवादळाचा फटका बसलेल्या श्रीलंकेच्या मदतीला भारत धावून गेला आहे. राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाचे ८० जवान लंकेत तैनात करण्यात आले आहेत. हवाई दलाच्या सी-१३० आणि आयएल-७६ या विमानातून हे जवान लंकेत पाठविण्यात आले आहेत. सोबतच मदत आणि शोध कार्यासाठी उपयोगी येणारे ८ टन साहित्यही रवाना केले. 'ऑपरेशन सागर बंधू ' अंतर्गत भारताने या शेजारी देशाला मानवीय मदत पाठविणे सुरू केले आहे.

चक्रीवादळाने संकटात आलेल्या लंकेच्या मदतीसाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'ऑपरेशन सागर बंधू 'ची घोषणा शुक्रवारी केली. २८ नोव्हेंबरच्या रात्रीच हिंडन हवाई तळावरून सी-१३० आणि आयएल-७६ ही विमाने मदत घेऊन कोलंबोकडे झेपावली. मदत साहित्याबरोबर २१ टन अन्य मदत सामुग्रीही पाठविण्यात आल्याचे हवाई दलाने म्हटले आहे. पुरात अडकलेल्यांना खाद्य सामुग्री आणि अन्य मदत वितरित केली आहे. या संकटाच्या काळात भारत लंकेसोबत असल्याचे हवाई दलाच्या अधिकाऱ्याने सांगितले. आयएनएस विक्रांत आणि आयएनएस उदयगिरी या युद्धनौकांवर तैनात असलेल्या विमानांनी मदत पोहचविणे सुरू केले आहे.

चक्रीवादळामुळे लंकेतील परिस्थिती बिकट झाली असून ३५ टक्के भूभागात वीज नाही. तसेच सततचा पाऊस आणि वादळामुळे वीज दुरूस्तीची कामे ठप्प पडल्याने जवळपास ७० लाख नागरिकांना याचा फटका बसला आहे. पायाभूत सुविधांचे मोठे नुकसान झाले आहे. आतापर्यंत १२३ नागरिकांचा मृत्यू झाला असून १३० बेपत्ता आहेत. हा आकडा वाढण्याची शक्यता आहे. जवळपास २ लाख नागरिकांना वादळाचा तडाखा बसला. कँडी प्रांतात सर्वाधिक नुकसान झाले असून येथे आतापर्यंत ५० जणांचा मृत्यू झाला. बादुला पर्वतीय भागातही ३५ नागरिकांचा मृत्यू झाला असून शेकडो बेपत्ता आहेत. ◂(वृत्तसंस्था)

### सर्वांत विध्वंसक चक्रीवादळ

दितवाह चक्रीवादळ हे श्रीलंकेसाठी सर्वात विध्वंसक ठरत आहे. वादळाबरोबरच शनिवारी एकाच दिवसात २०० मिमी. पाऊस कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तविला आहे. पावसामुळे तलाव आणि धरणे तुडूंब झाल्याने नागरिकांना सुरक्षितस्थळी जाण्याचा इशारा देण्यात आला आहे. ■

### मध्यरात्रीच मदत पोहचली

**खाद्य सामुग्री आणि अत्यावश्यक औषधे घेऊन निघालेले भारताचे सी-१३० हे मालवाहू विमान शनिवारी पहाटे दीड वाजताच्या सुमारास कोलंबोतील भद्रानायके आंतरराष्ट्रीय विमानतळावर उतरले. आणखी मदत दिली जाणार असल्याचे भारत सरकारने म्हटले आहे.** ■


अहमदाबादमधील नरेंद्र मोदी मैदानाजवळील घरे शनिवारी महानगरपालिकेने पाडली. नगररचना आराखड्यानुसार रस्ता रुंदीकरणासाठी २९ घरे पाडण्यात आली. विशेष म्हणजे २०३० मध्ये याच मैदानात राष्ट्रकुल स्पर्धेचे आयोजन होणार आहे.

# अमेरिकेने अफगाण पासपोर्टवर घातली बंदी

◆ **वॉशिंग्टन, २९ नोव्हेंबर**

वॉशिंग्टनमध्ये व्हाईट हाऊसजवळ झालेल्या गोळीबारानंतर अमेरिकेच्या इमिग्रेशन व्यवस्थेत मोठे बदल करण्यात आले असून ट्रम्प प्रशासनाने अफगाण पासपोर्टवरील सर्व व्हिसा तत्काळ निलंबित केले आहेत. या घटनात दोन नॅशनल गार्ड सैनिक गंभीर जखमी झाले होते. काही तासांतच व्हिसा प्रक्रिया, तसेच देशभरातील आश्रय निर्णय थांबवण्याचा निर्णय घेण्यात आला.

गोळीबारानंतर अनेक सरकारी कार्यालयांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला. परिसर सील करण्यात आला आणि संशयिताचा शोध सुरू केला आहे. अधिकाऱ्यांच्या मते राष्ट्रीय सुरक्षेसाठी कारवाई गरजेची झाली असल्याचे सांगितले. त्याच अनुषंगाने प्रशासनाने दोन निर्णायक आदेश काढले अफगाण पासपोर्टवर जारी केलेले सर्व व्हिसा रद्द केले आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# आमच्यात मतभेद नाहीत

## दिल्लीत भांडल्यानंतर बंगळुरूत जेवणाच्या टेबलवर एकत्र


बंगळुरू येथे सिद्धरामया आणि डी.के. शिवकुमार यांनी शनिवारी एकत्र येत भोजनाचा आस्वाद घेत आमच्यात वाद नसल्याचे दर्शविले

◆ **बंगळुरू, २९ नोव्हेंबर**

मुख्यमंत्री पदावरून मुख्यमंत्री सिद्धरामया आणि उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांच्यात सुरू झालेले भांडण शिवकुमार यांनी तलवार म्यान केल्याने तुर्त मिटले आहे. दिल्लीत जाऊन पक्षश्रेष्ठींसमोर बाह्या सरसावणारे मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बंगळुरूमध्ये मात्र, एका टेबलावर जेवण केले. तसेच आमच्यात कोणतेही भांडण नसल्याचे दोघांनी ठासून सांगितले.

काँग्रेसचे बहुतांश आमदार पाठिशी असल्याचा दावा डी.के. शिवकुमार वारंवार करीत असतात. यावेळीही त्यांचे समर्थक आमदार नवी दिल्लीत एकत्र आले होते. यावेळी एक घाव, दोन तुकडे, अशी परिस्थिती निर्माण होणार असल्याची चिन्हे असताना शिवकुमार यांनी मवाळ भूमिका घेतली. शनिवारी मुख्यमंत्री सिद्धरामया यांच्या निवासस्थानी दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. दोघांनी एकत्र जेवण केले आणि संयुक्त पत्रकार परिषद घेतली. आमच्यात कोणतेही वाद नाहीत आणि भविष्यातही नसतील. आमचे लक्ष्य २०२८ मध्ये होणारी विधानसभा निवडणूक आहे. काँग्रेसला पुन्हा सत्तेत आणण्यासाठी एकत्र काम करणार आहोत. पक्षाचे हायकमांड जे सांगतील त्याचे पालन करू, असे पत्रकार परिषदेत सिद्धरामया यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

### मी मुख्यमंत्र्यांसोबत : डी.के. शिवकुमार

सर्वाच्या मदतीने राज्यात काँग्रेसचे सरकार आले आहे. आम्हाला जनतेची साथ आहे. आम्हाला जनतेच्या इच्छा पूर्ण करायच्या असून त्या दिशेने आम्ही काम करीत आहोत. आम्ही दोघे एकत्र काम करीत असून मी मुख्यमंत्र्यासोबत आहे, असे उपमुख्यमंत्री डी.के. शिवकुमार यांनी म्हटले आहे. ■

### भाजप-जेडीएसवर फोडले खापर

काँग्रेसमध्ये सुरू असलेल्या वादाचे खापर सिद्धरामया यांनी भारतीय जनता पक्ष आणि जेडीएसवर फोडले आहे. या दोन्ही पक्षांना खोटे बोलण्याची सवय आहे. सरकारविरोधात विश्वासमत ठराव आणणार असल्याचे हे दोन्ही पक्ष बोलत असले तरी आमच्याकडे १४० आमदार आहेत तर त्यांच्याकडे अवघे ६० आहेत. त्यांचे प्रयत्न निष्फळ ठरतील, असेही सिद्धरामया म्हणाले. ■

# हाँगकाँग आग; मृतांचा आकडा १२८

◆ **ताई पो, २९ नोव्हेंबर**

हाँगकाँगमध्ये ताई पो येथील वांग फुक कोर्ट परिसरात लागलेल्या भीषण आगीने प्रचंड जीवितहानी केली असून मृतांचा आकडा तब्बल १२८ वर पोहोचला आहे. सात उंच इमारतींना लागलेल्या या आगीला तिसरा दिवस उलटून गेला तरी २०० हून अधिक लोकांचा अद्यापही तपास लागत नाही. परिस्थितीच्या भीषणतेमुळे शुक्रवारी शोध, बचाव आणि पुनर्प्राप्ती मोहिम थांबवण्यात आली. घटनेनंतर सरकारने तातडीने आर्थिक मदतीची घोषणा करत बाधित कुटुंबांना मोठा आधार दिला आहे.



सुरक्षा सचिव ख्रिस तांग पिंग-केउंग यांनी दिलेल्या माहितीनुसार शोधमोहीम पुन्हा सुरू झाल्यास मृतांचा आकडा आणखी वाढण्याची भीती आहे. या मोहिमेत ३९१ अग्निशमन गाड्या, १८५ रुग्णवाहिका आणि तब्बल २,३११ जवान तैनात होते. बचावकार्य दरम्यान एका अग्निशामकाचा मृत्यू झाला, तर १२ जण जखमी अवस्थेत आढळले. जवळपास १,९८४ फ्लॅट आणि ४,६०० रहिवाशांचा समावेश असलेल्या इमारतींच्या समूहात नक्की आग कशी लागली याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. ◂(वृत्तसंस्था)

# एकाच कुटुंबातील तीन मुलांचा ४८ तासांत तापामुळे मृत्यू

◆ **कुशीनगर, २९ नोव्हेबर**

उत्तर प्रदेशच्या कुशीनगर जिल्ह्यात गुलराहिया टोला गावात एका कुटुंबातील तीन मुलांचा अवघ्या ४८ तासांत तीव्र तापामुळे मृत्यू झाला. या दुःखद घटनेनंतर आरोग्य विभाग तातडीने सक्रिय झाला असून उर्वरित मुलांची तपासणी करण्यासाठी डॉक्टरांचे पथक गावात दाखल झाले आहे. सलग तीन मुलांच्या मृत्यूमुळे गावात घबराट पसरली. माहिती मिळताच आरोग्य विभागाने तातडीने कारवाई सुरू केली. नेबुआ नौरंगिया सामुदायिक आरोग्य केंद्राचे प्रभारी डॉ. रंजन कुमार मौर्य म्हणाले की गावात गेल्या दोन दिवसांपासून वैद्यकीय शिबिर सुरू आहे. आरोग्य विभागाच्या पथकाने आतापर्यंत ५७ मुलांची तपासणी केली असून मलेरिया आणि डेंग्यूसारख्या आजारांच्या चाचण्या केल्या आहेत. गरजेनुसार औषधे वाटली जात आहेत. डॉ. मौर्य यांनी सांगितले की, वैद्यकीय अहवालानंतरच तिन्ही मुलांच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होईल, सध्या काहीही निश्चित सांगणे शक्य नाही. पथकाने कीटकनाशके, ब्लीचिंग पावडर फवारणी केली असून रहिवाशांना स्वच्छता राखण्याचा सल्ला दिला आहे. गावात सध्या शोककळा पसरली असून आरोग्य विभाग उच्च सतर्कतेवर आहे. ◂(वृत्तसंस्था)

# पुतिन ४ डिसेंबरला भारतात येणार

**नवी दिल्ली :** भारत आणि रशिया वार्षिक शिखर परिषदेसाठी रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन ४ डिसेंबरपासून दोन दिवसीय भारताच्या दौऱ्यावर येणार असल्याची माहिती परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. पुतिन ४ आणि ५ डिसेंबर रोजी भारताच्या औपचारिक दौऱ्यावर असतील. या भेटीदरम्यान ते २३ व्या भारत-रशिया वार्षिक शिखर परिषदेत सहभागी होतील. यावेळी ते पंतप्रधान मोदींची भेट घेतील आणि दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंधांवर चर्चा करतील.




### छत्तीसगडमध्ये काँग्रेसने केले संघटनात्मक बदल

**रायपूर : छत्तीसगडमध्ये काँग्रेसने मोठे संघटनात्मक बदल केले असून ४१ जिल्हा समित्यांमध्ये अध्यक्षांची नियुक्ती केली आहे. पक्षाने राज्यातील तळागाळात आपली पकड मजबूत करण्यासाठी संघटना निर्मिती मोहिमेअंतर्गत हे पाऊल उचलले आहे. यामध्ये पाच महिलांचाही समावेश आहे. या बदलामागे काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि राज्य प्रभारी सचिन पायलट यांचा राज्य दौऱ्याचा मोठा वाटा आहे, कारण त्यांच्या भेटीनंतर या नियुक्त्या करण्यात आल्या.**

# एआयमुळे १७ वर्षांनी झाली कुटुंबीयांशी भेट

## आईस्क्रीम घेण्यासाठी गेली अन् रस्ता विसरली ● 'फेशियल रिकग्निशन' तंत्रज्ञानाची मदत

◆ **कराची, २९ नोव्हेंबर**

पाकिस्तानात राहणाऱ्या किरण या मुलीची एआय म्हणजेच कृत्रिम बुद्धिमत्तेच्या मदतीने १७ वर्षांनी तिच्या कुटुंबीयांशी भेट झाली. ही मुलगी १७ वर्षांपूर्वी आईसक्रीम घेण्यासाठी घराबाहेर पडली मात्र ती घराचा रस्ता विसरली.

इस्लामाबादमध्ये राहणारी किरण घरातून आईस्क्रीम घेण्यासाठी घराबाहेर पडली. ती रस्ता विसरली आणि तिला तिचा पत्ता आठवत नव्हता. यामुळे ती रडू लागली. तेव्हा एका महिलेने तिला इस्लामाबादच्या इधी सेंटरमध्ये नेले. ही घटना २००८ मध्ये घडली. काही काळानंतर बिलकिस इधी यांनी तिला कराची येथे आणले. तिथे तिचे पालनपोषण शेल्टर होममध्ये झाले. किरण जवळपास १७ वर्षे याच शेल्टर होममध्ये राहिली. फाऊंडेशनने अनेक वेळा इस्लामाबादला जाऊन तिच्या आई-वडिलांना शोधण्याचा प्रयत्न केला. त्यांनी वर्तमानपत्रांमध्ये बातम्या छापल्या, पण कोणतीही माहिती मिळाली नाही. अनेक वर्षे कुटुंबाचा कोणताही सुगावा लागला नाही. या वर्षाच्या सुरुवातीला, फाऊंडेशनने पंजाबच्या सेफ सिटी प्रोजेक्टचे सायबर सुरक्षा तज्ज्ञ नबील अहमद यांची मदत मागितली.

नबील यांना किरणचे सध्याचे फोटो आणि तिच्या लहानपणाशी संबंधित काही माहिती देण्यात आली.




त्यांनी जुने पोलिस रेकॉर्ड तपासले आणि फेसियल रिकग्निशनसारख्या 'एआय' तंत्रज्ञानाच्या मदतीने किरणच्या कुटुंबाचा शोध घेतला. ◂(वृत्तसंस्था)

### एआयच्या मदतीने सापडलेली किरण पाचवी मुलगी

शोध लागल्यानंतर किरणचे वडील अब्दुल मजीद हे कराचीला पोहोचले. येथे मुलीची आणि पित्याची भेट झाली. ते अनेक वर्षे तिचा शोध घेत होते, पण काहीच माहिती मिळाली नाही. यामुळे त्यांनी ती परतण्याची आशा सोडली होती, असे त्यांनी सांगितले. किरण ही एधी शेल्टर होममधील पाचवी मुलगी आहे, जिच्या कुटुंबाचा शोध 'एआय' आणि पोलिसांच्या मदतीने लागला आहे. फाऊंडेशन आता देशातील विविध सेफ सिटी प्रोजेक्टस्सोबत मिळून अशा प्रकरणांमध्ये अधिक वेगाने काम करण्याची तयारी करत आहे. ■

# डॉ. मिर्झा : मनामनांत हास्याची पेरणी करणारा लोककवी

## प्रासंगिक

**प्रवीण टाके**

कवितेने मारलं कवितेने तारलं
जवा होतो उपाशी कवितेने चारलं
पुढचं सारं जीवन कवितेनं भिजावं
कविता म्हणतांनी जीव माहा थिजावं
स्टेजवर कवी मेल्याचा चमत्कार घडावं
लढता लढता सैनिक धारातीर्थी पडावं



आपल्या कलाकृतीवर इतक्या निष्ठेने प्रेम करणारे वऱ्हाडी विनोदाचे बादशहा, मराठी-वऱ्हाडी भाषेला उंचीवर पोहोचवणारे हास्यसम्राट डॉ. मिर्झा रफी अहमद बेग आपल्या असंख्य चाहत्यांचा निरोप घेऊन निघून गेले. गेल्या ४०-४५ वर्षांचा त्यांचा-माझा स्नेह. धनजमाणिकवाडा या यवतमाळ जिल्ह्यातील जुळ्या गावातील त्यांचा जन्म. या छोट्याशा गावातील डॉ. मिर्झा रफी अहमद बेग म्हणजे अत्यंत गुणवान व्यक्तिमत्त्व. त्यांच्या कॉलेज जीवनाची सुरुवात त्यांनी अभियंता बनण्यासाठी केली. नंतर ते डॉक्टर झाले आणि पुढे कवी म्हणून त्यांनी नावलौकिक मिळविला.

अवघे ६८ वर्षांचे आयुष्य, पण तब्बल पन्नास वर्षे हास्यव्यंगाचा रंगमंच त्यांनी गाजवला. वयाच्या अकराव्या वर्षी कवितेची सुरू झालेली 'मिर्झा एक्सप्रेस' धडाकेबाज प्रवासानंतर ६८ व्या वर्षीच थांबली. मिर्झा एक्सप्रेस या सोलो कार्यक्रमांचे ६ हजारावर प्रयोग त्यांनी केले. २० पेक्षा अधिक पुस्तके, अनेक ध्वनिचित्रफिती आणि लाखो हृदयांवर उमटलेल्या खळखळाटाचे ठसे ही त्यांची मिळकत.

तीस-चाळीस वर्षांपूर्वी गावामध्ये रेडिओवर बीबीसी ऐकणारे, इंग्रजी वाचणारे, रामायण-महाभारतापासून भागवताशी, कीर्तनाशी नाळ जुळलेले मिर्झा हे संत साहित्याचे गाढे अभ्यासक होते. सर्वसमावेशकता त्यांच्या घरातील संस्कारातून त्यांच्याकडे आली आणि ही सर्वसमावेशकता त्यांच्या कवितेतही कायम उमटत राहिली. त्यामुळेच हा कवी महाराष्ट्रातल्या कवी संमेलनांना नवा स्वर, नवा विचार आणि नावीन्य देणारा ठरला. अनेक वाहिन्यांवरील हास्य व्यगांच्या कार्यक्रमांचे ते प्रमुख सादरकर्ते ठरले. महाराष्ट्राचे हास्य सम्राट म्हणून नावलौकिकास आले. वऱ्हाडी बोलीची चव, ग्रामीण साधेपणाची फोडणी आणि समाजप्रबोधनाचा ठेचा ही त्यांच्या सादरीकरणाची रेसिपी होती.

त्यांनी विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्षपदही भूषवले. इतर अनेक साहित्य संमेलनांचे ते अध्यक्ष होते. 'जांगडबुत्ता' या शब्दाचे ते जनक असून, याच नावाने त्यांचा काव्यसंग्रहही प्रसिद्ध आहे. अवघ्या दोन ते तीन मिनिटांत श्रोत्यांशी थेट एकरूप होण्याचे अजब कसब त्यांच्याकडे होते.

डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांचे सर्वांत मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांनी विदर्भातल्या छोट्या छोट्या गावांना कविता, कविसंमेलन, हास्य व्यंग म्हणजे काय याची शिकवण दिली. विदर्भात नव्वदीच्या काळात डॉ. मिर्झा अहमद बेग, डॉ. विठ्ठल वाघ, शंकर बडे यांच्यासह विदर्भातील काही कवींनी कविसंमेलन हा प्रकार गावागावांमध्ये लोकप्रिय केला. विठ्ठल वाघ यांची तिफण कविता, पहाडी आवाजातील मांडणी, शंकर बडे यांचा बॅरिस्टर गुलब्या, गेय कवितांची मांडणी आणि डॉ. मिर्झा यांची मोठा माणूस, सातवा महिना, जांगडबुत्ता, ऊठ आता गणपत या विनोदी कवितांनी त्या काळात धूम केली होती.

बाकी सगळं होत राहील...
पैसा राह्यला तर गणगोत राहील...

अशी व्यवहारी मांडणी ते करायचे. त्यांच्या कवितेवर टीकाटिप्पणी व्हायची. मात्र सादरीकरणात ते विरोधकांनाही जिंकून घ्यायचे. त्यांच्याच भाषेत ते यावर भाष्य करताना म्हणायचे....

आज जरी कवितेले किंमत नाही माया
लोक मले समजते फुटाणे अन् लाया
उद्या पहा माझ्यासाठी पुष्पक विमान येईन
तुकारामासारखा मले स्वर्गामध्ये नेईन

आपल्या श्रोत्यांना कायम हसत ठेवण्याचे अजब कसब त्यांच्याकडे होते. त्यांच्या कविता शेती, माती, शेतकरी, कामगार यांच्यावर अधिक होत्या. ते शेतकऱ्यांच्या समस्या साध्या सोप्या पद्धतीने मांडत. या संदर्भात त्यांनी 'उठ आता गणपत' या कवितेतून दीर्घ मांडणी केली होती...

उठ आता गणपत हाती घे तूत्या
तू पेरतो तूती तुझ्या हाती तोत्या
किंवा
शेतकरी समाधानी हे केवळ पुस्तकी असते
जगभऱ्याचे दुःख त्याच्या मस्तकी असते
किंवा
शेतकऱ्यांना संसाराचा मेळ कसा जोडावं
कुठून घ्यावं श्वास अन् गॅस कुठून सोडावं
खरिपात अलग बोलाचं वेगळं रब्बीत
डब्बा भरुन पेराचं सावडाच डब्बीत

ग्रामीण भागातील श्रोत्याना लक्षात घेऊन अनेक कवितांची मांडणी त्यांनी केली. नवरा बायकोतील संवाद एका कवितेत त्यांनी शानदारपणे मांडला आहे...

दिवस-रात्र राबतो या बुवाऱ्या पोटासाठी
कुठून आणू लिपस्टिक तुझ्या लाल चुटूक होटासाठी
एक मले शर्ट आणि एकच पॅन्ट
नौकरी करतो ते शाळा नॉन ग्रॅन्ट
कपडा नाही भेटत मीटरभर कोटासाठी
कुठून आणून लिपस्टिक या लाल चुटूक होटासाठी

मिर्झा हे वऱ्हाडी बोलीचे विद्यापीठ होते. हसत-हसत प्रबोधन, मनात घर करणारी शैली या साऱ्या गुणांचं एकमेव संमिश्रण म्हणजे मिर्झा एक्सप्रेस. त्यांच्या अनेक कविता विद्यापीठात अभ्यासालाही आहेत. भाषेच्या संदर्भात त्यांची ही कविता खूप बोलकी आहे.

मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृतासंग पैज जिंकते अशी मराठी बोली
आभाळाची उंची जिला समुद्राची खोली

दिल्लीपासून गल्लीपर्यंत त्यांनी आपल्या कवितांनी लोकांच्या आयुष्यात रंग भरला. ते फक्त कवितेतच विचार करायचे. त्यांच्या पुस्तकांच्या प्रस्तावनापासून त्यांचे आत्मचरित्र देखील त्यांनी कवितेतच लिहिले. त्यांच्या कवितेची समीक्षा करताना डॉ. मिर्झांनी एक वेगळ्या पद्धतीची मांडणी आयुष्यभर केली आणि ती यशस्वी केली हे अधोरेखित व्हायला हवे. गेली ५० वर्षे महाराष्ट्राची जनता या आनंदात भिजून निघाली. त्यांचे असे जाणे अनेकांना रुचले नाही. सगळ्यांनाच वाटत होते की, मिर्झा एक्सप्रेस धावत राहिली पाहिजे. आजोबांपासून तर नातवांपर्यंत जवळपास तीन पिढ्या त्यांच्या काव्य मैफिलीच्या साक्षीदार आहेत. डॉ. मिर्झा, तुम्ही काव्यप्रेमींच्या स्मरणात दीर्घकाळ राहणार आहात. डॉक्टर साहेबांना विनम्र आदारांजली.

उपसंचालक (माहिती)
विभागीय माहिती कार्यालय, कोल्हापूर
९७०२८५८७७७

# वाढता दहशतवाद

## दखल

**प्रवीण दीक्षित**

१० नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी सातच्या सुमारास दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ अत्यंत शक्तिशाली असा स्फोट एका हळूहळू पुढे सरकणाऱ्या गाडीमधून झाला व त्यात १३ जण मृत्यू पावले व अनेकजण जखमी झाले. मृतांमधील अनेक जण मुस्लिम आहेत. हा स्फोट हे दहशतवादी कृत्य होते व त्यात अनेक निष्पाप लोकांना ठार मारून जगाचे लक्ष्य त्यांच्याकडे वेधणे हेच होते. सध्या या स्फोटाचा तपास एनआयए करत आहे. आतापर्यंतच्या तपासात असे दिसते की डॉ. उमर नबी, जो दिल्लीजवळील फरिदाबाद येथे असलेल्या अल् फलाह विद्यापीठात शिकवत होता, हा मूळचा काश्मिरी पण त्याने २०२४ मधे काश्मीर सोडले होते. आयईडी स्फोट करण्यात तो प्रशिक्षित होता. त्यापूर्वी मागच्या १५ दिवसात जम्मू-काश्मीर, हरयाणा आणि उत्तरप्रदेश पोलिसांनी ३ डॉक्टरांसह ८ लोकांना पकडले होते. त्यामधे पुलवामा येथे राहणाऱ्या डॉ. मुझामिल अहमद गनेय ऊर्फ मुसाईब आणि लखनौ येथे राहणाऱ्या डॉ. शाहीन सईद यांना अनुक्रमे ३० ऑक्टोबर आणि ८ नोव्हेंबर रोजी अटक करण्यात आली होती. हे दोघेही अल फलाह रुग्णालयात काम करत होते. डॉ. अदिल जो जम्मू-काश्मीरमधील पुलगामा, वानपोरा इथला रहिवासी होता, त्याला उत्तर प्रदेशातील सहारनपूर येथून ५ नोव्हेंबरला पकडण्यात आले होते. १० नोव्हेंबर रोजी डॉ. गनेय हा ज्या घरात भाड्याने राहात होता, तेथून ३५० किलो स्फोटके व शस्त्रे पकडल्याचे फरिदाबाद पोलिसांनी १० नोव्हेंबर रोजी वृत्त प्रतिनिधींना सांगितल्यानंतर वरील लोकांना अटक केल्याचे उघडकीस आले होते. जम्मू-काश्मीर पोलिसांनीही जाहीर केले की, २९०० किलो स्फोटके, शस्त्रे, टाइमर्स, बॅटरीज व मेटल शीटस् पकडली आहेत. बाकीचे लोक पकडले गेल्यानंतर घाईघाईत आपण पकडले जाऊ नये म्हणून डॉ. उमर नबी हा काही स्फोटके घेऊन गाडीने जात असताना त्याने लाल किल्ल्याजवळील, मेट्रोस्टेशनच्या जवळ, संध्याकाळी गर्दीच्यावेळी स्फोट केला.

डॉ. शाहीन सईद ही नुकत्याच बनविण्यात आलेल्या 'जमात-उल-मोमिनात' या संघटनेची कार्यकर्ती होती. ही महिलांची संघटना जैश-ए-मोहमद या बंदी असलेल्या संघटनेनी ऑपरेशन सिंदूर नंतर भारतात दहशतवादी कृत्ये करण्यासाठी महिलांची भरती करणारी संस्था बनविण्यात आली होती. जैश-ए-मोहमदचा प्रमुख मसूद अझर याने सादिया अझर हिला या संघटनेचा प्रमुख म्हणून ऑक्टोबरमध्ये जाहीर केले होते. सादिया ही युसुफ अजहर, जो ७ मे रोजी मर्काझ सुभानअल्ला बहवालपूर पाकिस्तान येथे भारताने केलेल्या ऑपरेशन सिंदूरमधे मारला गेला होता त्याची बायको आहे.

डॉ. सईदच्या अटकेतून हे स्पष्ट होते की, जैश-ए-मोहमद ही संघटना इस्लामिक स्टेट ऑफ इराक ॲण्ड सीरिया (आयएसआयएस) प्रमाणे महिलांचा उपयोग हा हल्ले करण्यासाठी व आत्मघातकी कारवायांसाठी करत आहे. मूलतत्त्ववादी मौलवी हे शिक्षणसंस्थांमध्ये, मदरशांमध्ये तरुण मुला-मुलींना मोठ्या प्रमाणात आपल्या जाळ्यात ओढताना दिसतात.



जैश-ए-मोहमद या संघटनेस पाकिस्तान सरकार व लष्कराचा उघडपणे पाठिंबा आहे व त्यांना भारताविरुद्ध कारवायांना ते सतत मदत करत आहेत. ऑपरेशन सिंदूरमध्ये उद्ध्वस्त केलेली दहशतवादी संघटनांची ठिकाणे पाकिस्तान सरकार पुन्हा बांधून देण्यास मदत करत आहे.

आतापर्यंत उपलब्ध माहितीवरून दिसते की, मोठ्या प्रमाणात वैद्यकीय तसेच संगणकीय, उच्च शिक्षण घेतलेल्या मुला-मुलींना वापरून त्यांच्या माध्यमातून नवीन तरुणांना व तरुणींना दहशतवादी आपल्या जाळ्यात ओढत आहेत. काही दिवसांपूर्वीच पुण्यातूनही अशाच प्रकारे काम करणाऱ्या डॉक्टर व आयटीमध्ये काम करणाऱ्या व्यक्तींना अटक केली होती. अल् कायदाचा म्होरक्या ओसामा बिन लादेन हासुद्धा खूप शिकलेला व धनाढ्य होता पण तितकाच अत्यंत कडवा दहशतवादी होता.

दहशतवादी संघटना या मोठ्या प्रमाणात इंटरनेटचा वापर करून तरुणांची डोकी भडकवत असतात. त्यांना खोटे व्हिडीओ दाखवले जातात व त्यांना दहशतवादी कृत्ये करण्यासाठी प्रोत्साहित केले जाते. या व्यक्ती आधुनिक शिक्षण घेतलेल्या, सर्व नवीन तंत्रज्ञानात कुशल, सॅटेलाईट फोनने सुसज्ज, भरपूर पैसे असणाऱ्या परंतु धार्मिक क़डव्या अशा आहेत. नुकत्याच अटक झालेल्या व्यक्तींच्या जबाबातून स्पष्ट होते की, हैदराबाद येथे राहणाऱ्या व्यक्ती शस्त्रे मिळविण्यासाठी गुजरातच्या सीमावर्ती भागात आदलाद येथे गेले असताना पाकिस्तानमधून ड्रोनच्या मदतीने शस्त्रे पाठवली होती ती घ्यायला ते गेलेले होते. पूर्ण गुप्तता राखली जाईल या तत्त्वावर अमेरिकेतून चालवल्या जाणाऱ्या व्हॉट्स् ॲपसारखे सामाजिक प्लॅटफॉर्म्स यांचा दहशतवादी संघटना पुरेपूर गैरफायदा घेत आहेत व सार्वभौम असलेल्या इतर देशांतील सुरक्षा यंत्रणांना त्यावर काहीही कारवाई करणे वा माहिती मिळवणे हे जवळजवळ अशक्य आहे. इंग्लंड, युरोप व अन्य देशांनी या सामाजिक प्लॅटफॉर्म्सकडून मागितलेली माहिती सुरक्षेच्या कारणासाठी देण्यास अमेरिकेच्या प्रशासनाने पूर्णपणे नकार दिला आहे. इंटरनेटचा वापर करून प्रचंड प्रमाणात बिटकॉईन्सच्या माध्यमातून आज करोडो रुपये भारतातील तरुण त्यात खर्च करत आहेत. त्याचा वापर करून ड्रग्ज तसेच शस्त्रास्त्रे यांचा व्यापार होत आहे. अनेक गुन्ह्यांच्या तपासात दहशतवादी ड्रग्जचा वापर करून शस्त्रे खरेदी करतात व दहशतवादी कृत्ये करतात हे स्पष्ट झाले आहे.

या उलट भारतीय व्यक्तींनीच बनवलेली झोहो मेल, आरात्ताई यांचा वापर अद्याप नगण्य आहे. त्यामुळे एकतर भारतातील सर्व डेटा हा अमेरिकेसारख्या परकीय देशाला सहज उपलब्ध होत आहे व त्यातून मिळणारी माहिती भारतीय सुरक्षा यंत्रणांना उपलब्ध होत नाही व दहशतवाद्यांचे आंतरराष्ट्रीय जाळे मजबूत होत आहे. या उलट चीनने सुरुवातीपासूनच या अमेरिकन संस्थांवर बंदी घालून स्वतःचे सामाजिक प्लॅटफॉर्म्स तयार केलेले आहेत.

कोणतेही घर भाड्याने द्यायचे असल्यास त्या संबंधीची माहिती पोलिसांना देणे बंधनकारक असूनही फार क्वचित ती पुरवली जाते व माहिती न देणाऱ्यांवरही न्यायालयातून कठोर शिक्षा झाल्याचे दिसत नाही. त्यामुळे पैशाच्या लोभाने दहशतवादी मनात येईल त्या ठिकाणी भाडेकरू म्हणून राहतात व आपले उद्दिष्ट साध्य करतात हे वारंवार अनेक घटनांनी दाखवले आहे. लोकांना दाखविण्यासाठी समाजात प्रतिष्ठा असेल अशा पदाचा वापर करून ते आपल्या दहशतवादी कारवाया करताना दिसतात. फरिदाबाद येथे सापडलेली २९०० किलो स्फोटके हे दहशतवादी अनेक महिन्यांपासून साठवत होते. स्फोटकांसाठी आवश्यक अशी रासायनिक द्रव्ये, टायमर्स, मेटलशीट्स विकणाऱ्या सर्व विक्रेत्यांवरही या गोष्टी कोणाला विकल्या ही माहिती पोलिसांना देणे आवश्यक करण्याची गरज आहे. या सर्व स्फोटकांची वाहतूक ही लक्षात येणार नाही अशाप्रकारे विविध वाहनांमधून होताना दिसते. त्यासाठी ठिकठिकाणी वाहनांची तपासणी करणे गरजेचे आहे. वाहने खरेदी करताना खोटे पत्ते दिले जातात व ते सहज मान्य केले जातात ही चिंतची बाब आहे.

दहशतवादी कृत्ये करणाऱ्यांची माहिती केवळ तंत्रज्ञानाचा वापर करून मिळेल हे समजणे पुरेसे नाही. वर चर्चा केल्याप्रमाणे ही माहिती मिळण्यावर अनेक बंधने आहेत व सर्व दहशतवादी ही माहिती विविध खोटी नावे किंवा कोड वापरून पाठवत असतात. त्यामुळे त्यांची खरी ओळख फारच क्वचित होऊ शकते. त्यामुळे व्यक्तींच्या साहाय्याने गोळा केलेली गुप्त माहिती (ह्युमन इन्टलिजन्स) ही सद्धा अत्यंत महत्त्वाची आहे. दहशतवादाविरुद्ध लढा हे सर्व थरांनी एकत्र येऊन लढणे अत्यंत आवश्यक आहे. भारतातील लोकशाहीवर विश्वास असलेल्या अशा मुस्लिम समाजातील लोकांनाच त्यासाठी प्रोत्साहन देऊन या कृत्यांचा त्यांनीही निषेध करणे गरजेचे आहे. त्यांच्या आजूबाजूला कडवे विचार पसरविणारे कोण आहेत, गैरकृत्ये करणारे कोण आहेत याची माहिती त्यांनी सुरक्षा यंत्रणांपर्यंत पोचविणे अत्यंत आवश्यक आहे. त्याचप्रमाणे कडव्या विचारांना प्रत्युत्तर देण्याचे कामही या मुस्लिम संघटनांनी करणे आवश्यक आहे. त्याच बरोबर सर्व सामान्य लोकांना देखील पोलिस मित्र म्हणून सामावून घेऊन त्यांना चौकस राहणे, संशयित व्यक्तींची माहिती सुरक्षा यंत्रणांना पुरवणे याचे प्रशिक्षण देणे अत्यंत महत्त्वाचे आहे. आर्थिक विकास झाला किंवा वैद्यकीय, तांत्रिक प्रगत शिक्षण मिळाले म्हणजे लोक धार्मिक कडव्या विचारांपासून दूर जातील असे समजणे म्हणजे स्वतःची फसवणूक करणे आहे. अमेरिकेतील ९/११ पासून ते दिल्लीतील १०/११ पर्यंत घडलेल्या दहशतवादी घटनांमधून लवकरात लवकर हा बोध घेणे गरजेचे आहे.

(लेखक महाराष्ट्राचे निवृत्त पोलिस महासंचालक आहेत.)

## रविवारची पत्रे

### टीईटी: गुणवत्ता, न्याय आणि भविष्याचा समतोल

महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्था आज एका महत्त्वाच्या वळणावर उभी आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी पात्र, दक्ष आणि प्रशिक्षित शिक्षकांची गरज अधिकाधिक प्रकर्षाने जाणवू लागली आहे. याच पृष्ठभूमीवर मुलांसाठी मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार कायदा, २००९ आणि शासनाच्या २०१३ मधील निर्णयाने शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) सर्व शिक्षकांसाठी अनिवार्य करण्यात आली. शिक्षकांची गुणवत्ता तपासण्यासाठी ही परीक्षा एक महत्त्वाचे साधन मानले गेले. परंतु गेल्या दहा वर्षांच्या प्रवासात या परीक्षेने काही गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत, ज्यावर विचारपूर्वक निर्णय घेण्याची आज अत्यंत गरज आहे.

टीईटी परीक्षेत उत्तीर्ण होण्याचे प्रमाण अत्यंत कमी राहिले आहे. २०१३ पासून आजपर्यंत जवळपास ३० लाख उमेदवारांनी या परीक्षेला बसूनही केवळ १.०६ लाख उमेदवार उत्तीर्ण झाले आहेत. हे प्रमाण फक्त ३.५ टक्के इतके आहे. इतक्या मोठ्या संख्येने प्रशिक्षणप्राप्त (डी.एड, बी.एड, एम.एड) उमेदवारांचा अपयश दर हा परीक्षा पद्धतीत, परीक्षेच्या कठीणतेत किंवा मूल्यांकन निकषांमध्ये असलेल्या विसंगतीकडे स्पष्टपणे निर्देश करतो. गुणवत्तेसाठी उच्च निकष ही आवश्यक बाब असली, तरी त्या निकषांची अंमलबजावणी वास्तवाशी संतुलित असायला हवी. अन्यथा योग्य शिक्षण घेऊनही शिक्षक बनण्याच्या तयारीत असलेल्या तरुणांसमोर रोजगाराचे दरवाजे कायमस्वरूपी बंद होण्याचा धोका निर्माण होतो.

याहून अधिक गंभीर परिस्थिती विद्यमान शिक्षकांची आहे. अनेक वर्षांपासून शाळांमध्ये सेवा बजावत असलेल्या शिक्षकांकडे डी.एड, बी.एड किंवा एम.एड सारखी आवश्यक शैक्षणिक पात्रता पूर्णपणे उपलब्ध आहे. त्यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेचा स्तर सांभाळत मुलांमध्ये मूल्यशिक्षण, सुसंस्कार व शैक्षणिक प्रगती घडवून आणण्यासाठी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. परंतु टीईटीचे अनिवार्यत्व आणि अत्यंत कमी उत्तीर्णता दर यामुळे या शिक्षकांवर नोकरी असुरक्षिततेची छाया पसरली आहे. शिक्षण क्षेत्रात अनेक वर्षे सेवा दिल्यानंतरही अचानक असुरक्षिततेची भावना निर्माण होणे हे शिक्षकांच्या मानसिक आणि व्यावसायिक स्थिरतेवर विपरीत परिणाम करणारे आहे.

१ सप्टेंबर २०२४ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयामुळे टीईटीची अनिवार्यता अधिक बळकट झाली असून, सर्व शिक्षकांना या परीक्षेत उत्तीर्ण होणे बंधनकारक झाले आहे. त्यामुळे हजारो विद्यमान शिक्षकांना नोकरी गमावण्याची भीती निर्माण झाली आहे. यावर उपाय म्हणून, शिक्षक आणि विद्यार्थ्यांच्या हितासाठी टीईटीच्या उत्तीर्णतेची मर्यादा ५० टक्क्यांपर्यंत शिथिल करणे हा एक समतोल दृष्टिकोन ठरू शकतो. यामुळे गुणवत्ता निकष कमी न करता अधिक वास्तववादी पातळीवर शिक्षकांच्या क्षमतेचे मूल्यमापन करता येईल. जगभरातील अनेक पात्रता चाचण्यांमध्ये ५० टक्के गुण हे आधारभूत उत्तीर्णतेचे प्रमाण मानले जाते. महाराष्ट्रातील टीईटी परीक्षेत ही मर्यादा लागू केल्यास खालील तीन महत्त्वाचे परिणाम अपेक्षित आहेत :

पहिला म्हणजे विद्यमान पात्र व अनुभवी शिक्षकांना नोकरीची सुरक्षितता लाभेल. त्यांच्यावर येणारा मानसिक ताण कमी होईल आणि ते अधिक केंद्रितपणे शैक्षणिक कार्य करू शकतील. दुसरे म्हणजे बेरोजगार असलेल्या प्रशिक्षित युवकांना रोजगाराची संधी उपलब्ध होईल. टीईटी उत्तीर्ण न झाल्यामुळे अनेक तरुण नोकरीपासून वंचित राहतात; ५० टक्के उत्तीर्णता निकषामुळे ही समस्या मोठ्या प्रमाणात सुटेल आणि तिसरा म्हणजे शाळांमधील शिक्षकांची कमतरता दूर होईल, ज्यामुळे शैक्षणिक प्रक्रिया अधिक सुरळीतपणे पार पडेल.

राज्य शासनाने या प्रश्नाचा विचार केवळ एक प्रशासकीय निर्णय म्हणून न करता सामाजिक आणि शैक्षणिक परिणामांच्या दृष्टीने करणे आवश्यक आहे. शिक्षक हे शिक्षणव्यवस्थेचे कणा आहेत. त्यांच्या सुरक्षिततेचा, आत्मविश्वासाचा आणि व्यावसायिक स्थैर्याचा थेट संबंध विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेशी आहे. आज महाराष्ट्राचे शिक्षक शासनाकडे अपेक्षेने पाहत आहेत. प्रशिक्षित शिक्षकांची कौशल्ये, त्यांचा अनुभव आणि समाजघडणीसाठीचे योगदान लक्षात घेऊन टीईटीसंदर्भात योग्य, न्याय्य आणि सुजाण निर्णय घेणे अत्यावश्यक आहे.

**सचिन चव्हाण**/९१५८३९३२६०

### नको रे मना क्रोध खेदकारी

समर्थ रामदास स्वामी यांनी ''मनाचे श्लोक''ची रचना केली आहे. त्यात मनाला असे समजावले आहे की क्रोध आल्यानंतर मनाला खेद उत्पन्न व्हावयास नको. क्रोधाची गणना षडरिपूमध्ये होत असली तरी विवेकरुपी क्रोध हा सकृद्दर्शनी व्यक्त होत नसून हा अन्याय, विषमता, व्यवस्था विरुद्ध व्यक्त होऊन त्यास क्रांती किंवा चळवळीचे स्वरूप प्राप्त होऊ शकते, जनसामान्यांचे हित साधले जाते, समर्थन प्राप्त होऊ शकते, ह्यास इतिहास साक्षी आहे. क्रोध हा अवगुण असला तरी शूर माणसाचा तो अलंकार आहे. अन्यायाच्या विरोधात लढण्यासाठी, शरीरात बळ संचारण्यासाठी क्रोध उत्पन्न झालाच पाहिजे. त्या शिवाय संरक्षण किंवा आक्रमण होऊ शकत नाही. शूर सैनिक जेव्हा उपरोक्त क्रिया करतो तेव्हा त्याच्या परिणामाची वाट पाहत नाही, कृतीबद्दल खेद पण व्यक्त करीत नाही. याचा अर्थ विवेकपूर्ण क्रोध आवश्यक आहे.



व्यक्तिगत क्रोध व्यक्त करताना झालेल्या परिणामाची (अपमान, नामुष्की, हानी, अपमान, हिंसा इ.) जाणीव झाली आणि खेद व्यक्त करून क्षमायाचना परिस्थिती निर्माण होणे म्हणजे त्या कृतीचे अपयश होय. प्रत्येक व्यक्तीची शारीरिक आणि मानसिक जडणघडण विभिन्न असते. आरोग्यशास्त्रानुसार आनुवंशिकता आणि जनुकीय रचना, तसेच आयुर्वेद शास्त्रानुसार वात, पित्त आणि कफ या सिद्धांतानुसार पित्त दोषांचे आधिक्य होणे हे स्वभाव अस्थिर, चंचल, अहंकारी आणि उष्ण प्रकृती असू शकतो.

षडरिपूंपैकी क्रोध हा मन, बुद्धी, चित्त व अहंकार या चतुष्टयपैकी 'चित्त'शी संलग्न आहे. आपण ज्या कुटुंबीयांत जन्म घेतो त्यातील मातुल वंश आणि पितृवंश (पूर्वज) कडून आलेल्या गुणसूत्रांनुसार चित्ताची बैठक तयार होऊन स्वभाव तयार होतो. स्वभाव बदलत नाही असे म्हटले जाते ते यासाठीच. क्रोधी स्वभावास काळ, वेळ, विषय व परिस्थितीचे भान नसल्याने मनाविरुद्ध झाले की तमवृत्ती उफाळून येते आणि अनर्थ घडतो. क्रोध त्वरित शमन झाला नाही तर रक्तदाब वाढून त्याचा शारीरिक व मानसिक प्रकृतीवर विपरीत परिणाम होत असतो.

आपल्या अवती-भवती, कुटुंबीय, मित्र मंडळ, समाजात अशा गुणांचे धनी आढळतात. ह्यांच्या स्वभावाचा अति जवळच्या किंवा सतत संपर्कात येणाऱ्या व्यक्तीवर नकारात्मक परिणाम होत असतो. त्या व्यक्तीच्या स्वभावाचा कयास बांधता येत नाही. क्रोधासोबत अहंकार, द्वेष यांनी मैत्री केली की एकत्रित कट कारस्थान करून भयानक प्रकार घडतात. दुसऱ्या व्यक्तीचे मन दुखावले असता नम्र होऊन क्षमायाचना करणे हे त्यांच्या बुद्धी आणि मनाला पटत नसते. स्वाभिमानाला ठेच लागली आहे, हे मनाला पटले निखारा रुपी क्रोध आतून धगधगत असतो आणि बळजबरी चित्त शांत ठेवून त्या अपमानाचा बदला घेण्यासाठी आसुरी योजना आखल्या जातात. ही लक्षणे असामाजिक तत्त्वाच्या व्यक्तीमध्ये प्रामुख्याने आढळतात आणि त्यातूनच अपहरण, कट, हिंसाचार, खून यासारखे भयानक प्रकार घडतात. अशा घटना होऊ नये म्हणून पालकांनी मुलांचा स्वभाव ओळखून वेळीच तज्ज्ञ मंडळींकडून समुपदेशन केल्यास स्वभावात बदल होण्यास मदत होऊ शकते.

नको रे मना क्रोध हा खेदकारी
नको रे मना काम नाना विकारी
नको रे मना सर्वदा अंगीकारु
नको रे मना मत्सरु दंभ भारू

समर्थ रामदास स्वामींनी या श्लोकात हाच उपदेश केला आहे.

**संजय पाठक**/नागपूर

### अर्बन नक्षलवादाचा अस्सल चेहरा

देशाच्या राष्ट्रीय स्मरणशक्तीशी खेळणाऱ्यांची संख्या आज इतकी वाढली आहे की जणू विस्मरणता हेच त्यांचं प्रमुख राजकीय साधन बनलं आहे. स्वतःला पर्यावरणवादी, मानवतावादी, उदारमतवादी म्हणवणारी एक टोळी आज देशाच्या मुळांवर असा घाव घालत बसली आहे की, त्यांच्या शब्दांतील मधुरतेच्या आड लपलेली विषारी धार सामान्य माणसाला कळतच नाही. समाजाला भुलवणे, राष्ट्राला अपराधी ठरवणे आणि हिंसेला 'प्रतिरोध' म्हणून गौरवणे हा नवीन फॅशन ट्रेंडच जणू बनलाय.



हेच लोक जंगल वाचवण्याच्या नावाने पहिल्यांदा समोर येतात आणि काही दिवसांतच त्यांच्या लिखाणात, भाषणांत हिडमासारख्या रक्तपिपासू दहशतवाद्यांचा 'पुरस्कृत' प्रतिकार दिसू लागतो. थोडं मागे पाहा- जंगल जपायचं म्हणताना ते माणसांना जाळणाऱ्यांच्या बाजूने उभे राहिले. आदिवासींना न्याय द्यायचा म्हणताना त्यांनी देशावर गोळ्या झाडणाऱ्यांना तारणहार म्हटलं. आणि विरोध केल्यावर तुमचं-माझं देशप्रेम हिणवलं. तेव्हा कुणी विचारतच नाही, एका हातात संविधानाची शपथ आणि दुसऱ्या हातात हिंसेला मूक पाठिंबा! हा कोणता उदारमतवाद? कोणता मानवतावाद?

या लेफ्टिस्ट जमातीचं तर्क असं विकृत झालं आहे की जो देशाचा शत्रू असेल तो त्यांचा मित्र; आणि जो देशाचं भलं करेल तो त्यांच्या नजरेत 'फॅसिस्ट'. देशाची सेना त्यांना अत्याचारी वाटते, पण देश तोडणाऱ्यांना ते क्रांतिकारी म्हणतात. त्यांना नागरी हक्क तेव्हाच आठवतात जेव्हा दगड भारताला लागतो; हुतात्मा जवानांचे रडणारे आई-वडील कधी त्यांना दिसतच नाहीत. 'अंधश्रद्धा' म्हणत मंदिरांवर टीका करणारेच लोक एका खुनी विचारसरणीला धर्माच्या रूपात साजरे करतात. त्यांना हिडमा 'प्रतिकार' वाटतो; पण त्याच्यामुळे एका मुलाचा बाप, एका स्त्रीचा पती, एका आईचा मुलगा मृतदेहात घरी पोचतो हे त्यांना दिसत नाही. दिसतं ते फक्त आपलं अजेंडा, आपलं 'सेक्युलर' सर्टिफिकेट आणि आपल्या गटातल्या उरलेल्या लोकांचं टाळ्यांचं राजकारण.

स्वतःला 'वर्गसंघर्ष' समजवणारेच लोक देशातला सर्वांत मोठा संघर्ष राष्ट्र आणि राष्ट्रद्रोह यांचा संघर्ष कधीच मान्य करत नाहीत; कारण त्यांची प्राणज्योतच राष्ट्रद्रोहात आहे. ते देशाचे नसतातच; ते एका 'नॅरेटिव्ह' चे असतात. त्यांचं देशप्रेम तेव्हाच पेटतं जेव्हा पाकिस्तानची बाजू घ्यायची वेळ येते. त्यांचा संविधानवाद तेव्हाच जागा होतो जेव्हा देशाचे कायदे मोडणाऱ्यांना संरक्षण द्यायचं असतं. आणि सर्वांत मजेशीर हे लोक स्वतःला 'विचारवंत' म्हणवतात. पण त्यांच्या सर्व विचारांचा पाया एकच भारत नेहमी चुकीचा, हिंदू समाज नेहमी दोषी आणि राष्ट्र नेहमी अपमानास पात्र. त्यांना कधीच दिसत नाही की हे राष्ट्र त्या लोकांचं आहे ज्यांनी आपल्या रक्ताने इतिहास लिहिला आहे. ज्यांच्या हाडांवर हा देश उभा आहे त्यांचा अपमान करणेच त्यांच्या बुद्धिमत्तेचा 'मार्क' बनून बसला आहे.

हिंसेची व्याख्या त्यांनी अशी केली आहे की दहशतवाद्यांच्या हातून जे मरतात ते त्यांच्या नजरेत 'स्टेट-कोलेटरल'. पण जेव्हा देशद्रोह्याला अटक केली जाते तेव्हा ते म्हणतात 'लोकशाही मरत आहे.' अरे लोकशाहीचा गळा तुम्हीच तर घोटताय आपल्या शब्दांनी, आपल्या लेखांनी, आपल्या विषारी मतांनी! ही मंडळी बाहेरून नरम, आतून कठोर; वरून शहाणी, आतून षडयंत्री. देशाच्या नकाशात भेगा पाडण्याच्या योजनेचा भाग असूनसुद्धा ते स्वतःला विवेकवादाचे रक्षक समजतात. त्यांना देश फुटला तरी त्रास होत नाही; पण राष्ट्रवाद बोलणारा एकही आवाज वर उठला की त्याची त्यांना प्रचंड चीड येते.

आज या अर्बन नक्षलवाद्यांचा एक अजून धोकादायक चेहरा समोर आला आहे. सेंट्रल युनिव्हर्सिटीजमध्ये प्रवेश मिळवणे, तिथे बसून आपली पिलावळ तयार करणे आणि नंतर योग्य वेळ आली की देशाच्या पाठीवर सुरा खुपसणे. हीच त्यांची दशकभराची रणनीती आहे. वर्गात शिक्षक, वसतिगृहात मार्गदर्शक, चर्चासत्रात विचारवंत आणि पडद्यामागे राष्ट्रद्रोही कारवायांचे कारखानदार. देशाच्या पैशावर शिकायचं, देशाच्या संस्थांमध्ये वाढायचं आणि वेळ आल्यावर देशालाच खायचं या परजीवी वृत्तीला आता आवर घालण्याची वेळ आली आहे. आणि स्पष्ट सांगायला हवं हा प्रकार यापुढे खपवून घ्यायचा नाही.

हे लोक देशाचा नाश बंद खोलीतल्या चर्चेत करत नाहीत; ते हा नाश समाजातल्या भोळ्याभाबड्या मनात करतात. त्यांची भाषा गोड, मुद्रा सोज्ज्वळ, पण हेतू भयंकर.

आज आवश्यक आहे निर्भीडपणे म्हणणं- ''जो देशाला कमजोर करतो तो कुठल्याही विचारसरणीचा असो तो शत्रूच.'' आणि ''जो भारताच्या बाजूने उभा राहतो तो माझा.''

**प्रा. भागवत माणिकराव भांगे**/७२७६४६९८००

### गीतेच्या गाभाऱ्यात

गीतेच्या गाभाऱ्यात प्रवेश करताच तन मन तेजोमय होते अशी ही गीतेची महती... अनुभव हीच खात्री आहे त्यासाठी गीता वाचन, मनन आणि चिंतन केले पाहिजे... धर्माने चालणाऱ्या व्यक्तींवर बरेचदा पेचप्रसंग येतात पण धर्माचा बारकावा न उमगल्याने त्याची पेचप्रसंगातून सुटका होत नाही. कृष्ण असा आहे ज्याने धर्म जाणला आणि त्यामुळे कोणत्याही परिस्थितीवर मात करण्याची शक्ती त्याच्या ठायी आहे. मानवी जीवनात जेव्हा पेच निर्माण होतो तेव्हा कृष्णाचे तत्त्वज्ञान जाणून घेणे आवश्यक आहे कारण त्यातूनच कोणत्याही समस्येवर तोडगा मिळतो ही शाश्वती आहे.

कृष्णाने निरनिराळ्या विचारांचे समुद्र मंथन करून मानवी जीवनातील प्रत्येक समस्येवर उपयोगी पडणारे अमृत निर्माण केले हेच गीतामृत होय. भोगाच्या आणि त्यागाच्या टोकाला गेलेला समाज अधःपतित होतो पण भोग आणि त्याग, प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा सुवर्णमध्य साधतो तोच या जगात कृतार्थ होतो. कृष्णाने आपल्या तत्त्वज्ञानाने प्रवृत्ती आणि निवृत्ती यांचा सुरेख समन्वय केला म्हणूनच सर्व तत्त्वज्ञानात सर्वश्रेष्ठ तत्त्वज्ञान म्हणजे गीतेचे तत्त्वज्ञान आहे.

कृष्णाने जीवनातील सर्व तत्त्वज्ञान जाणून असे जीवनामृत तयार केले की जीवनातील कोणत्याही परिस्थितीत ते खात्रीने उपयोगी आहे. कृष्णाने वैदिक लोकांची कर्मनिष्ठा, वेदांती लोकांची संन्यासनिष्ठा, सांख्य लोकांची ज्ञाननिष्ठा व योगी लोकांची चित्त निरोधनिष्ठा या सर्वांना मान दिला आणि कर्तव्य कर्माचे तिळ भक्तीच्या साखरेत घालून असा अप्रतिम हलवा तयार केला की हा हलव्याचा मेवा म्हणजे मानवी जीवनातील अनमोल ठेवा ठरला आहे.

**संगीता वाईकर**/९९२२५०४७९४

## आजचे संघगीत-५८

रविवार, ३० नोव्हेंबर २०२५

### उजाळिले तू तममय जीवन संघयुगाचा शालीवाहन

उजाळिले तू तममय जीवन संघयुगाचा शालीवाहन ॥धृ.॥

कर्मयोग तव ज्वलंत प्रेरक मातीतुनही उठले सैनिक
वाण सतीचे घेउनि दाहक प्रकाश फुलवित अंधारातुन ॥१॥

सामर्थ्यातुन तत्त्वाचा जय धर्म रक्षण्या शक्तीसंचय
राष्ट्र आपुले हे मृत्युंजय तूच दाविले निजहवनातुन ॥२॥

हिंदुत्वाचा विशाल सागर विभिन्नतेच्या लाटा वरवर
परी अंतरी एकच सुस्वर जागविले हे सत्य सनातन ॥३॥

तव शब्दांचे अमृतसिंचन देशाचे या फुलले यौवन
पुरुषार्थाचे जगण्या जीवन अगणित सेवक झिजले कणकण ॥४॥

महिमा आता संघयुगाचा विशालतेचा उदात्ततेचा
जीवन इथले बहरविण्याचा तुझी तपस्या मंगल पावन ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company Solapur Tarun Bharat Media Limited., and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● Mr. Vivek Krishnaji Ghalsasi - Dissertation Editor / ● Mr. Dilip Yeshwant Pethe - Group Chief Editor ● Mr. Prashant Vasantrao Mane - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) Email ID starunbharat@gmail.com and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: https://dainiktarunbharat.com/, ● Epaper: https://epaper.dainiktarunbharat.com/. The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

## महत्वाचे...



### मोडी लिपी परीक्षेत समरसिंग शिंदे प्रथम

**सोलापूर दि. २९ नोव्हेंबर-**

मोडी लिपी परीक्षेमध्ये समरसिंग शिंदे याने प्रथम क्रमांक पटकाविला. द्वितीय स्थान संजय घाळे व तृतीय स्थान संतोष दळवी याने संपादिले. दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळ संचलित व्ही. जी. शिवदारे कॉलेज ऑफ आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स येथे पुराभिलेख संचालनालय व महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोडी लिपी प्रशिक्षण वर्गाचा प्रमाणपत्र वितरण समारंभ सोलापूर सिद्धेश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभीरे व महाराष्ट्र केमिस्ट अँड ड्रगिस्ट असोसिएशनचे माजी अध्यक्ष बसवराज मणुरे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. अध्यक्षस्थानी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. आर. वाय. पाटील होते. प्राचार्य डॉ. डी. एस. सुत्रावे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. संगीता बावगे यांचा प्रशिक्षण आयोजनात घेतलेल्या विशेष परिश्रमाबद्दल सन्मान करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांचा परिचय मृगेंद्र हंजगी यांनी करून दिला. याप्रसंगी प्राचार्य डॉ. एम. एस. कलशेट्टी, डॉ. शुभदा उपासे, प्रा. चंद्रशेखर उमरजकर, डॉ. स्मितांजली दामा आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. डॉ. डी. डी. बनसोडे यांनी केले. प्राजक्ता चौगुले यांनी आभार मानले.

# विद्यार्थ्यांसह ग्रामस्थांनी वाचला एस.टी.च्या मनमानी कारभाराचा पाढा

## १२ गावच्या नागरिकांनी परिवहन मंत्र्यांना दिले निवेदन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

राज्याचे परिवहन मंत्री तथा धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे धाराशिव जिल्हा दौऱ्यावर असताना त्यांचा ताफा तामलवाडी येथे थांबवून शालेय विद्यार्थी व ग्रामस्थांनी सोलापूर, धाराशिव, लातूर विभागाच्या व तुळजापूर आगार प्रमुखांचा अनागोदी कारभार आज (दि. २९) कथन केला. दरम्यान, २५ वर्षापासून सर्व विभागांच्या जलद व रातराणी बसेसना तामलवाडी येथे थांबा असतानाही एसटी महामंडळाचे चालक-वाहक प्रवासी घेत नाहीत. यामुळे तामलवाडी थांब्याबाबत पंचक्रोशीतील १२ गावच्या ग्रामस्थांनी एकत्रितपणे परिवहन मंत्र्यांकडे एक निवेदनही दिले.

दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, तुळजापूर तालुक्यातील तामलवाडी हे गाव १० ते १२ हजार लोकसंख्यचे गाव आहे. या गावात १० ते १२ कारखान्यांची मिनी एमआयडीसी आहे; आता मोठी एमआयडीसीही मंजूर आहे. इतकेच नाहीतर या गावातील बसथांब्यावरून पंचक्रोतील १२ गावचे लोक रोज ये-जा करतात. गेल्या २५ वर्षापासून सर्व



विभागांच्या जलद व रातराणी बसेसना येथे थांबा असतानाही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे अनेक चालक-वाहक मनमानी करीत प्रवासी घेत नाहीत. त्यामुळे विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, नोकरदारवर्ग, शेतकरीबांधव आदी सर्व प्रवाशांना रोजच नाहक त्रास सहन करावा लागत आहे. सोलापूर ते तुळजापूर रोडवर कसल्याही प्रकारची अवैध प्रवासी वाहतूक होत नाही. त्यामुळे तामलवाडी पंचक्रोशीतील दहा-बारा गावच्या ग्रामपंचायतीच्या वतीनेही आज पालकमंत्री सरनाईक यांना निवेदन देवून आपल्या अडचणी मांडल्या.

पासधारक विद्यार्थांना बसमध्ये घेतले जात नाही, दोन-दोन तास बसची प्रतिक्षा करावी लागते, वारंवार लेखी व तोंडी तक्रारी करून ही एसटी प्रशासकीय अधिकारी दखल घेत नाहीत. हे निदर्शनास आणून दिले.

याप्रसंगी उपसरपंच सुधीर पाटील, श्री त्रिंबकेश्वर शिक्षण संस्था अध्यक्ष बसवराज मसुते, शिवसेना विभाग प्रमुख मुकुंद गायकवाड, शिवसेना तालुका उपाध्यक्ष निरंजन करंडे, प्रवासी संघटना अध्यक्ष शिवाजी पाटील, तामलवाडी पोलिस स्टेशनचे स.पोलीस निरिक्षक गोकूळ ठाकूर, ग्रामस्थ मारुती पाटील, प्रमोद गायकवाड, कबीर हेडे, पंकज करंडे, विनायक पवार, सुमित मसुते, सरस्वती विद्यालयाचे प्राचार्य सुहास वडणे, पर्यवेक्षक महादेव मसुते व सर्व शिक्षक, विद्यार्थी आणि युवक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### गंजेवाडी-तामलवाडी रस्ते कामाच्या चौकशीची मागणी

तुळजापूर तालुक्यातील गंजेवाडी ते तामलवाडी या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे केले आहे, त्याचीही चौकशी होऊन संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, असे गंजेवाडी व तामलवाडी च्या शेतकऱ्यांच्या वतीने पालकमंत्री सरनाईक यांना निवेदन देण्यात आले. यावेळी मंत्री महोदयांनी तुमच्या सर्व अडचणी दूर करण्यासाठी मी प्रयत्न करतो असे सांगितले.

### थेट मला फोन करा; मी आता सर्वांना सरळ करतो: परिवहनमंत्री

गावकरी आणि उपस्थित विद्यार्थ्यांच्या भावनांचा विचार करून याप्रसंगी मंत्री महोदयांनी या गावात बस थांबली नाही किंवा शालेय पासधारक विद्यार्थ्यांना बसमध्ये चढू दिले नाहीतर थेट माझ्या टोल फ्रि नंबरवर फोन करण्याचे आवाहन केले आणि मी सर्वांना सरळ करतो असे आश्वासन दिले. यापुढे मी तुम्हाला त्रास न होण्याबाबत संबंधितांना आदेश करतो, असेही आश्वासित केले.

# बाधित नागरिकांची चिंता दूर करण्यासाठी राज्य सरकार सक्रिय

**तभा वृत्तसेवा,**
**छत्रपती संभाजीनगर, दि. २९ नोव्हेंबर-**

रेल्वे स्टेशन ते करमाड या पट्ट्यातील रेल्वे रुंदीकरण प्रक्रियेत दक्षिण बाजूच्या सुमारे ३ हजार घरांचा उल्लेख रेल्वेच्या जाहीर प्रगटनामध्ये झाल्याने निमर्ण झालेल्या चिंता दूर करण्यासाठी राज्य सरकार सक्रिय झाले आहे. आज छत्रपती संभाजीनगर विमानतळावर आगमनानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भारतीय जनता पक्षाचे प्रदेश महामंत्री व विधानपरिषदेचे आमदार संजय केनेकर आणि जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे यांनी भेट घेऊन हा मुद्दा अत्यंत गांभीर्याने मांडला,या वेळी रुद्राणी इन्फ्राचे विवेक देशपांडे उपस्थित होते.



नागरिकांच्या घरांवर विस्थापनाची टांगती तलवार असल्याचे दोन्ही नेत्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणले. रेल्वेचा विकास आवश्यक असला तरी सामान्य नागरिकांची घरे वाचविणे तितकेच महत्त्वाचे असल्याची भूमिका त्यांनी मांडली आणि केंद्र सरकारशी चर्चा करण्याची विनंती केली.

मुख्यमंत्र्यांनी परिस्थितीचे सर्व पैलू सविस्तरपणे ऐकून घेतले. काही दिवसांपूर्वी वेरूळ येथे झालेल्या भेटीदरम्यानही जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी नागरिकांच्या भावना मुख्यमंत्री फडणवीस यांच्यापर्यंत पोहोचवल्या होत्या. त्यांच्या निवेदनाचा देखील पुनरुच्चार आज करण्यात आला.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी आश्वासन देताना सांगितले की, ''मी केंद्राशी चर्चा केली आहे. कोणत्याही नागरिकाला त्रास होणार नाही आणि कोणाचेही घर पाडले जाणार नाही यासाठी सर्वतोपरी काळजी घेतली जाईल.''

या आश्वासनामुळे रुंदीकरण प्रभावित नागरिकांना दिलासा मिळाला असून पुढील निर्णय केंद्र आणि राज्य यांच्या समन्वयातून घेण्यात येणार आहेत.

# सोलापूरला आंबेडकरी विचारांचा समृध्द वारसा

## विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे; ज्येष्ठ साहित्यिक दत्ता गायकवाड यांचा सन्मान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पदस्पर्शाने सोलापूर नगरी क्रांती प्रवण झाली आहे. आंबेडकरी विचारांचा समृद्ध आणि जाज्वल्य वारसा सोलापूर शहर-जिल्ह्याला लाभला आहे. चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथात लेखक दत्ता गायकवाड यांनी डॉ. आंबेडकर यांचा सोलापूरची ऋणानुबंध, त्यांचा त्याग आणि त्यांच्या समवेतचा माता रमाई यांचा प्रवास अभ्यास पूर्णपणे मांडला आहे, असे प्रतिपादन विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांनी येथे केले.



चैतन्याचे प्रणेते डॉ. बाबासाहेब आंबेडकर या ग्रंथाचे लेखक, जेष्ठ अभ्यासक दत्ता गायकवाड यांचा सन्मान सोहळा विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या हस्ते फॉरेस्ट येथे थाटात पार पडला.

यावेळी विचारमंचावर प्रा. एम. आर. कांबळे, महापालिका पत्रकार संघाचे अध्यक्ष किरण बनसोडे, समारंभाचे संयोजक तथा राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाचे प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, किसन जाधव, शहराध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान आदींसह मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी सन्मानचिन्ह शाल, निळी टोपी, उपरणे आणि पुष्पगुच्छ देऊन लेखक गायकवाड यांचा यथोचित गौरव करण्यात आला. प्रारंभी विश्वभूषण डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन व आभार प्रा. डॉ. अंजना गायकवाड यांनी केले. याप्रसंगी माजी नगरसेवक गणेश पुजारी, डि.के बहुद्देशीय सामाजिक संस्थेचे संस्थापक दशरथ कसबे, दिनेश शिंदे, दिपाली लोंढे, सूर्यमणि गायकवाड, सुधीर चंदनशिवे, पुरुषोत्तम कसबेकर, अरविंद शेंमाडे, श्रीमंत जाधव, चाचा सोनवणे, वैभव गंगणे, प्रेमानंद लोंढे, राज कांबळे, निवृत्त पोलीस उपायुक्त बाळासाहेब सरवदे, प्रणव लोंढे, चंद्रमणी कांबळे, राजू काटे, दीक्षांत सरवदे, करुणा शेमाडे उपस्थित होते.

**CHANGE OF NAME**

I, Herby Declare that, My Old Name **GUTTE RAMESH TRAMBAK S/O GUTTE TRAMBAK,** Resident of Ranisavargaon, Tq. Gangakhed, Dist. Parbhani pin Code - 431536 has Been Changed My name from **RAMESH TRAMBAK GUTTE to RAMESH TRAMBAKRAV GUTTE.** Affidavit no. 59 AB 439794, Date 28/11/2025.

# ना.अण्णा बनसोडे, आ.विजयकुमार देशमुख यांनी केला एकाच गाडीमधून प्रवास

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णा बनसोडे आणि शहर उत्तरचे आमदार विजयकुमार देशमुख दोघांनी एकाच कारमध्ये शुक्रवारी दुपारी एकत्र प्रवास केल्यामुळे राजकीय वर्तुळात चर्चेला उधाण आले आहे. अण्णा बनसोडे तीन दिवस सोलापूर दौऱ्यावर आहेत.या दौऱ्यात त्यांनी विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या भेटीगाठी घेतल्या आहेत. शुक्रवारी सोलापुरातील श्री सिद्धेश्वर मंदिरामध्ये जाऊन दर्शन घेत असतानाच अण्णा बनसोडे यांनी आमदार विजयकुमार देशमुख यांना सोबत घेतले. कारमध्ये काहीकाळ सोबत प्रवास केला.



दरम्यान, याबाबत वार्तालाप कार्यक्रमात अण्णा बनसोडे यांना यासंदर्भात प्रश्न विचारले असता, विजयकुमार देशमुख हे वरिष्ठ आमदार आहेत. त्यांनी मंत्रीपद भोगले आहे. ते आमचे जुने मित्र आहेत. मंदिरामध्ये गाठभेट झाल्यानंतर गाडीत येण्याची विनंती केल्यावर त्यांनी मान्य केली. जुन्या आठवणींना यावेळी उजाळा मिळाल्याचे अण्णा बनसोडे यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे सोबत होते. सर्वांनी एकत्र गाडीतच सेल्फीसुद्धा घेतला.

## कल्पना बेडगनूर यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार

**सोलापूर :** शिवाजी मराठी विद्यालयातील सहशिक्षिका कल्पना सिध्दारुढ बेडगनूर यांचा सेवानिवृत्तनिमित्त सत्कार करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव उज्वला ढमाळ, सिद्धारुढ बेडगनूर, कल्पना बेडगनूर यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन व आभार सूर्यकांत दोडके यांनी केले. मुख्याध्यापक बिराजदार यांनी कल्पना बेडगनूर यांनी केलेल्या कार्याचा आढावा सांगितला. याप्रसंगी गजानन कुंभार, मच्छिंद्र पाटील, प्रकाश जाधव, जयश्री आयरे, दिपीका उपाध्ये, गुरुनाथ वामने, प्रभाकर कारंडे, ओंकार बेडगनूर, मयुर बेडगनूर, माळवदकर, खांडेकर, शिंदे, येडवे, सुरजकुमार ढमाळ उपस्थित होते.

**नावात बदल**

मी खाली स्वाक्षरी करणार **उमेशकुमार भवानजीभाई चौहान,** जाहीर करतो की मी माझ्या नावात बदल केला आहे. माझे जुने नाव **(उमेशकुमार भवानजीभाई चौहान** आहे आता मी माझे नवीन नाव **उमेश भवानजी चौहान**) या नावाने ओळखला जाईल. माझ्या सर्व जुन्या कागदपत्रांवर आणि नोंदीवर माझे नाव उमेश भवानजी चौहान असेच ग्राह्य धरले जाईल. या बाबत मी मे. नोटरी अधिकारी श्री माणिक धारूरकर यांचे समोर प्रतिज्ञालेख असुन त्याचा अनु. ०२८१५ दि. २८/११/२५ असा आहे.

दिनांक : २८/११/२५
ठिकाण : बार्शी

**नावात बदल**

यात मी **काजल उमेश चौहान** वय ४७ वर्षे, रा. सुभाष नगर, बार्शी ता. बार्शी, जि. सोलापूर लिहून देते की, माझे पती नाव काही शासकीय/निमशासकीय कागदपत्रावर **उमेशकुमार भवानजीभाई चौहान** असे नजरचुकीने नमूद आहे, प्रत्यक्षात माझे पतीचे नाव हे उमेश भवानजी चौहान असे आहे. तरी त्या दोन्ही नावाच्या व्यक्ती एक असून ते माझे पती आहेत.

| चुकीचे नाव | बरोबर नाव |
|---|---|
| उमेशकुमार भवानजीभाई चौहान | उमेश भवानजी चौहान |
| UMESHKUMAR BHAVANJIBHAI CHAUHAN | UMESH BHAVANJI CHAUHAN |

याबाबत मी मे. नोटरी अधिकारी श्री माणिक धारूरकर यांचे समोर प्रतिज्ञालेख असुन त्याचा अनु. ०२८१५ दि. २८/११/२५ असा आहे.

## शिवसेना वैद्यकीय मदत कक्षच्या महिला जिल्हाप्रमुखपदी अरुणा बेंजरपे

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

शिवसेना वैद्यकीय मदत कक्ष सोलापूर महिला जिल्हाप्रमुख पदी रुग्णसेविका अरुणा बेंजरपे यांची निवड करण्यात आली, संस्थापक मंगेश चिवटे आणि कार्याध्यक्ष रामहरी राऊत यांच्या सहीचे पत्र शिवसेना जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांनी दिले. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा. डॉ.श्रीकांत शिंदे यांच्या आदेशाने आणि मंगेश चिवटे यांच्या मार्गदर्शनाखाली बाळासाहेब ठाकरे शिवसेना वैद्यकीय मदत कक्षाच्या सोलापूर - जिल्हाप्रमुख पदी निवड करण्यात येत आहे. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख अक्षय बिद्री, तालुका प्रमुख राजकुमार शिंदे, वाहतूक सेना विजय गरड, शशिकांत शिंदे, कुमार धुमाळ, सामाजिक कार्यकर्त्या सोनाली सगर यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



**माळशिरस तालुका हनुमान मोफत वाचनालय, माळशिरस, जि. सोलापूर**

**-: टेंडर नोटीस :-**

माळशिरस व परिसरातील सर्व बांधकाम व्यवसायिकांना कळिवणेत येते की, सदर माळशिरस तालुका हनुमान मोफत वाचनालय, माळशिरस या संस्थेच्या मालकीची जूनी इमारत पाडून (दगडी भिंत व पत्रा) नवीन आर.सी.सी इमारत बांधणेची आहे. सदर बांधकामाचे व त्या अनुषंगीक कामाचे टेंडर किंमत रु.६,९०,०००/- (रु. सहा लाख नव्वद हजार) आहे. प्लॅन व डिझाईन वाचनालयात पाहणेसाठी उपलब्ध आहे. संस्था वरील काम खालील पैकी एक प्रकारे करुन घेणार आहे तरी इच्छुकांनी टेंडर दि.१०/१२/२०२५ पर्यंत वाचनालया मध्ये सकाळी ९:०० ते १२:०० या वेळेत आणून दयावीत. संस्था नंतर निर्णय घेईल.

१) सर्व कामांचे उक्ते टेंडर रक्कम
२) संस्थेने मटेरियल आणून दिल्यास प्लॅन प्रमाणे सर्व कामांची एकुण मजूरी
३) वरील कामाची बाबवार मजूरी दरपत्रक
४) बांधकामासाठी लागणाऱ्या साहित्यांचे (विटा, वाळू, खडी, गजनी, खिडकी, चौकटी, सिमेंट दरपत्रक)

यापैकी एका प्रकारे संस्था बांधकाम करणार आहे. आलेले टेंडर, दर पत्रक स्विकारणे अथवा कारण न देता नाकारणेचा अधिकार संस्थेने राखून ठेवलेला आहे. टेंडर मंजूर झाल्यास कामाचे मुदतीसह करार करुन घ्यावा लागेल.

संपर्क:- प्रा.श्री. मुकुंद भगवान पंचवाघ (कार्यवाह) मो.नं. ९८८१५३०४३६
श्री. संतोष पंढरीनाथ कुलकर्णी (अध्यक्ष) मो.नं. ९८६०००८४७०

**ही टेंडर नोटीस प्रसिध्द केली असे ता.२८/११/२०२५**

शिक्का

**सही/- अध्यक्ष** **सही/- सेक्रेटरी**
माळशिरस तालुका हनुमान मोफत वाचनालय माळशिरस, जि.सोलापूर

**जाहीर समन्स**

पहिले आर. टी. एस. अपिल नं. २८७/२०२४

**सोलापूर येथील मे उपविभागीय अधिकारी क्र. १ यांचे कोर्टात**

१) श्री. भिमराय धोंडी तगारे
वय: ८० वर्षे, धंदा शेती
रा. रानमसले, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.
२) कै. उध्दव धोंडी तगारे (मयत) तर्फे वारसदार
१. सुशिला उध्दव तगारे
वय : ६५ वर्षे, धंदा: शेती
२. साहेबराव उध्दव तगारे
वय: ५४ वर्षे, धंदा : शेती
३. अंकुश उध्दव तगारे
वय ५३ वर्षे, धंदा शेती
४. प्रभाकर उध्दव तगारे
वय: ४९ वर्षे, धंदा : शेती
१ ते ४ रा. रानमसले, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर
५. शांताबाई दतात्रय पधार
वय: ४८ वर्चे, धंदा घरकाम
रा. गोपाळपुर, ता. पंढरपुर, सोलापूर
६. शारदा धोंडीराम हावळे
वय: ४९ वर्षे, धंदा घरकाम
रा. अर्जुन सोन्ड, ता मोहळ, सोलापूर
३) कै. वसंत धोंडी तगारे (मयत) तर्फे वारसदार
१. राजाराम वसंत तगारे
वय: ५० वर्षे, धंदा : शेती
रा. रानमसले, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर.
२. पुण्या भरत शिंदे
वय : ४९ वर्षे, धंदा घरकाम
रा. हुळे, ता. दक्षिण सोलापूर.
३. बालिका महादेव हावळे
वय वर्षे, बंदा घरकाम
रा. अर्जुन सोन्ड, ता. मोहळ, सोलापूर.
.... वादी / अँपलंट

**विरुध्द**

१) मंडल अधिकारी सोलापूर,
वडाळा, तालुका उत्तर सोलापूर, सोलापूर.
२) श्री. जालिंदर लिंबाजी पाटील
वय: ८० वर्षे, धंदा शेती
३) सी. राजाबाई जालिंदर पाटील
वय: ७६ वर्षे, धंदा घरकाम
४) बळीराम जालिंदर पाटील
वय ५३ वर्षे, धंदा व्यापार
५) कल्याण जालिंदर पाटील
वय: ४८ वर्षे, धंदा व्यापार
६) प्रशांत जालिंदर पाटील
वय: ४६ वर्षे, धंदा व्यापार
२ ते ६ रा. रानमसले, ता. उत्तर सोलापूर, सोलापूर,
..... प्रतिवादी / रिस्पॉडन्ट

ज्याअर्थी ॲपेलंट यांनी रिस्पॉडन्टसब यांच्याविरुध्द पहिले आर.टी.एस. अपील दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरणातील रिस्पॉडन्ट नं. १ ते ६ यांना मे. कोर्टामार्फत अपिलाचे समन्स वर नमुद पत्त्यावर पाठवले असता सदर वर नमुद पत्त्यावर बजावणी होत नाही व रिस्पॉडन्टसब हे समन्सची बजावणी करुन घेण्याचे टाळत आहेत. त्यामुळे ने. कोर्टाच्या आदेशानुसार सदर रिस्पॉडन्ट यांना आर.टी.एस अपीलाचे जाहीर समन्स देण्यात येत आहे.

त्याअर्थी, यर नमुद रिस्पॉडन्टसब यांनी त्यांच्याविरुध्द ॲपेलंट यांनी दाखल केलेल्या आर.टी. एस. अपीलास त्यांचे म्हणणे अथया कैफियत द्यावयाचे असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा प्रस्तुत अपीलाची नेमलेली ता.११/१२/२०२५ रोजी मे. कोर्टात स्वतः अथवा वकिलांमार्फत हजर होऊन त्यांचे लेखी म्हणणे अथवा कैफियत सादर कराये, अन्यथा सदर रिस्पॉडन्टसब यांच्या विरुथ्व एकतर्फी आदेश होऊन दाव्याची सुनावणी होईल ह्याची नोंद घ्यावी.

हे जाहीर समन्स दिले दि.२८/११/२०२५

सही/- लिपिक
कोर्टाचा शिक्का
सही/- उपविभागीय अधिकारी सोलापूर क्र.१, सोलापूर

**IDFC FIRST Bank Limited**
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

IDFC FIRST Bank

**सुरक्षा हितसंबंधांचे प्रवर्तन आणि वित्तीय मालमत्तेचे प्रतिभूतीकरण आणि पुनर्रचना अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना**

आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) कडून खाली नमूद केलेल्या कर्जदारांनी आणि सह-कर्जदारांनी खालीलप्रमाणे सुरक्षित कर्ज घेतले होते. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांचे कर्ज त्यांच्या संबंधित मालमत्ता गहाण ठेवून सुरक्षित केलेले आहे. त्यांनी संबंधित कर्ज करारांचे नियम आणि अटींचे पालन करण्यात कसूर केल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआय (RBI) मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए (NPA) म्हणून वर्गीकृत करण्यात आले. आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) कडे त्यांना देय असलेली रक्कम खालील तक्त्यामध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केली आहे आणि त्याचप्रमाणे, त्या तारखेपासून कराराच्या दराने पुढील व्याज देखील लागू होईल आणि आकारले जाईल.

| अ. क्र. | कर्ज खाते क्रमांक | कर्जाचे प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना तारीख | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकी रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | १४१४१०९३२ | मालमत्ता तारण कर्ज | १. अमित अमर कोळेकर २. कोंडाबाई अमर कोळेकर ३. अमर वामन कोळेकर | २४.१०.२०२५ | रुपये ४,९०,६७२.७३/- |

**मालमत्तेचा पत्ता:** सोलापूर विभागातील, पंढरपूर उपविभागातील, गुरसाळे ग्रामपंचायतीच्या हद्दीतील गट क्रमांक ६४६/१/अ (गट नं. ६४६/१/अ) मधील सर्व जागा आणि त्या जागेचा तुकडा, ज्याचे ग्रामपंचायत मालमत्ता क्रमांक १०३३ आहे. एकूण क्षेत्रफळ २१५२ चौरस फूट असून, त्यावर दगड, विटा आणि सिमेंट-काँक्रीटमध्ये बांधलेले निवासी घर आहे. या घराचे तळमजल्याचे क्षेत्रफळ १४२५.00 चौरस फूट असून, एकूण बांधकाम क्षेत्रफळ १४२५.00 चौरस फूट आहे. च्या चतुःसीमा खालीलप्रमाणे आहेत: पूर्वेस : कुमार भीमराव कोळेकर, पश्चिमेस : रस्ता, उत्तरेस : कुमार वामन कोळेकर, दक्षिणेस : विक्रम वामन कोळेकर

याद्वारे, तुम्हाला सूचित केले जाते की तुम्ही आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, जी आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते) वरील तक्त्यात दर्शविलेल्या तपशिलानुसार असलेली रक्कम, तसेच त्यांच्या संबंधित तारखांपासून करारानुसार लागू होणारे व्याज आणि इतर खर्च, शुल्क इत्यादी, या प्रकाशनाच्या तारखेपासून ६0 दिवसांच्या आत भरावी. जर तुम्ही तसे करण्यात अयशस्वी ठरल्यास, स्वाक्षरी करणाऱ्यास नमूद केलेली आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेडला देय असलेली रक्कम वसूल करण्यासाठी, याठिकाणी वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तांवर कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत कार्यवाही सुरू करण्यास भाग पाडावे लागेल. याव्यतिरिक्त, या कायद्याच्या कलम १३ (१३) अन्वये, तुम्हाला सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाड्याने किंवा इतर कोणत्याही मार्गाने हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**दिनांक : ३०/११/२०२५**
**ठिकाण : सोलापूर, महाराष्ट्र**

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड**
**(पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झाली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाते)**

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.





# चला आयुष्य वाढवूया, फिटनेसकडे वळूया

भाग – 33

## फूट लँडिंग आणि त्याचं महत्त्व

धावताना पाय जमिनीवर कसा टेकतो हे रनिंगमधील सर्वात महत्त्वाचा भाग आहे. यालाच फूट लँडिंग म्हणतात. योग्य लँडिंग नसेल तर शरीरावर अनावश्यक ताण येतो, इजा होण्याचा धोका वाढतो आणि परफॉर्मन्स घसरतो. धावपटूंमध्ये मुख्यतः तीन प्रकारचे फूट लँडिंग दिसतात.

**● हील स्ट्राईक**

यात धावताना पायाची टाच (हील) आधी जमिनीवर टेकते. नवशिके धावपटू किंवा हळू गतीने धावणारे अनेकदा ही पद्धत वापरतात. पण यामुळे गुडघे आणि कंबरेवर जास्त धक्का बसतो. लांब पल्ल्याच्या धावण्यात हा स्टाईल कार्यक्षम मानला जात नाही. दुखापतींचा धोका वाढतो म्हणून शक्यतो टाळावा.

**● मिडफूट स्ट्राईक**

यात पायाचा मधला भाग (मिडफुट) सरळ जमिनीवर बसतो. हा लँडिंग स्टाईल सर्वात नैसर्गिक व कार्यक्षम मानला जातो. यामध्ये धक्क्याचं शोषण चांगलं होतं, शरीराचा समतोल राखला जातो आणि पुढच्या पावलाला गती मिळते. लांब अंतर धावणाऱ्या मॅरेथॉनर आणि अल्ट्रा धावपटूंसाठी हा सर्वात उपयुक्त प्रकार आहे.

**● फोरफूट स्ट्राईक**

यात पायाच्या पंज्याचा पुढचा भाग आधी जमिनीवर बसतो. हा लँडिंग स्टाईल स्प्रिंटर्स किंवा कमी अंतरात वेगाने धावणाऱ्यांसाठी उपयुक्त आहे. यात धावपटूला जलद गती मिळते पण पिंडऱ्यांवर ताण वाढतो. जास्त अंतरासाठी ही पद्धत अवघड ठरू शकते.योग्य फूट लँडिंग का आवश्यक ?शरीरावरचा धक्का कमी होतो.ऊर्जा कार्यक्षमतेने वापरली जाते.गती आणि स्थिरता सुधारते.गुडघे, टाच, कंबर यांचे इजा होण्याचे प्रमाण कमी होते.

**● निष्कर्ष**

प्रत्येक धावपटूचा फूट लँडिंग पॅटर्न थोडा वेगळा असतो. मात्र, लांब पल्ल्याच्या धावण्यासाठी मिडफूट स्ट्राईक सर्वात सुरक्षित आणि कार्यक्षम ठरतो. फूट लँडिंग सुधारण्यासाठी रनिंग ड्रिल्स, अनवाणी(बेअरफुट) हलकं धावणं, आणि योग्य रनिंग शूज निवडणं महत्त्वाचं आहे. योग्य तंत्राने धावल्यानं धावणे हलकं, सुरक्षित आणि आनंददायी होतं.

**- अतिश शहा**
फिटनेस ट्रेनर आणि अल्ट्रामॅरेथॉनर
चॅलेंजर स्पोर्ट्स फाउंडेशन,
सोलापूर.
संपर्क - ९१७५८२८२०३

# रोहित, कोहलीसाठी कठीण परीक्षा

**◆ रांची, २९ नोव्हेंबर**

रविवारी झारखंड क्रिकेट संघटनेच्या क्रिकेट स्टेडियमवर भारत आणि दक्षिण आफ्रिकेदरम्यानच्या तीन सामन्यांच्या मालिकेतील पहिला एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट सामना खेळला जाणार आहे. या मालिकेच्या माध्यमातून संघ निवडी संदर्भात अनेक प्रलंबित कोडी सोडवण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे तसेच रोहित शर्मा व विराट कोहली हे २०२७ च्या विश्वचषकाचे भवितव्य निश्चित करू शकणाऱ्या एका छोट्या परीक्षेला सामोरे जातील.

रोहित व कोहली दोघेही आता केवळ एकाच एकदिवसीय आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्वरूपात खेळत आहे. पुढील दोन महिन्यांत भारतीय संघ केवळ सहा एकदिवसीय सामने खेळणार आहे- तीन दक्षिण आफ्रिकेविरुद्ध व तीन जानेवारीमध्ये मायदेशात न्यूझीलंडविरुद्ध खेळणार आहे. या सामन्यांमधील कामगिरीचा २०२७ च्या वन-डे विश्वचषकाच्या त्यांच्या संभाव्यतेवर थेट परिणाम होऊ शकतो.

**योगायोग...**

योगायोगाने, २०१३ मध्ये याच जेएससीए स्टेडियमवर रोहित शर्माला पहिल्यांदा पूर्णवेळ सलामीवीर म्हणून पाठिंबा देण्यात आला होता. हा एक निर्णायक क्षण होता. या निर्णयामुळे केवळ रोहितच्या वन-डे कारकिर्दीतच नव्हे, तर वर्षानुवर्षे भारताच्या वन-डे क्रिकेटच्या दृष्टिकोनातही बदल घडवून आणला.

एका दशकाहून अधिक काळानंतर, ३७ वर्षीय रोहित पुन्हा रांचीमध्ये प्रवेश करतो,

### भारत-दक्षिण आफ्रिका पहिला वन-डे सामना

**स्थळ** : जेएससीए आंतरराष्ट्रीय स्टेडियम, रांची
**वेळ** : दुपारी १.३० वाजतापासून
**थेट प्रसारण** : स्टार स्पोर्ट्सवर





यावेळी घरच्या कसोटी मालिकेत पराभव झाल्यानंतर भारतीय संघ पुन्हा नव्याने सुरुवात करण्याचा प्रयत्न करत असताना वेगळ्या प्रकारचे पुनरुज्जीवन शोधत आहे.

भारतासाठी, एकदिवसीय मालिका पुढील वर्षी मायदेशात होणाऱ्या टी-२० विश्वचषकाच्या छायेखाली होत आहे. ही स्पर्धा नेहमीच निवड प्राधान्ये ठरवेल.

**अस्थिर फलंदाजी क्रम**

कसोटी मालिकेपाठोपाठ याएकदिवसीय मालिकेतही भारताच्या एकादश संघात अनेक वरिष्ठ खेळाडू अनुपस्थित असल्यामुळे संघ स्थिरावलेला नाही.

जसप्रीत बुमराह व मोहम्मद सिराजला विश्रांती देण्यात आली आहे, तर नियमित कर्णधार शुभमन गिल आणि श्रेयस अय्यर दुखापतींमुळे त्रस्त आहेत. त्यांच्या अनुपस्थितीमुळे संघ कमकुवत होतेच, शिवाय हंगामी कर्णधार के. एल. राहुल आणि मुख्य प्रशिक्षक गंभीर यांनाही भूमिका आणि जबाबदाऱ्यांमध्ये तडजोड करावी लागते. मधल्या फळीचा प्रश्न आणखी नाजूक आहे. व्यवस्थापनाने वॉशिंग्टन सुंदरला अष्टपैलू खेळाडू म्हणून पाठिंबा द्यायचा की आक्रमक फलंदाज नितीश कुमार रेड्डीला, हे ठरवावे लागेल.

तिलक वर्मावर सुद्धा धावा करण्याचा विश्वास ठेवता येईल. अंतिम एकादशमध्ये ऋषभ पंतला संधी मिळेल का हे सुद्धा बघणे शिल्लक आहे.

बुमराहच्या अनुपस्थितीत गोलंदाजीची जबाबदारी प्रसिध कृष्णा, अर्शदीप सिंग, हर्षित राणा आणि कुलदीप यादव यांच्यावर असेल.

या वन-डे मालिकेतील दुसरा सामना बुधवार, ३ डिसेंबर रोजी रायपूर येथे, तर तिसरा सामना शनिवार ६ डिसेंबर रोजी विशाखापट्टणम् येथे खेळविला जाणार आहे. (वृत्तसंस्था)

### गंभीरच्या कामगिरीवर लक्ष केंद्रित

मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर सुद्धा या मालिकेत छाननीखाली येतात, मात्र त्यांचा करार २०२७ च्या विश्वचषकापर्यंत असल्यामुळे त्यांचे मुख्य प्रशिक्षकपद धोक्यात नाही. कसोटी पराभवानंतर त्यांच्या व्यूहरचना व संघ निवडींवर प्रश्नचिन्हे उपस्थित करण्यात आले. त्यांनी पदभार स्वीकारल्यानंतरचे त्यांचे हे दुसरे मोठे अपयश आहे. ही एकदिवसीय मालिका गंभीरसाठी वातावरण स्थिर करण्याची एक महत्त्वाची संधी आहे.

### आत्मविश्वासू दक्षिण आफ्रिका, एक धोकादायक संघ

कसोटी मालिकेतील विजयानंतर दक्षिण आफ्रिका संघ मोठ्या आत्मविश्वासाने भारताविरुद्धच्या एकदिवसीय क्रिकेट मालिकेत उतरेल. ते सुद्धा वन-डे क्रिकेटमध्ये आपल्या विजयाची लय कायम राखण्यास उत्सुक असेल.

कॅगिसो रबाडा वॲनरिच नॉर्टजेच्या अनुपस्थिती असूनही, दक्षिण आफ्रिका संघाला कसोटी मालिकेतून मिळालेला आत्मविश्वास वन-डे मालिकेत फायदेशीर ठरेल.

कर्णधार टेम्बा बावुमा याच्यासाठी एकदिवसीय मालिकेतील हा टप्पा दक्षिण आफ्रिकेच्या वन-डे क्रिकेटमध्ये प्रगतीला बळकटी देण्याची संधी देतो.

वरिष्ठ वेगवान गोलंदाजांच्या अनुपस्थितीमुळे गेराल्ड कोएत्झी आणि नांद्रे बर्गर यासारख्या खेळाडूंना भारतीय परिस्थितीत जबाबदारी स्वीकारण्याची संधी मिळते, तर डावखुरा फिरकी गोलंदाज केशव महाराज पुन्हा एकदा दक्षिण आफ्रिकेच्या सामन्यांच्या नियंत्रणात मध्यवर्ती भूमिका बजावेल.

फलंदाजी विभागामध्ये क्विंटन डी कॉकचा अनुभव, बावुमाची सूत्रसंचालक भूमिका आणि मॅथ्यू ब्रीट्झके, डेव्हाल्ड ब्रेव्हिस आणि टोनी डी झोर्झी यांच्या गतिमान मधल्या फळीतील उपस्थितीमुळे स्थिरता दिसून येते.

# मुंबई-बंगळुरू यांच्यात सलामीचा सामना

## चौथा महिला प्रीमियर लीग हंगाम ९ जानेवारीपासून

**◆ मुंबई, २९ नोव्हेंबर**

चौथा महिला प्रीमियर लीग हंगाम ९ जानेवारी २०२६ पासून प्रारंभ होणार आहे. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील गतविजेत्या मुंबई इंडियन्सचा सलामीचा सामना ९ जानेवारी रोजी नवी मुंबईतील डी. वाय. पाटील स्टेडियमवर २०२४ च्या विजेत्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूशी होईल.

२८ दिवसांचा, २२ सामन्यांचा डब्ल्यूपीएल दोन ठिकाणी खेळवला जाईल.

स्पर्धेतील पहिल्यांदाच, डब्ल्यूपीएलचा अंतिम सामना आठवड्याच्या शेवटी होणार नाही, गुरुवार (५ फेब्रुवारी) रोजी अंतिम सामना होणार आहे, ज्यामुळे भारत आणि श्रीलंकेत त्याच आठवड्यात सुरू होणाऱ्या पुरुषांच्या टी-२० विश्वचषकाशी टक्कर होण्याची शक्यता आहे. टी-२० विश्वचषक ७ फेब्रुवारी (शनिवार) रोजी कोलंबोमध्ये पाकिस्तान आणि नेदरलॅण्ड यांच्यातील सामन्याने सुरू होईल.

शनिवारी जाहीर झालेल्या वेळापत्रकानुसार, भारताने या महिन्याच्या सुरुवातीला दक्षिण आफ्रिकेवर एकदिवसीय विश्वचषक जिंकून आयसीसी महिलांच्या पहिल्या जागतिक विजेतेपदाचे साक्षीदार असलेल्या डी. वाय. पाटील स्टेडियममध्ये १० आणि १७ जानेवारी रोजी दुपारी दोन सामन्यांसह पहिले ११ सामने खेळवले जातील. या साखळी फेरीतील उर्वरित सर्व सामने



सायंकाळी खेळवले जातील.

त्यानंतर लीग वडोदरा येथील कोटाम्बी स्टेडियममध्ये हलवली जाईल, तिथे २ फेब्रुवारी रोजी एलिमिनेटर आणि ५ फेब्रुवारी रोजी अंतिम सामना यासह उर्वरित ११ सामने खेळवले जातील.

मुंबई इंडियन्स, रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू, यूपी वॉरियर्स, गुजरात जायण्ट्स आणि दिल्ली कॅपिटल्स हे पाच संघ डबल राऊंड-रॉबिनमध्ये एकमेकांशी दोनदा खेळतील.

सर्वोच्च संघ थेट अंतिम फेरीत पोहोचेल, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या क्रमांकावरील संघ उर्वरित स्थानासाठी एलिमिनेटरमध्ये आमने-सामने येतात.

मुंबई इंडियन्सने तीन हंगामात दोन विजेतेपदे जिंकली आहेत, ज्यामध्ये २०२४ मध्ये आरसीबीने ट्रॉफी जिंकली होती. दिल्ली कॅपिटल्सने तिन्ही आवृत्त्यांमध्ये उपविजेतेपद पटकावले आहे, तर गुजरात जायण्ट्स आणि यूपी वॉरियर्स अद्याप अंतिम फेरीत पोहोचलेले नाहीत. (वृत्तसंस्था)

### महिला प्रीमियर लीग हंगाम ४ चे वेळापत्रक

**नवी मुंबईत** : ९ जानेवारी : मुंबई इंडियन्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू; १० जानेवारी : यूपी वॉरियर्स विरुद्ध गुजरात जायण्ट्स व मुंबई इंडियन्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स; ११ जानेवारी : दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध गुजरात जायण्ट्स; १२ जानेवारी : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध यूपी वॉरियर्स; १३ जानेवारी : मुंबई इंडियन्स विरुद्ध गुजरात जायण्ट्स; १४ जानेवारी: यूपी वॉरियर्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स; १५ जानेवारी : मुंबई इंडियन्स विरुद्ध यूपी वॉरियर्स; १६ जानेवारी: रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध गुजरात जायण्ट्स; १७ जानेवारी : यूपी वॉरियर्स विरुद्ध मुंबई इंडियन्स आणि दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू

**बडोदा येथे** : १९ जानेवारी : गुजरात जायण्ट्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू; २० जानेवारी : दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध मुंबई इंडियन्स; २२ जानेवारी : गुजरात जायण्ट्स विरुद्ध यूपी वॉरियर्स; २४ जानेवारी : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स; २६ जानेवारी : रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू विरुद्ध मुंबई इंडियन्स; २७ जानेवारी : गुजरात जायण्ट्स विरुद्ध दिल्ली कॅपिटल्स; २९ जानेवारी : यूपी वॉरियर्स विरुद्ध रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू; ३० जानेवारी : गुजरात जायण्ट्स विरुद्ध मुंबई इंडियन्स; १ फेब्रुवारी : दिल्ली कॅपिटल्स विरुद्ध यूपी वॉरियर्स. **एलिमिनेटर** : ३ फेब्रुवारी; अंतिम सामना : ५ फेब्रुवारी (दोन्ही बडोदा येथे)

# उमा महाविद्यालयात आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धा

**संस्था सचिव भट्टड यांच्या हस्ते उद्घाटन**

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२९ नोव्हेंबर-**

येथील उमा महाविद्यालयात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन तायक्वांदो स्पर्धा संपन्न झाल्या.

या स्पर्धेचे उद्घाटन संस्थेचे सचिव राजगोपाल भट्टड यांनी केले. यावेळी माजी प्राचार्य, संस्थेचे विश्वस्त डॉ. मिलिंद परिचारक उपस्थित होते. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. धीरजकुमार बाड यांनी केले. प्रा. विजय पवार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, प्राचार्य डॉ. भोसले, पु.अ.हो.सो.विद्यापीठ सोलापूर स्पोर्ट्स कौन्सिलचे सचिव प्रा. सुहास व्हनमाने आदी उपस्थित होते.

या स्पर्धेत शहर व जिल्हयातील विविध महाविद्यालयातून ५० महिला तर ७७ पुरुष अश्या १२७ खेळाडूंनी सहभाग नोंदविला. स्पर्धा यशस्वी पार पाडण्यासाठी प्राचार्य डॉ.धीरजकुमार बाड, शारीरिक शिक्षण संचालक डॉ.आनंद ढवण, प्रा.तानाजी घाडगे, कार्यालयीन अधीक्षक सज्जन लोंढे, पैगंबर शेख, तुकाराम लोखंडे, ज्ञानेश्वर देवमारे, शंकर रोंगे आदींचे सहकार्य लाभले.

# बार्शीच्या सुयश विद्यालयात क्रीडा महोत्सव



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**

येथील सुयश विद्यालयात क्रीडा महोत्सवाचा भव्य शुभारंभ शनिवारी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

या क्रीड महोत्सवाचे उद्घाटन बार्शी शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक बालाजी कुकडे, सुरज ढमढेरे, पोलीस कॉन्स्टेबल बालाजी नागरगोजे तसेच संस्थेचे संस्थापक शिवदास नलवडे यांच्या उपस्थितीत झाले.

कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या स्वागतासाठी विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या आकर्षक एरोबिक्स नृत्य प्रस्तुतीने झाली. त्यानंतर महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन करुन महोत्सवाची औपचारिक सुरुवात करण्यात आली.

आपल्या मनोगतात बोलताना पोलीस निरीक्षक कुकडे यांनी सुयश विद्यालयात क्रीडा क्षेत्राला दिले जाणारे महत्त्व पाहून आपण भारावून गेल्याचे सांगितले. तसेच विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत त्यांनी शकुंतला टर्फ ग्राउंडवर फुटबॉल स्पर्धेचे उद्घाटन करुन क्रीडा महोत्सवाचा प्रारंभ केला. सुयश विद्यालयाच्या या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये क्रीडाभावना, संघभावना आणि शिस्तीचे महत्त्व अधिक दृढ झाल्याचे पाहुण्यांनी नमूद केले.

प्रास्ताविक क्रीडाशिक्षक जाधव यांनी केले. सूत्रसंचालन सौ. साखरे यांनी कौशल्यपूर्णरीत्या पार पाडले. क्रीडा महोत्सव यशस्वी करण्यासाठी जाधव आणि सर्व सहशिक्षकांनी सहकार्य केले.



# आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालय उपविजेता

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

शालेय शहर आट्यापाट्या स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाने १४ वर्षांखालील मुलींच्या गटात उपविजेतेपद संपादिले. त्यांना क्रीडा शिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, मुख्याध्यापिका स्मिता रणदिवे, सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले आहे.

**उपविजेता संघ** : साक्षी धंगेकर, श्रेया मिरजकर, समृद्धी मस्के, लक्ष्मी शिंदे, ऐश्वर्या भिगोळी, अनन्या माटूर, तृप्ती कोळी, समिक्षा जानराव, सलक्षा भिंगोळी, पुर्वा बारामतीकर, सिद्धी धोत्रे.



# जिल्हा परिषद बीट क्रीडा स्पर्धेत उपळाई शाळेस दुहेरी मुकुट

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ नोव्हेंबर-**

न्यू हायस्कूल पिंपळवाडी येथे झालेल्या जिल्हा परिषद बीट क्रीडा स्पर्धेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा नंबर २ उपळाई (ठों) शाळेने उल्लेखनीय कामगिरी केली. कबड्डी लहान गट मुली व लंगडी मोठा गट मुलीनेही बीटमध्ये विजेतेपद पटकाविले.

त्यांचे मुख्याध्यापक अनिल काळे, शिक्षक प्रभाकर काटे, आनंद घाडगे, रामचंद्र बरचे, हरिभाऊ दळवी, वैशाली खुने, बेबीनंदा खडबडे, सुवर्णगौरी शिंदे, मीरा गरड, दिपाली गोरे, विस्तार अधिकारी धनाजी जाधवर, केंद्रप्रमुख विलास काळे, शिवाजी कांदे यांनी अभिनंदन केले आहे.

**अन्य कामगिरी** : १०० मीटर धावणे : लहान गट : सोहम विनोद काळे व ईश्वरी कैलास भोरे (प्रथम ). २०० मीटर धावणे : लहान गट : समृद्धी सचिन शिंदे (प्रथम). मोठा गट : संघर्ष सतीश वाघ (प्रथम).




# लिटल स्टार स्कूलमध्ये क्रीडा सप्ताह

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

कुमठे येथील लिटल स्टार इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये वार्षिक क्रीडा सप्ताहास सुरुवात झाली. विद्यार्थ्यांनी विविध खेळांमध्ये उत्स्फूर्त सहभाग नोंदवत आपले कौशल्य आणि जिद्द याची झलक दाखवली. याचे उद्घाटन संस्थेचे विश्वस्त जयकुमार माने, विश्वस्त स्वाती माने यांच्या हस्ते झाले.

यावेळी मुख्याध्यापक जयसिंग गायकवाड व मुख्याध्यापिका मोरे उपस्थित होते. मुख्याध्यापिका शुभांगी पवार यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे नियोजन व समन्वयक मलकरी कोरे यांच्या देखरेखीखाली करण्यात आले. क्रीडा सप्ताहात कबड्डी, संगीत खुर्ची, १०० मीटर धावणे, गोळाफेक, लांब उडी, थ्रो बॉल अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी या प्रत्येक स्पर्धेत उत्कृष्ट खेळकौशल्य दाखवले. मुख्य आकर्षण ठरलेल्या मार्च पास्टचे नेतृत्व अक्षय जमादार यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सतीश चव्हाण यांनी केले. क्रीडा शिक्षक विक्रम पवार यांनी मार्गदर्शन केले. समारोप कार्यक्रमात विविध स्पर्धांतील विजेत्यांना पारितोषिक वितरण करण्यात आले. अनघा कौजलगी यांनी आभार केले.

# इंडियन मॉडेल स्कूलच्या चौघांची विभागीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी निवड



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

शालेय शहर लॉन टेनिस स्पर्धेतून इंडियन मॉडेल स्कूल सीबीएसईच्या चौघांची विभागीय लॉन टेनिस स्पर्धेसाठी निवड झाली.

शहर स्पर्धेत १४ वर्षाखालील गटात उन्नती इंगोले हिने तृतीय व श्रीशा सूर्यवंशी हिने चौथा क्रमांक मिळवला. १७ वर्षाखालील गटात पलक कोल्हापुरे हिने तृतीय व धैर्य गोरे ह्याने पाचवा क्रमांक संपादिला. सर्वांची विभागीय स्पर्धेकरिता निवड झाली. त्यांना क्रीडा शिक्षक राजकुमार माने व वैष्णवी गडदे यांचे मार्गदर्शन मिळाले. त्यांचे संस्थापक अध्यक्ष ए. डी. जोशी, सचिव अमोल जोशी, श्री साई महिला प्रतिष्ठानच्या सचिवा सायली जोशी, मुख्याध्यापिका अपर्णा कुलकर्णी, ममता बसवंती, अचला राचर्ला यांनी अभिनंदन केले.

# सार्थक कोल्हापूरे जलतरण स्पर्धेत द्वितीय

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**



दलित मित्र कदम गुरुजी महाविद्यालय मंगळवेढा येथे झालेल्या महाविद्यालयीन जलतरण स्पर्धेत संगमेश्वर रात्र महाविद्यालयाच्या सार्थक कोल्हापुरे याने ५० मीटर ब्रेस्ट स्ट्रोक, ५० मीटर फ्रीस्टाइल आणि ५० मीटर बटरफ्लायमध्ये द्वितीय स्थान मिळविले. तसेच सार्थकने वेस्ट बंगाल येथे झालेल्या ७९व्या ओपन वॉटर लाँग डिस्टन्स स्विमिंग स्पर्धेतही १९ किलोमीटर जलतरण पूर्ण केले. त्यास शारीरिक शिक्षण संचालक प्रा. शरण वांगी यांचे मार्गदर्शन लाभले.

# सुशीलकुमार शिंदे बीपीएडची साक्षी सुरवसे उपविजेती

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**



पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन तायक्वोंदो स्पर्धेत श्री सुशीलकुमार शिंदे कॉलेज ऑफ फिजिकल एज्युकेशनच्या साक्षी सुरवसे हिने ४६ किलो गटातून उपविजेतेपद संपादिले. तिचे संस्थेचे अध्यक्ष सुभाष चव्हाण, उपाध्यक्ष विवेक चव्हाण, प्राचार्या डॉ. कलाश्री देशपांडे, प्रा.नागनाथ पुदे. प्रा.विजय तरंगे, सुनील राठोड, अनिल राठोड यांनी अभिनंदन केले.

# महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजला सर्वसाधारण उपविजेतेपद

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन मैदानी स्पर्धेत संगमेश्वर कॉलेजने सर्वसाधारण उपविजेतेपद पटकावले.

या खेळाडूंना शारीरिक शिक्षण संचालक डॉ. आनंद चव्हाण, शारीरिक शिक्षण शिक्षक प्रा.संतोष खेंडे, प्रा. विक्रांत विभुते व प्रा.शरणबसवेश्वर वांगी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्री संगमेश्वर एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन धर्मराज काडादी, सचिव ज्योती काडादी, शैक्षणिक सल्लागार पी.एम. दर्गो पाटील, प्राचार्य डॉ. ऋतुराज बुवा, उपप्राचार्य प्रसाद कुंटे आदींनी अभिनंदन केले.

**कामगिरी : पुरुष** : विनित फ्रँकलिन दिनकर (१०० मी. धावणे-१०.३९ सेकंद, २०० मी धावणे-२१.४३ सेकंद, ४ बाय १०० मीटर रिले-तीन सुवर्ण). सचिन बसवराज मायनळे (४०० मी. अडथळा १.०२ मिनिटे-सुवर्ण, लांब उडी ५.७८ मी.-रौप्य, ४ बाय १०० मी. रिले- सुवर्ण). राहुल राजेश घारगे (४ बाय १०० मीटर- सुवर्ण). निरंकार राहुल काळे (४ बाय१०० मीटर रिले-सुवर्ण). जुबेर शेख (उंच उडी १.४२ मी.-कांस्य).

**महिला** : प्रतीक्षा जयंत दसुर (लांब उडी-



तृतीय, ४ बाय ४००-सुवर्ण, ४बाय१००-सुवर्ण).

मानसी नारायण महाडिक (४ बाय १००-सुवर्ण). श्रद्धा संतोष तळभांडारे (भालाफेक-सुवर्ण). स्नेहा नागेश तुरेराव (४ बाय ४०० सुवर्ण), श्रावणी माने (४ बाय ४००-सुवर्ण). ४ बाय १०० (सुवर्णपदक), तेजस्विनी गोयल ( ४ बाय ४००, ४ बाय १००-सुवर्ण).

CMYK
सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### अरणच्या खंडोबा यात्रेची कुस्त्याने सांगता; चार तास दोनशे कुस्त्यांचा रंगला फड

**मोडनिंब, दि.२९ नोव्हेंबर-**

अरण (ता. माढा) येथील ग्रामदैवत श्री खंडोबा यात्रेची सांगता कुस्तीच्या फडाने झाली. चार तास रंगलेल्या या फडात सुमारे २०० कुस्त्या खेळवण्यात आल्या. यामध्ये शेवटची कुस्ती प्रसाद दंडे विरुद्ध पांडुरंग केदार यांच्यामध्ये झाली. सालाबाद प्रमाणे येथील यात्रेत देवाला तेल लावणे, देवाचे लग्न, जागरण गोंधळ, देवाच्या रथाची मिरवणूक असे धार्मिक कार्यक्रम उत्साहात झाले. मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. पारंपरिक गजीढोल खेळाचा आनंद अबल वृद्धांनी घेतला. शुक्रवारी सायंकाळी कुस्तीच्या फडाला सुरुवात झाली. लहानांपासून मोठ्या मल्लांच्या दोनशे कुस्त्या या फडांमध्ये चार तास रंगल्या. निकाली कुस्त्यांची परंपरा फडाने जोपासली. कुस्त्यांच्या फडाचे पूजन मोडनिंबचे कुरण गिड्डे, बालाजी पाटील, चंद्रकांत गिड्डे, भारत शिंदे, दीनानाथ घाडगे, किसन जाधव, महादेव घाडगे यांच्या हस्ते झाले. यावेळी रामचंद्र घाडगे, दीपक कुलकर्णी, विठ्ठल भालेराव, किसन गोंडावळे, शंकर रणदिवे, संजय पाटील यासह मान्यवर उपस्थित होते. या कुस्त्यांसाठी अरण, ढवळस, टेंभुर्णी, पंढरपूर, अकलूज, निमगाव,माळशिरस, वेळापूर, पाटकुल, कंदर, वाखरी, इंदापूर, जेऊर, गार अकोले येथील मल्लांची उपस्थिती होती. पै.बालाजी रणदिवे, पै. बंडू रणदिवे, सुरेश भापकर, सागर जाधव, विठ्ठल मिस्कीन, धनाजी भोसले यांनी पंच म्हणून काम पाहिले. यशवंत शिंदे, सावता घाडगे, नवनाथ कांबळे, सागर घाडगे, समाधान जाधव आणि कुस्त्यांचा फड व यात्रा यशस्वी करण्यासाठी प्रयत्न केले. निवेदन मदने व सतीश घाडगे यांनी केले.

### अल्पवयीन मुलीकडे पाहून अश्लील कृत्य केल्याप्रकरणी चौघांविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

घराच्या पाठीमागे मोकळ्या जागेत १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी व तिची लहान बहिण लघुशंकेसाठी गेली असता तिच्याकडे वाईट नजरेने पाहून तिच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करुन शिवीगाळी करीत लोखंडी गजाने मारहाण केल्याप्रकरणी सम्राट भिवाजी लंगडे,भिवाजी शंकर लंगडे,रुक्मिणी भिवाजी लंगडे,शंकर नाना लंगडे या चौघा विरुध्द मंगळवेढा पोलीसात गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनी दिलेली माहिती अशी,यातील फिर्यादी १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी व तिची लहान बहिण दि.२९ रोजी सकाळी ६.३० वाजता राहत्या घराच्या पाठीमागी मोकळ्या जागेत लघुशंका करण्यासाठी गेल्या असता वरील आरोपीने सदर ठिकाणी येवून पिडीतेस हातवारे इशारा करुन वाईट नजरेने बघून एकांत पणाचा भंग केला. सदर घटनेनंतर पिडीता ही सम्राट लंगडे यांच्या घरी समजावून सांगण्यासाठी गेली असता आरोपीने लोखंडी गजाने,कुर्‍हाडीने,काठीने मारहाण करुन शिवीगाळी केली असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. तपास पोलीस उपनिरीक्षक नागेश बनकर हे करीत आहेत.

### कचरेवाडी शिवारात वाहनाच्या धडकेत एकाचा मृत्यू; वाहन चालकाविरुध्द गुन्हा

**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

मंगळवेढा-आंधळगाव मार्गावरील कचरेवाडी हद्दीत भरधाव वेगातील चारचाकी गाडीने मोटर सायकलवरील शिवाजी येसाप्पा माने (वय ४३,रा.कचरेवाडी) यांना जोराची धडक दिल्याने ते ठार झाले. त्यांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी चालक सचिन अशोक पिशवीकर (रा.नागाळा पार्क कोल्हापूर)विरुध्द गुन्हा दाखल झाला आहे. पोलीस सुत्रांनुसार, दि.२८ रोजी दुपारी ४ वाजता मंगळवेढा ते आंधळगाव रोडवर कचरेवाडी शिवारात एम.एच.०९ एफ जे. १४४४ या चारचाकीचे चालक तथा आरोपी याने भरधाव वेगात गाडी चालवून मोटरसायकल एम.एच.४५ बी.सी. ४८६० हिस जोराची धडक दिल्याने मोटर सायकलस्वार गंभीर जखमी झाला. प्रथमत: मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात उपचारास दाखल केले असता तेथील डॉक्टरांनी उपचारापुर्वीच मयत झाले असल्याचे सांगितले. सदर मोटर सायकलवरील रोहन काशिद व अशपाक शेख हे जखमी झाल्याने ते उपचार घेत आहेत. या अपघाताचा तपास पोलीस करीत आहेत.

## निधन वार्ता...

### इक्बाल मुल्ला



**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

तेलंगी पाच्छा पेठ, जिजामाता दवाखानाजवळील रहिवासी इक्बाल अब्दुल सत्तार मुल्ला (वय ७० वर्षे) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा उद्या रविवार ३० नोव्हेंबर रोजी सकाळी १० वाजता त्यांच्या निवासस्थानापासून निघणार असून जडेसाब कब्रस्तान येथे जाणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुली, एक मुलगा, सुना, जावाई, नातवंडे असा परिवार आहे.

### भारत घोडके



**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

भागाईवाडी (ता. उत्तर सोलापूर) येथील ग्रामपंचायताचे माजी सदस्य भारत नरसिंह घोडके यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे ७२ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, नातू, भाऊ, भावजय असा मोठा परिवार होता. गावातील सामाजिक, सांस्कृतीक, उपक्रम, पाणी फौऊडेशन, स्वच्छता अभियान यामध्ये त्यांचा सदैव सहभाग राहिला. सोमवार दि. १ डिसेंबर रोजी सकाळी तिसरा दिवसाचा विधी होणार आहे

### फुलचंद पवार



**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

बसवेश्वर नगर देगाव येथील फुलचंद रामा पवार (वय ७२) यांचे शुक्रवारी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे. देगाव येथील प्रगतशील शेतकरी चंद्रकांत कराळे यांचे ते गेल्या ५० वर्षांपासूनचे सालगडी होते.

# अक्कलकोटमध्ये करणार एमआयडीसी; युवकांना देणार रोजगार

### उद्योगमंत्री सामंत यांचे आश्वासन अक्कलकोटमध्ये झाली प्रचारसभा

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ नोव्हेंबर-**

अक्कलकोटच्या विकासासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना ४०० कोटींचा विकास आराखडा मंजूर केला. आता अक्कलकोटचा विकास होण्यासाठी दुधनी आणि अक्कलकोटमध्ये एमआयडीसीसाठीची मंजुरी देणार असल्याचे आश्वासन उद्योगमंत्री उदय सामंत यांनी केले. शिवसेनेचे उमेदवार रईस टिनवाला व दुधनी नगराध्यक्षपदाचे उमेदवार प्रथमेश म्हेत्रे यांना विजयी करण्याचे आवाहनही त्यांनी केले.

शिवसेना शिंदे गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार टिनवाला दुधनी नगराध्यक्षपदाचे शिवसेनेचे उमेदवार प्रथमेश इंगळे व इतर उमेदवारांच्या प्रचारार्थ शुक्रवारी उद्योग मंत्री सामंत यांची श्री मल्लिकार्जून मंदिरा शेजारी जाहीर सभा झाली. यावेळी माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे,




शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा संपर्कप्रमुख महेश साठे, जिल्हाप्रमुख अमर पाटील, महिला आघाडीच्या नेत्या अनिता माळगे, अक्कलकोट नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रईस टिनवाला, दुधनी नगराध्यक्ष पदाचे उमेदवार प्रथमेश म्हेत्रे, प्रियंका परांडे, जिल्हा उपप्रमुख सुनिल कटारे, वर्षा चव्हाण, वैशाली हावनूर, स्वामीनाथ हेगडे व शिवसेनेचे सर्व नगरसेवक पदाचे उमेदवार उपस्थित होते. पुढे बोलताना उद्योग मंत्री सामंत म्हणाले, अडीच-तीन वर्षांपूर्वी सध्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे राज्याचे मुख्यमंत्री होते. त्यावेळी त्यांनी श्री स्वामी समर्थांच्या भक्तांना सोयी सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी ४०० कोटी रुपयांचा निधी मंजूर केला. इतका मोठा निधी येऊनही अक्कलकोट शहरातील कामे अर्धवट आहेत. कदाचित टक्केवारीचा हिशोब व्यवस्था व्यवस्थित झाली नसेल. अर्धवट कामे करणाऱ्या अर्धवट लोकांना नगरपरिषदेपासून दूर ठेवण्याची जबाबदारी ही मतदारांची आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी राज्यातील २ कोटी ४० लाख महिलांना लाडकी बहीण योजनेद्वारे मदत केली. अक्कलकोटमध्ये मी माझ्या विभागातर्फे उद्योग व्यवसाय देणार आहे. शिवसेनेचा उमेदवार विजयी होणार आहे. पुढच्या १५ दिवसात मी पुन्हा अक्कलकोट येथे येईल माझ्यासोबत माझ्या विभागाचे अधिकारी घेऊन येईन. अक्कलकोट मधील किमान ५०० मुला-मुलींना पुढील पाच वर्षात स्वतःच्या पायावर उभे करणार आहे. मुख्यमंत्री रोजगार विभागामार्फत उद्योगास ३० टक्के सबसिडी आहे. शिवसेना हा पक्ष सर्व जाती धर्मांना सोबत घेऊन चालणारा पक्ष आहे. जे देशावर, राज्यावर, गावावर प्रेम करणारे लोक आहेत ते आपलेच आहेत. विकासासाठी आपण रईस टिनवाला यांना एकदा संधी द्यावी असे सामंत यांनी यावेळी आवाहन केले. दुधनी व अक्कलकोट मध्ये एमआयडीसी व्हावी ही माजी मंत्री म्हेत्रे यांची मागणी आहे. त्यानुसार मंजुरी देईन. कामासाठी मंत्र्यावर दादागिरी करा. माजी मंत्री म्हेत्रे, श्री.साठे, श्री.पाटील यांचेही भाषण झाले. शिवसेनेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.


# कासेगांवात आजपासून गाथा पारायण व अखंड हरिनाम सप्ताह

### संत सावता माळी मंदिर वर्धापन तसेच वै. श्रीगुरू सोपानकाका देहूकर पुण्यतिथीनिमित्त आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**कासेगाव,दि.२९ नोव्हेंबर-**

कासेगाव (ता.दक्षिण सोलापूर) येथील श्रीसंत सावता माळी मंदीर वर्धापन तसेच जगद्गुरू तुकोबारायांचे वंशज वै. श्रीगुरू सोपानकाका देहूकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त दि. ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर दरम्यान श्रीसंत तुकाराम महाराज गाथा पारायण तसेच अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याची सुरूवात रविवारी सकाळी साडेसात वाजता हभप नरसू वाडकर यांच्या हस्ते वीणा व ग्रंथपूजनाने होणार असल्याची माहिती श्रीसंत सावता माळी मंदिर समितीचे अध्यक्ष हभप दत्तात्रय काटकर गुरूजी यांनी दिली.

येथील माळी गल्ली भागातील श्रीसंत सावता माळी मंदिरात हा सोहळा होणार आहे. यंदाचे २१ वे वर्ष आहे. हा





सोहळा वै. हभप मधुकर महाराज जोशी यांच्या कृपाशिर्वादाने व जगद्गुरू श्रीसंत तुकोबारायांचे विद्यमान वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न होत आहे. यामध्ये दररोज पहाटे ५ ते ६ काकडा भजन, सकाळी ७ ते १० सामुहिक गाथा पारायण, दु.३ ते ४ गाथा भजन, सायंकाळी ४ ते ५ प्रवचन, सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, रात्री ८.३० ते १०.३० हरिकीर्तन व तदनंतर हरिजागर असे कार्यक्रम होणार आहेत. रविवारी दि.३० रोजी हभप एकनाथ महाराज शिंदे (गंगेवाडी) यांचे प्रवचन तर हभप संजय महाराज पाटील (सोलापूर) यांचे कीर्तन, सोमवारी दि.१ रोजी हभप दादा महाराज रवळे (धोत्री) यांचे प्रवचन तर अखिल भाविक वारकरी मंडळाचे राष्ट्रीय अध्यक्ष हभप सुधाकर महाराज इंगळे (सोलापूर) यांचे कीर्तन, दि.२ रोजी हभप शिवाजी महाराज पोतदार (शेळगी) यांचे प्रवचन तर हभप विलास महाराज भांदरगे (लातूर) यांचे कीर्तन, दि.३ रोजी हभप दत्तात्रय महाराज चव्हाण (हगलूर) यांचे प्रवचन तर हभप माऊली महाराज बचुटे (सोलापूर) यांचे कीर्तन, दि.४ रोजी हभप दत्तात्रय महाराज घायाळ (उळेवाडी) यांचे प्रवचन तर हभप बापूसाहेब महाराज ढगे यांचे कीर्तन, दि. ५ डिसेंबर रोजी हभप मनोज महाराज खलाटे (वडजी) यांचे प्रवचन तर श्रीसंत तुकोबारायांचे वंशज श्रीगुरू कान्होबा महाराज देहूकर यांचे कीर्तन होणार आहे. दि. ६ डिसेंबर रोजी सकाळी ग्रंथदिंडी मिरवणूक होऊन सकाळी ९.३० वाजता हभप श्याम महाराज जोशी यांचे काल्याचे कीर्तन होऊन नामसप्ताहाची सांगता होईल.

**नामसप्ताह काळात पारायणातील वाचकासह भाविकांसाठी तानाजी हेडे, नरसू वाडकर, गोविंद तांबे, महादेव हेडे, रामकृष्ण रोकडे, महेश म्हेत्रे, प्रकाश काळे यांच्यावतीने अल्पोपहार देण्यात येणार आहे. तर ज्ञानेश्वर खारे, चंद्रकांत चौगुले, दत्ता वाडकर, संदिपान काळे, श्रीमंत काळे, प्रभाकर गायकवाड, श्रीमंत मोरे, सोमनाथ मुटकुळे, जनार्दन काळे, कुबेर काळे, अरूण काटकर व ईरप्पा गुरव यांच्या वतीने भोजनाची पंगत देण्यात येणार आहे. अजय ढेकरे, महादेव शिनगारे, मच्छिंद्र काळे, सोमनाथ हेडे, श्रेयश हेडे व हरि चौगुले यांच्यावतीने दररोज कीर्तनानंतर चहाची व्यवस्था करण्यात आली आहे. नामसप्ताहासाठी भागवत माळी व मुकुंद खारे यांच्यातर्फे श्रीफळ तर बबन खारे यांच्या तर्फे वाचकांच्या ग्रंथासाठी वस्त्र देण्यात येणार आहे.**

### सह्याद्रीमध्ये नवागतांचे जल्लोषात स्वागत

**सांगोला :** मेथवडे (ता. सांगोला) येथील सह्याद्री फार्मसी कॉलेजमध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षांमध्ये नव्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारंभ झाला. उदघाटन पाणीवचे प्राचार्य डॉ. स्वप्नील फडे, डॉ. हिंदुराव काळे, संस्थापक अध्यक्ष डॉ.दिलीपकुमार इंगवले, प्राचार्य डॉ.मनोजकुमार पाटील यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने झाले. यावेळी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले. विद्यार्थ्यांनी नृत्यकला सादर करून उपस्थितांची मने जिंकली. प्रा.पी.पी.कोडग यांनी प्रास्ताविक केले. ओंकार हत्तुरे, हर्षद जाधव, काजल देवळे, मनीषा काळे, दीक्षा जाधव, शुभांगी कालिबाग, राबिया इनामदार, निकिता पवार यांनी सुत्रसंचालन केले. प्रा.एस. पी.जोकार यांनी आभार मानले.

# फार्मसी क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करणे गरजेचे : पो.नि. नारायण पवार

### टेंभुर्णीच्या फार्मसी कॉलेजात नवीन विद्यार्थ्यांचे जल्लोषात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२९ नोव्हेंबर-**

ज्यांना करिअर करायचे आहे त्यांना औषधनिर्माण क्षेत्रामध्ये खूप मोठी संधी आहे .फार्मासिस्टच्या हातून समाजाची सेवा आपोआप घडत असते ,फार्मसी क्षेत्रामध्ये विद्यार्थ्यांनी सेवाभावी वृत्तीने काम करणे गरजेचे आहे. दर्जेदार औषधे उत्पादन करण्यासाठी कटिबद्ध राहावे. कोणत्याही आर्थिक आमिषाला बळी न पडता समाजाची सेवा करावी असे प्रतिपादन टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांनी केले आहे.



शनिवारी दि. २९ नोव्हेंबर रोजी एस. व्ही. एस. कॉलेज ऑफ फार्मास्युटिकल एज्युकेशन अँड रिसर्च, टेंभुर्णी येथे नवीन प्रवेशित विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. यावेळी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र ठोंबरे, प्राचार्य कृष्णात ढेकळे, डॉ. नेहा काजळे, महेश ठोंबरे, कृष्णराज नवले, धनंजय मोरे, सदाशिव पवार, हरिश्चंद्र गाडेकर, सुरज देशमुख यांच्यासह डी.फार्मसी, बी.फार्मसी मधील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी डी. फार्मसी व बी. फार्मसी मधील नवीन विद्यार्थ्यांसाठी डान्स, सिंगिंग, फॅशन शो, गेम्स अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. यामधून आर्यन भाजीभाकरे, शंभुराजे पाटील व समर्थ यादव यांना मिस्टर फ्रेशर म्हणून गौरवण्यात आले तसेच मुलींमधून गौरी हुलगे, आर्या गायकवाड, वर्षा रणसिंग, मयुरी घाडगे यांना मिस फ्रेशर या किताबाने गौरवण्यात आले. वरिष्ठ विद्यार्थ्यांनी फ्रेशर्सचे स्वागत करत मैत्री आणि सहकार्याचा संदेश दिला. प्रस्ताविक प्राचार्य डॉ. नेहा काजळे यांनी केले तर धनंजय मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. शितल हजारे, सोनल फुले यांनी केले तर प्रा. रेणुका देशपांडे यांनी आभार मानले.

# १६६ कोटींच्या कामातील भ्रष्टाचाऱ्यांना जेलमध्ये टाकणार : पालकमंत्री गोरे

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२९ नोव्हेंबर-**

कुर्डूवाडीच्या विकासासाठी आजपर्यंत मोठ्या प्रमाणावर निधी दिला. या निधीपैकी १६६ रूपयांच्या निधीचे शहरात कामच झाले नाही. त्यामध्ये भ्रष्टाचार झाला असल्याची माहीती आहे. भूयारी गटारी तर शोधूनही मिळून येत नाहीत. पालिका ताब्यात येताच या सर्व कामाची चौकशी करून जबाबदार मंडळींना जेलमध्येच टाकतो. माझ्या कार्यकर्त्याच्या केसाला जर धक्का लागला तर तुम्हाला सोडणार नाही असा सज्जड दमही यावेळी पोलीसांना उद्देशून देण्यात आला. जनतेच्या एक ना एक पैशाचा हिशोब व केलेली सर्व कामे शोधण्यासाठी निवडणूकीमध्ये भाजपाच्या सर्व उमेदवारांना मताधिक्याने निवडून द्या असे आवाहन पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी केले.

कुर्डुवाडी नगरपालिका निवडणूकीतील भाजप उमेदवारांच्या प्रचारार्थ आयोजित सभेत ते बोलत




होते. यावेळी भाजपाच्या राज्य महिला उपाध्यक्षा रश्मी बागल, आ.सुनील कांबळे, आ. सदभाऊ खोत, प्रांतीक सदस्य अमोल कुलकर्णी, नगराध्यक्षपदाचे उमेदवार माधवी गोरे व सर्व उमेदवार उपस्थित होते.

पुढे बोलताना गोरे म्हणाले, या शहराला स्मार्ट सिटी बनवण्यासाठी भाजपच्या नेतृत्वाखालील पॅनलला निवडून देण्याची आवश्यकता आहे. हे सांगण्यासाठी मी आज याठिकाणी आलो असल्याचे पालकमंत्री गोरे यांनी सांगितले. दहशतीचे राजकारण या शहरात चालणार नाही. भाजप कार्यकर्त्याच्या केसाला जरी धक्का लागला तर कोणाला सोडणार नाही. दमबाजी दहशतीचे राजकारण जिल्ह्यात नाही तर महाराष्ट्रात चालू देणार नाही. त्यामुळे कार्यकर्त्यांनी काळजी करण्याचे कारण नाही. ताकदीने काम करा, बघतो कोण कुठल्या वार्डात जाऊ देत नाही, येऊ देत नाही. या गावात जर गोंधळ झाला. बोगस मतदान झालं तर याद राखा असेही त्यांनी सुनावले.

# यंदाच्या महाराष्ट्र राज्य सांस्कृतिक पुरस्कारांची घोषणा

### पंढरपूरचे हभप ॲड. जयवंत महाराज बोधले यांना युवा कीर्तनकार पुरस्कार; मुंबईत लवकरच वितरण सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ नोव्हेंबर-**



कलेच्या विविध क्षेत्रात ज्या कलाकारांनी प्रदीर्घ काळ सेवा केलेली आहे अशा कलावंतांना राज्य सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. यंदाच्या या पुरस्कारार्थीमध्ये पंढरपूर येथील हभप ॲड. जयवंत महाराज बोधले यांना युवा कीर्तकार पुरस्कार घोषीत झाला आहे.

यामध्ये सुमारे ८३ जणांस विविध क्षेत्रातील उल्लेखनीय कार्यबद्दल गौरविण्यात येणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली. ज्येष्ठ पुरस्कार तीन लाख, युवा पुरस्कार एक लाख, प्रत्येकी मानचिन्ह, सन्मानपत्र, शाल असे या पुरस्कारांचे स्वरुप आहे. पुरस्काराचे वितरण लवकरच मुंबई येथे होणार आहे.

प्रतिवर्षी नाटक, कंठसंगीत, उपशास्त्रीय संगीत, वाद्यसंगीत, मराठी चित्रपट, कीर्तन-समाजप्रबोधन, तमाशा, शाहिरी, नृत्य, लोककला, आदिवासी गिरीजन, कलादान, प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील अभ्यासक, लोकनृत्य, लावणी-संगीतबारी, भारुड-विधीनाटय, वाद्यनिर्मिती, झाडीपटटी, खडीगंमत, दशावतार, नमन खेळे, वहीगायन, दुर्मिळ प्रयोगात्मक कला, प्रयोगात्मक कलेशी संबधित संस्था, ध्वनीतंत्रज्ञ, संगीत संयोजन, व्हाईस ओव्हर या क्षेत्रांमध्ये ज्या कलाकारांनी प्रदीर्घ काळ सेवा केलेली आहे अशा कलावंताना राज्य सांस्कृतिक पुरस्काराने सन्मानित करण्याची घोषणा सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी केली.

**पुरस्कारार्थींची नावे पुढील प्रमाणे आहेत :**

**ज्येष्ठ पुरस्कार- नाटक** - अरुण कदम (२०२५), कंठसंगीत- धनंजय जोशी (२०२५), **वाद्यसंगीत**- विजय चव्हाण (२०२५), **मराठी चित्रपट**- शिवाजी लोटन पाटील (२०२५), **उपशास्त्रीय संगीत**- उदय भवाळकर (२०२५), **किर्तन-समाजप्रबोधन**- गहिनीनाथ औसेकर महाराज (२०२५), **तमाशा**- कोंडीराम आवळे (२०२५), **शाहिरी**- शाहिर मधुकर मोरे (२०२५), **नृत्य**- श्रीमती रंजना फडके (२०२५), **लोककला**- हरिभाऊ वेरुळकर (२०२५), **आदिवासी गिरीजन**- रायसिंग हिरा पाडवी (२०२५), **कलादान**- चंद्रकांत घरोटे (२०२५), **प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील अभ्यासक व पत्रकार**- प्रा. आनंद गिरी (२०२४), संजीव भागवत (२०२५), **लोकनृत्य**- सुभाष नकाशे (२०२४), अरविंद राजपूत (२०२५), **लावणी संगीतबारी**- श्रीमती शकुंतला नगरकर (२०२४), श्रीमती कल्पना जावळीकर ( २०२५), **भारुड/विधीनाट्य/गौळण**- श्रीमती पदमजा कुलकर्णी (२०२४), श्रीमती गोदावरी मुंडे (२०२५), **वाद्यनिर्मिती करणारे कलाकार**- युसुफ घडूलाल मूल्ला (२०२४), भालेराव नागोराव दडांजे (२०२५), **झाडीपट्टी/दंडार/खडीगंमत**- रामदास चौधरी (२०२४), बुधा भलावी (२०२५), **दशावतार/नमन खेळ/वहीगायन**- ओमप्रकाश यशवंत चव्हाण (२०२४), भानुदास शंभा सावंत (२०२५), **दुर्मिल प्रयोगात्मक कला व मौखिक परंपरा जपणारे व त्यांचे जतन, संवर्धन करणाऱ्या व्यक्ती/संस्था**- धर्मा कांबळे (२०२४), श्रीमती साखराबाई टेकाळे (२०२५), **प्रयोगात्मक कलेशी संबंधित संग्रहालय/संस्था**- विश्राम ठाकर आदिवासी कला आंगण चॅरीटेबल ट्रस्ट (२०२५), **तांबवेश्वर शाहिरी कलापथक**- तुकाराम ठोंबरे), बीड (२०२४), **ध्वनीतंत्रज्ञ संकलक/पुरस्कार**- अविनाश ओक (२०२४), महेश अंबेरकर (२०२५), **संगीत संयोजन**- अमर हळदीपूर (२०२४), कमलेश भडकमकर (२०२५), **व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट/निवेदन**- अंबरीश मिश्र (२०२४), उदय सबनीस (२०२५)

**युवा पुरस्कार- नाटक**- तेजश्री प्रधान (२०२४), भूषण कडू (२०२५), **कंठसंगीत**- धनंजय म्हसकर (२०२४), मयुर सुकाळे (२०२५), **वाद्यसंगीत**- ऋषिकेश जगताप (२०२४), वरद कठापूरकर (२०२५), **मराठी चित्रपट**- श्रीमती मधुरा वेलणकर (२०२४), शंतनु रोडे (२०२५), **उपशास्त्रीय संगीत**- राहुल देशपांडे (२०२४), भाग्येश मराठे (२०२५), **किर्तन/समाजप्रबोधन**- जयवंत बोधले (२०२४), ज्ञानेश्वर माऊली कदम (२०२५), **तमाशा**- नितीन बनसोडे (२०२४), श्रीमती अमृता थोरात (२०२५) **शाहिरी**- शाहिर आझाद नाईकवडी (२०२४), शाहिरा अनिता खरात (२०२५), **नृत्य**- श्रीमती वृषाली दाबके (२०२४), संतोष भांगरे (२०२५), **लोककला**- संदिप पाल महाराज (२०२४), चेतन बेले (२०२५), **आदिवासी गिरीजन**- साबूलाल बाबूलाल दहिकर (२०२४), श्रीमती गंगुबाई चांगो भगत (२०२५) **कलादान**- श्रीमती कस्तुरी देशपांडे (२०२४), सिध्देश कलिंगण (२०२५), **प्रयोगात्मक कलेच्या क्षेत्रातील अभ्यासक व पत्रकार**- खंडुराज गायकवाड (२०२४), श्रीमती तेजस्विनी आचरेकर (२०२५), **लोकनृत्य**- दिपक बीडकर (२०२४), गणेश कांबळे (२०२५), **लावणी संगीतबारी**- प्रमिला लोदगेकर ( २०२४), श्रीमती वैशाली वाफळेकर (२०२५), **भारुड/विधीनाट्य/गौळण**- हमीद सय्यद (२०२४), रामानंद उगले (२०२५), **वाद्यनिर्मिती करणारे कलाकार**- उमा शंकर दाते (२०२४), सर्वजीत विष्णू पोळ (२०२५), **झाडीपट्टी/दंडार/खडीगंमत**- मुकेश देशमुख (२०२४), दुधराम परसराम कावळे (२०२५), **दशावतार/नमन खेळ/वहीगायन**- लक्ष्मीकांत नाईक (२०२४), रामकृष्ण कैलास घुळे (२०२५), **दुर्मिल प्रयोगात्मक कला व मौखिक परंपरा जपणारे व त्यांचे जतन, संवर्धन करणाऱ्या व्यक्ती/संस्था**- श्रीमती रेणुका शेंडगे जेजूरीकर (२०२४), प्रसाद गरुड (२०२५), **प्रयोगात्मक कलेशी संबंधित संग्रहालय/संस्था**- सव्यसाची गुरुकुलम- लखन जाधव (२०२४), इतिहासाचे अबोल साक्षिदार बहुउद्देशिय ट्रस्ट (निलेश सकट) (२०२५), **ध्वनीतंत्रज्ञ संकलक/पुरस्कार**- प्रणाम पानसरे (२०२४), विराज भोसले (२०२५), **संगीत संयोजन**- अनुराग गोडबोले (२०२४), अमित पाध्ये (२०२५), **व्हॉइस ओव्हर आर्टिस्ट/निवेदन**- मेघना एरंडे (२०२४), श्रीमती समिरा गुजर(२०२५). वरील सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवरांचे सांस्कृतिक कार्य विभागाचे सचिव डॉ. किरण कुलकर्णी तसेच सांस्कृतिक कार्यमंत्री, ॲड. आशिष शेलार यांनी अभिनंदन केले आहे.

## महत्वाचे...



### महावीर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांची मोमो लघुउद्योग कारखान्यास भेट

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

विकासनगर येथील महावीर हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनी पाखरे मोमो फॅक्टरीला भेट दिली. संचालिका जयश्री पाखरे यांनी मोमो बनविण्यासाठीची संपूर्ण माहिती दिली. त्यांनी स्वत: मोमो बनवून दाखविले. विद्यार्थीनींना मोमो बनविण्यासाठी प्रोत्साहन देऊन त्यांच्याकडून मोमो बनवून घेतले. मोमो लघु उद्योग तसेच कोणत्याही लघु उद्योगासाठी प्रामाणिक कष्ट, सचोटी, स्वच्छता आणि झोकून काम केल्यास आपण यशस्वी होणारच, हे विद्यार्थ्यांच्या मनात बिंबवले. जयश्री पाखरे यांनी विद्यार्थ्यांना मोमो विषयी माहिती दिल्याबद्दल सहशिक्षक राजेंद्र खोत यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यासाठी मुख्याध्यापिका उज्वला पाटील, विजय पाटील, बसवराज बिराजदार, मोहन साळुंखे यांनी परिश्रम घेतले.



### सोजर स्कूलच्या क्रीडा स्पर्धा सुरु

**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**

यशोदा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सोजर इंग्लिश स्कूलच्या हिवाळी स्पर्धांस सुरवात झाली. याचे उद्घाटन हिंदवी समाचारचे संपादक धिरज शेळके मुख्याध्यापिका रिटा नेटके यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. शिक्षक प्रसाद सहस्त्रबुध्दे यांचे हस्ते मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. या क्रीडा स्पर्धा भगतसिंग, सुखदेव, राजगुरु आणि वीर सावरकर अशा चार संघामध्ये खेळवल्या जाणार आहेत. अडथळ्यांच्या शर्यतीची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षक तुषार गदगी आणि अमृता शहा यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वीतेसाठी क्रीडा प्रमुख दिपाली देशमुख यांचे मार्गदर्शन लाभले.

# मंगळवेढ्याच्या ‘त्या’ निकाल प्रकरणी ‘आयोगा’च्या पत्राची पाहावी लागणार वाट

### स्थानिक उमेदवारांची होतेय संभ्रमावस्था

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

मंगळवेढ्याच्या नगराध्यक्ष तिढ्याबाबत जिल्हा प्रशासनाने राज्य निवडणूक आयोगाला ३ दिवसांपूर्वी पाठविलेल्या मार्गदर्शनपर पत्रासाठी अजूनही प्रतिक्षाच करावी लागत आहे. राज्य निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शनपर सुधारित आदेशाची अजूनही माहिती मिळाली नाही. या आदेशाची वाट सोम वारपर्यंत वाट पाहावी लागणार असल्याचे अधिकृत सुत्राकडून समजते.

दरम्यान, मंगळवेढा येथील या प्रकरणामुळे राज्य निवडणूक आयोग कोणत्या प्रकारच्या सूचना देणार? याची भीती निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांना वाटत आहे. यामुळे प्रचारात गुंतलेले उमेदवार जिल्हा प्रशासनाकडून वारंवार माहिती घेत असल्याचे समजते. ज्या जागांसाठी जिल्हा न्यायालयात अपील दाखल असून, सुनावणी प्रलंबित आहे किंवा सुनावणी झालेली आहे. परंतु आदेश अप्राप्त आहेत. निवडणूक पुढे ढकलण्याचा निर्णय निवडणूक आयोगाने घेतला. मात्र या आदेशावर तीव्र पडसाद मंगळवेढ्यात उमटत आहेत. यासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी राज्य निवडणूक आयोगाला पत्र पाठवले असून, सुधारित आदेशाची प्रतीक्षा अजूनही लागून राहिली.



ती शुक्रवारी पूर्ण होण्याची शक्यता होती. मात्र रात्री उशिरापर्यंत सुधारित आदेशाची प्रत मिळालेली नाही. शनिवारीही अशीच संभ्रमावस्था निर्माण झाली आहे. मंगळवेढा नगरपालिका निवडणुकीतील नगराध्यक्ष पदाचे उमेदवार रागिनी कांबळे, सुप्रिया जगताप, सुनंदा आवताडे या तिघी विरोधात पंढरपूर येथील न्यायालयात तीन अपील होते. त्या अपिलाचा निकाल झाला; त्यामध्ये निवडून निर्णय अधिकारी मदन जाधव यांनी दिलेला निकाल कायम ठेवण्यात आला होता. अशाच प्रकारचे विषय राज्यातील काही ठिकाणचे असल्याने त्यांच्याबरोबरच मार्गदर्शनपर सूचना मिळतील अशी माहिती निवडणूक शाखेकडून मिळत आहे.

**११ नगरपरिषद अध्यक्षसाठी ६६, सदस्यसाठी ८९३ रिंगणात**

सध्या जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगर परिषदेसाठी अध्यक्ष पदासाठी ६६ उमेदवार तर सदस्य पदासाठी ८९३ उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी १५२ प्रभागातील २ लाख २२ हजार २४७ महिला, २ लाख २१ हजार १४३ पुरूष आणि इतर मतदार ९४ असे ४ लाख ४३ हजार ४८४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. अनगर ही नगरपालिका अविरोध झाली असून, इतर ३ तालुक्यातही ३ सदस्य बिनविरोध निघाल्याने जिल्ह्यात २० सदस्य आणि १ नगराध्यक्षपदाची बिनविरोध निवड झाली आहे. जिल्ह्यातील ९ तालुक्यातील ११ नगरपरिषदेसाठी २ डिसेंबर रोजी सकाळी ७:३० वाजल्यापासून मतदान प्रकिया पार पडणार आहे.

जिल्ह्यात या निवडणुकीसाठी ४९९ मतदान केंद्र असून, १३२२ बॅलेट युनिट व ६११ कंट्रोल युनिटच्या माध्यमातून मतदान होणार आहे, मतदान प्रकिया शांततेत व व्यवस्थितपणे पार पाडण्यासाठी बूथ निहाय व केंद्र निहाय तीन पोलीस तैनात करण्यात आले आहेत. जवळपास एक हजार पोलिसांचा फौजफाटा आहे. २७०० हुन अधिक प्रशिक्षणार्थी कर्मचारी निवडणूक प्रकियेत सहभागी आहेत. सुरक्षा यंत्रणेच्या देखरेखीखाली दि. ३ डिसेंबर २०२५ रोजी सकाळी १० वाजले पासून मतमोजणी प्रकिया ज्या-त्या ठिकाणच्या गोडाऊन येथे पार पडणार आहे. आता मंगळवेढा येथील त्या निकाल प्रकरणाच्या निवडणूक आयोगाच्या काय मार्गदर्शनपर सूचना येणार? याकडे सर्वांचे लक्ष लागून राहिले आहे.

# अधिवेशन संपताच मनपा निवडणुकीची आचारसंहिता?

**मुंबई, दि. २९ नोव्हेंबर-**

महापालिकांच्या निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. त्यामुळे आता डिसेंबरच्या मध्यावधीत आचारसंहिता जाहीर होऊन जानेवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात निवडणूक होण्याची शक्यता आहे, अशी माहिती महापालिका अधिकाऱ्यांनी दिली. न्यायालयाच्या आदेशानंतर इच्छुकांनी आनंद व्यक्त केला आहे. महापालिकेने निवडणुकीची प्रक्रिया सुरू केली आहे.

प्रारंभी प्रभाग रचना जाहीर केली. त्यानंतर प्रभागनिहाय आरक्षण जाहीर केले. त्यापाठोपाठ प्रारूप मतदार यादीही जाहीर केली. तसेच, हरकतीसूचना घेण्यास सुरुवात केली. मात्र, नागपूर महानगर पालिकेचे आरक्षण हे ५० टक्क्यांच्या वर गेल्याने ५० टक्के आरक्षणाच्या मर्यादेत आरक्षणाची नव्याने सोडत काढण्यात येणार आहे. आरक्षण सोडत निघाल्यानंतर महापालिका निवडणुकीसाठीची आचारसंहिता १५ डिसेंबरदरम्यान लागू होण्याची शक्यता आहे, तर जानेवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या आठवड्यात निवडणूक होण्याची शक्यता आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पूर्वी घ्याव्यात, अशी कालमर्यादा सर्वोच्च न्यायालयाने ठरवून दिली आहे. शिवाय ५० टक्के आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या संस्थांच्या निवडणुकांना स्थगिती नाही, असा आदेशही शुक्रवारी दिला.

# सोलापुरातील उद्योजकांच्या अडचणी सोडविणार : सहसंपर्कमंत्री बनसोडे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**



सोलापुरातील व्यापारी आणि उद्योजकांच्या अडचणी राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या पर्यंत पोचवून त्या समस्या लवकरात लवकर सोडविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी सोलापुरातील व्यापारी, उद्योजकांना दिली.

राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते सुधीर खरटमल यांनी शनिवारी सकाळी ऑफिसर्स क्लब येथे सोलापुरातील व्यापारी आणि उद्योजक तसेच विविध क्षेत्रातील मान्यवरांची बैठक आयोजित केली होती. यावेळी बोलताना व्यापारी व उद्योजकांनी येणाऱ्या अडचणी मांडल्या. या अडचणी शासनदरबारी मांडून सोडविल्या जातील असे अण्णा बनसोडे यांनी उद्योजकांना आश्वासन दिले.

यावेळी शहर जिल्हा अध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे, महिला आघाडी कार्याध्यक्ष चित्रा कदम, युवक प्रदेश सरचिटणीस चेतन गायकवाड प्रतीक चंदनशिवे, माजी नगरसेविका नूतन गायकवाड, शोभा गायकवाड, माजी परिवहन समिती सभापती आनंद मुस्तारे, प्रा.बोळकोठे आदींसह पदाधिकारी उपस्थित होते.




**सोलापूर : बुधवार पेठ परिसरात पीएम ई बस सेवा चार्जिंग स्टेशनचे काम उभारणी युध्दपातळीवर सुरू असून लवकरात लवकर शहरातून इलेक्ट्रिक बसेस धावतील. शनिवारी टिपलेले छायाचित्र.**




| अ. क्र. | विद्यार्थ्यांची नावे | शाळेचे नाव |
|---|---|---|
| १ | सौम्या पाटील | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २ | इश्म सुभेदार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ३ | श्रेया बिराजदार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ४ | श्रावणी जाधव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ५ | स्नेहा देवकते | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ६ | महादेव प्याडसिंगे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ७ | संस्कृत सुतार | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ८ | यशश्री शेंबडे | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| ९ | मेघना कुलकर्णी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १० | गौरी कस्तुरे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ११ | राजलक्ष्मी स्वामी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १२ | लक्ष्मी अलकुंटे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १३ | श्रद्धा माने | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १४ | शिवराज चेंडके | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १५ | गोविंद जाधव | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १६ | शिवम बाचल | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १७ | अथर्व शिंदे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १८ | प्राची गवळी | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| १९ | समृद्धी जाधव | उमाबाई श्राविका महाविद्यालय, सोलापूर |
| २० | चैतन्या गवळी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २१ | राम चव्हाण | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २२ | गौरी गायकवाड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २३ | योगिराज स्वामी | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २४ | रूद्र राठोड | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २५ | परिक्षित कोरचगाव | भारती विद्यापीठ, सोलापूर |
| २६ | शिवराज भोसले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| २७ | सागर सावंत | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| २८ | अनुष्का पांढरे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| २९ | ओंकार व्हनमाने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३० | जयेश येरगळ | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३१ | स्पृहा कळमणकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३२ | आराध्या माशाळा | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३३ | मैथिली माळवदकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३४ | अन्वी कटारे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३५ | सान्वी शिवपुजे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३६ | दुर्वा कुलकर्णी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ३७ | ज्ञानेश्वरी कांबळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३८ | अश्विनी कांबळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ३९ | प्रगती तंबाके | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४० | तेजस्विनी कोळेकर | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४१ | श्रावणी अलकुंटे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४२ | ज्योती खंडागळे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४३ | गौरी वडतीले | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४४ | अर्पिता काकडे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४५ | आदिती खुर्द | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४६ | नम्रता होनकसे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४७ | समर्थ सोनवणे | दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला सोलापूर |
| ४८ | देवाश्री काटीकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ४९ | ईश्वरी बोंदरडे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५० | मान्वी गलाणी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५१ | दिशा माळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५२ | अवनी मुसळे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५३ | स्वरा निस्ताने | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५४ | श्रीया पतंगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५५ | प्राची पवार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५६ | रितिका सायबोलू | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५७ | आरोही शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५८ | स्वरा झेंडगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ५९ | नुमान बागवान | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६० | राजवीर चव्हाण | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६१ | श्रावण गोडसे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६२ | रुद्र होमकर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६३ | रविराज जमादार | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६४ | दक्ष कौटे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६५ | वेदांत मोरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६६ | ताहिद पटेल | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६७ | विपुल रेउरे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६८ | संचिता बारस्कर | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ६९ | वृषभ थोरात | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७० | समर्थ उपाध्ये | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७१ | अनुष्का गजगे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७२ | निशात तांबोळी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७३ | विशाल बिंगी | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७४ | सोहम मरकड | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७५ | निखिल शिंदे | इंडियन मॉडेल स्कुल, सोलापूर |
| ७६ | प्रिती हब्बु | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ७७ | प्रज्ञा गिरी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ७८ | साई कोळी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ७९ | विघ्नेश येमुल | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ८० | असद इनामदार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ८१ | शुभ्रा रंगरेज | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८२ | वैभवी अंबारे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८३ | रिया परिहार | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८४ | कोमल रणपिसे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८५ | तनया खंडेराव | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ८६ | ऋषीकेष मठपती | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ८७ | सिद्धार्थ जमादार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ८८ | वेदांत बिराजदार | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ८९ | वरूण शिंदे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ९० | श्रीगणेश स्वामी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ९१ | प्रणिती पवार | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९२ | प्रिया राठोड | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९३ | श्रद्धा जाधव | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९४ | समृद्धी बंदपट्टे | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९५ | प्रज्ञा माटूर | दयानंद काशिनाथ आसावा प्रशाला सोलापूर |
| ९६ | मयुरी साटवाड | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ९७ | प्रणवी पाटील | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ९८ | विश्वेश्वर स्वामी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| ९९ | अयशी स्वामी | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |
| १०० | अवंतिका अलकुंटे | एस.व्ही.सी.एस. हायस्कूल सोलापूर |

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## सोलापुरात ९ व १० डिसेंबरला जिल्हा युवा महोत्सव

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**
क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे अंतर्गत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय व जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर द्वारा आयोजित जिल्हा युवा महोत्सवाचे आयोजन ९ व १० डिसेंबर रोजी सकाळी ९.०० ते सांय ६.०० वाजेपर्यत निर्मलकुमार फडकुले सभागृह व डी.पी.बी.दयानंद कॉलेज ऑफ एज्यूकेशन येथे करण्यात आले आहे. यात १५ ते २९ वयोगटातील युवक व युवती भाग घेऊ शकतात. यासाठी १२ जानेवारी, २०२६ रोजी वयाची परिगणना १५ ते २९ असावी. जन्म तारखेबाबत सबळ पुरावा म्हणुन जन्माचा दाखला जोडणे आवश्यक आहे तसेच सोलापूर जिल्हयांचा रहिवासी असल्याबाबतच आधारकार्ड जोडणे आवश्यक आहे.

या युवा महोत्सवामध्ये नवोपक्रम (विज्ञान प्रदर्शन सांस्कृतिक कार्यक्रम (यात समुह लोकनृत्य, समुह लोकगीत) कौशल्य विकास कार्यक्रम (यात कथालेखन, चित्रकला वकृत्व व कविता लेखन) इ. कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. प्रत्येक पथकात/ गटात जास्तीत जास्त ५ जण आवश्यक आहे. प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या पथकांना विभाग व विभागीय स्पर्धेत प्रथम व द्वितीय क्रमांकाच्या पथकांना राज्य स्पर्धेसाठी निवडले जाईल. इच्छुकांनी नाव नोंदणी बाबनिहाय विहित नमुन्यातील अर्जासह ८ डिसेंबर २०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल कुमठा नाका, सोलापूर येथे प्रत्यक्ष किंवा dsosolapurgmail.com ईमेल वर पाठविण्यात यावी, असे जिल्हा क्रीडाधिकारी यांनी कळविले आहे.



## ▶▶ महत्वाचे...

### देवशाला शिंदे-गुंड यांची उपशिक्षणाधिकारीपदी निवड

**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**
महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्यावतीने घेण्यात आलेल्या विभागीय स्पर्धा परीक्षेत देवशाला शिवाजी शिंदे-गुंड यांची उपशिक्षणाधिकारीपदी निवड झाली आहे. ही परीक्षा सन २०१७ मध्ये घेण्यात आली होती. यापूर्वीच निकाल जाहीर झालेला होता. परंतु सदर परीक्षेबाबत सुप्रीम कोर्टात न्यायालयात रिट याचिका दाखल असल्याने निकालास विलंब झालेला होता. सध्या सुप्रीम कोर्टाने अंशतः निकाल दिल्याने पात्र उमेदवाराचे



निकाल आजरोजी जाहीर झाले असून, लोकसेवा आयोगाने अंशतः अंतिम यादी प्रसिद्ध केलेली असून शिंदे-गुंड यांची उपशिक्षणाधिकारीपदी निवड झालेली आहे. देवशाला शिंदे यांनी यापूर्वी वैराग येथील नवीन मराठी प्राथमिक विद्यालय पंचशीलनगर वैराग येथे मुख्याध्यापिका म्हणून सेवा बजावली. धाराशिव येथे शिक्षणविस्तार अधिकारी म्हणून तुळजापूर ग्रामीण बीटमध्ये कार्यरत होत्या. परंतु प्रतिनियुक्तीने सध्या महाराष्ट्र राज्य योजना कार्यालय पुणे येथे कार्यरत आहेत.

### ह.भ.प.गहिनीनाथ औसेकर यांना शासनाचा पुरस्कार जाहीर

**पंढरपूर, दि. २९ नोव्हेंबर-**
नाथ संस्थानचे सदगुरु तथा येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर यांना महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक विभागाचा सन्मानाचा कीर्तन व प्रबोधन या कार्यासाठी पुरस्कार जाहीर झाला आहे. आजवर गहिनीनाथ महाराज औसेकरांना अनेक पुरस्कार



मिळाले आहेत. त्या मध्ये जाहीर झालेला हा पुरस्कार अत्यंत सन्मानाचा आणि विशेष म्हणजे सदुरु ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांच्या २५ व्या पुण्यस्मरण महोत्सवाच्या प्रथम दिनी जाहीर झाल्याने ही सद्गुरु कृपाच होय अशी प्रतिक्रिया गहिनीनाथ महाराज यांनी पुरस्कार जाहीर झाल्यानंतर व्यक्त केली. परमात्मा पांडुरंगाची व वारकऱ्यांची सेवा श्वास असेपर्यंत चालूच राहील असेही महाराज यावेळी सांगितले.

### भारत मराठी विद्यालयात संविधान दिन साजरा

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**
मजरेवाडी येथील भारत मराठी विद्यालयात संविधान दिन व मुंबई येथील दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी झालेल्या वीर जवान व नागरिकांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक एस.के. सरसंबे होते. प्रारंभी एन.झेड यांनी प्रास्ताविक केले. डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमा पूजनाने कार्यक्रमाची सुरवात झाली. यावेळी सहशिक्षक एस.एम. ढाकणे




यांनी संविधान दिन व अतिरेकी हल्ला याविषयी मनोगत व्यक्त केले. इयत्ता पहिली ते सातवी व बालवर्गातील विद्यार्थ्यांनी भारतीय पोशाखांच्या विविधता आपल्या नृत्य कलेतून दाखवून मने जिंकली. अध्यक्षांनी भारताचा नावलौकिक कसा वाढवावा व राष्ट्रभक्ती आपल्या मनोगतातून व्यक्त केले. यावेळी टी.टी.वडावराव, एस.एम. शेख, मुस्कान मंगलुरे, जे.एच. हवालदार उपस्थित होते. सूत्रसंचालन सहशिक्षिका एच.ए. बागवान यांनी कले तर आभार वाय.एम. देवणगांवकर यांनी मानले.

# पिण्याचे पाणी आणि तरुणांच्या नोकरीचे प्रश्न सोडविण्याला प्राधान्य

### राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर**
आगामी सोलापूर महानगरपालिकेच्या पार्श्वभूमीवर शहरातील २६ प्रभागात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या माध्यमातून नागरिकांनी अंतर्गत रस्ते, पिण्याचे पाणी यासह गटारी, उद्योग व्यवसाय नसणे,परिणामी बेरोजगारी या प्रश्नांचा भडीमार केला आहे. त्यामुळे आपण राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांना तीन दिवसातील घडामोडींचा अहवाल देणार आहोत. याशिवाय सोलापूरसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या पिण्याच्या पाण्याचा तसेच तरुणांना नौकरी व बेरोजगारांना रोजगार देण्याबरोबरच महत्त्वाची कामे पूर्ण करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची मागणी करणार असून पिण्याच्या पाण्याचा व तरुणांना नौकरी हे प्रश्न सोडविण्याला प्रथम प्राधान्य देणार असल्याचे विधानसभेचे उपाध्यक्ष आणि राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी शुक्रवारी पत्रकार परिषदेत सांगितले.



सोलापूर शहरात पहिल्या दिवशी आलो, त्यावेळेस विविध भागात भेटीत देत असताना बरेचसे अनुभव आले. मात्र, त्यानंतरचे दोन दिवस शहरातील एकूणच वातावरण पाहता आगामी सोलापूर महानगरपालिका निवडणुकीत १०० टक्के अबकी बार ७५ पार झालेले दिसेल, असेही बनसोडे यावेळी बोलताना म्हणाले. सोलापूर शहरात एमआयएमचे एकूण ९ नगरसेवक असून सहा नगरसेवक राष्ट्रवादी पक्षात आले आहेत. उर्वरित तीन नगरसेवकांपैकी एका नगरसेवकाच्या घरी आपण सदिच्छा भेट दिली आहे. उर्वरित दोघांशीही संपर्क सुरू आहे. सोलापूरचे चित्र निश्चितच राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष बदलताना दिसेल. अजित पवार हे राज्याचे उपमुख्यमंत्री असून अर्थमंत्रीसुद्धा आहेत.त्यामुळे निधी देताना ते निश्चितच राष्ट्रवादी पक्षाच्या नगरसेवकांचा विचार करतील, असेही अण्णा बनसोडे म्हणाले.

सोलापूर शहरातील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस तसेच एमआयएमच्या नेते मंडळींनी सुद्धा विकास कामासाठी निधीची मागणी पत्राद्वारे आपल्याकडे केली आहे. निश्चितच अजित पवार यांच्याकडून निधी देण्याला आपण प्राधान्य देऊ,असे अण्णा बनसोडे यांनी सांगितले. सोलापुरात नोकऱ्या नाहीत, हाताला काम नाही,म्हणून सोलापुरातील तरुण मोठ्या प्रमाणावर पुण्यात हिंजवडीमध्ये नोकरी करत आहेत. इतक्या वर्षात सोलापूरकरांचा बेरोजगारीचा प्रश्न सुटणे महत्त्वाचे होते, परंतु त्याकडे राजकारणी मंडळींनी फारसे गांभीर्याने पाहिलेले दिसत नाही. सोलापूर हे आयटी हब होणे गरजेचे होते.

कारखान्यांमध्ये सुद्धा तरुणांना नोकरी मिळणे आवश्यक होते. परंतु दुर्दैवाने ते होऊ शकलेली नाही. त्यामुळे बेरोजगारीचा मोठा प्रश्न सोलापुरात भेडसावत आहे. सोलापूर महानगरपालिकेमध्ये मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना अनेक वर्षापासून पदोन्नती दिलेली नाही. रोजंदारी कर्मचाऱ्यांचा मोठा प्रश्न या ठिकाणी निर्माण झाला आहे. हे प्रश्न सोडविण्याला आपण प्राधान्य देणार असल्याचे अण्णा बनसोडे म्हणाले. सोलापूर शहरामध्ये नेमकी कोणती कामे केली पाहिजेत, कोणत्या पद्धतीने सोलापूरचा विकास झाला पाहिजे, याबाबत चर्चा झाल्यानंतरच पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आपणास सोलापूरचे सहसंपर्क मंत्री म्हणून नेमले आहे. सोलापूर महानगरपालिकेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाला बहुमत मिळाले तर निर्माण झालेले सर्व प्रश्न निश्चितच सुटणार आहेत,असेही ते म्हणाले. संपूर्ण राज्यातील २२ महानगरपालिकेमध्ये प्रशासक आहे. जवळपास आठ ते नऊ वर्षे निवडणुका झालेल्या नाहीत. त्यामुळे प्रशासक असल्यानंतर म्हणावा तसा विकास होत नाही. त्यासाठी स्थानिक जनता किंवा नगरसेवकच असणे गरजेचे आहे. प्रभागातील अडचणी या लोकप्रतिनिधींनाच माहिती असतात, अधिकाऱ्यांना त्या माहिती असण्याचे कारणच नाही. कारण ते प्रशासकीय पातळीवर काम करत असतात. त्यामुळे लोकशाही पद्धतीने निवडणुका झाल्यानंतर निवडून येणारा लोकप्रतिनिधी आपापल्या भागाचा विकास करू शकतो, असे अण्णा बनसोडे यांनी सांगितले.

या पत्रकार परिषदेला शहर - जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान,प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, आनंद चंदनशिवे, प्रदेश चिटणीस आनंद मुस्तारे, ज्येष्ठ नेते तौफिक शेख,नूतन गायकवाड, चित्रा कदम, प्रमोद भोसले आदीसह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

#### रोजंदारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटले नाहीत

भारतीय जनता पार्टीची सोलापूर महापालिकेत सत्ता असताना सुद्धा रोजंदारी कर्मचाऱ्यांचे प्रश्न सुटलेला नाहीत. पिण्याचे पाण्याचा प्रश्न जैसे तेच आहे. रोजगाराचा मोठा प्रश्न या ठिकाणी दिसून येतो. ठीकठिकाणी कचऱ्याचे साम्राज्य आहे. या प्रश्नाला म्हणावी तशी गती मिळालेली दिसत नाही.याच प्रमुख मुद्द्यावर येणारी महापालिका आपण स्वबळावर लढणार असल्याचे त्यांनी सांगितले.

#### राष्ट्रवादीचे कार्यालय स्व:मालकीच्या जागेत

सोलापूर शहरामध्ये अजित पवार राष्ट्रवादीचे स्वः मालकीचे संपर्क कार्यालय नसल्याबाबतच्या प्रश्नाला उत्तर देताना अण्णा बनसोडे म्हणाले, सरकारी जागेत अजित पवार राष्ट्रवादीचे कार्यालय असण्यापेक्षा स्व:मालकीच्या जागेत राष्ट्रवादीचे कार्यालय होण्यासाठी आपण सर्वाधिक प्रयत्न करत आहोत. लवकरच सोलापुरात स्व:मालकीच्या जागेत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सोलापूर शहराचे कार्यालय दिसेल, असे सहसंपर्क मंत्री बनसोडे यांनी पत्रकारांनी विचारलेल्या एका प्रश्नाला ठामपणे उत्तर देताना सांगितले.



**सोलापूर : परिवहन मंत्री प्रताप सरनाईक शुक्रवारी सोलापूर दौऱ्यावर होते. परंतु एसटी बस स्थानक आवारातील अंतर्गत रस्त्याच्या दुरावस्थेकडे त्यांचे लक्ष गेले नाही.**

# पोषण आहार योजनेत अनियमितता

### माध्यमिक शिक्षण विभागाकडून कारवाईची मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**
पोषण आहार योजनेच्या तपासणीसाठी भरारी पथकांची नियुक्ती केली होती. त्या पथकाने करमाळा तालुक्यातील साडे हायस्कूल येथील प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेत गंभीर अनियमितता असल्याचा अहवाल दिला होता. तसे पत्र प्राथमिक शिक्षण विभागाने माध्यमिक शिक्षण विभागाला दिले आहे.



मात्र, माध्यमिक शिक्षण विभागाकडून अद्यापही त्या शाळेवर कारवाई करण्यात आली नाही. त्यामुळे त्या शाळेवर कारवाई करावी, अशी मागणी पालकांतून होत आहे. भरारी पथकाने साडे हायस्कूल, साडे (ता. करमाळा) येथे दिलेल्या भेटीत प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेतील गंभीर अनियमितता असल्याचे तपासणीत उघडकीस आले. संबंधित प्रकरणाचे निष्कर्ष शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना कळवले आहे. पत्रानुसार शाळेचे प्रभारी मुख्याध्यापकांनी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या पोषण आहाराच्या वितरणात, नोंदवहीत व उपस्थिती पडताळणीत गंभीर त्रुटी केल्याचे भरारी पथकाने नोंदवले आहे. या अनियमिततेबाबत शाळेकडून खुलासा मागवण्यात आला होता. खुलासा प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांकडे जमा झाले आहे. मात्र, तो समाधानकारक नसल्याचे प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी स्पष्टपणे नमूद केले आहे. प्राथमिक शिक्षणाधिकाऱ्यांनी माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना संबंधित प्रभारी मुख्याध्यापकांकडून जबाबदारी निश्चित करून तातडीने प्रशासकीय कारवाई करण्याचे स्पष्ट निर्देश दिले होते. तरीही, या प्रकरणात माध्यमिक शिक्षणाधिकारी कार्यालयाकडून अद्याप कोणतीही कारवाई करण्यात आली नाही.

#### शाळेच्या मुख्याध्यापकावरकार्यवाहीचे आदेश

भरारी पथकाकडून पोषण आहाराची तपासणी करण्यात आली आहे. त्यामध्ये अनियमतता असल्याचे पत्र प्राथमिक शिक्षण विभागाकडून प्राप्त झाले आहे. त्या अनुषगाने संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकावर कार्यवाहीचे आदेश दिले आहेत.

**- सचिन जगताप, शिक्षणाधिकारी माध्यमिक**

# विकासाच्या मुद्यांवर निवडणुकीला सामोरे जातोय : आ.कल्याणशेट्टी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. २९ नोव्हेंबर-**
अक्कलकोटमधील यापुर्वीच्या निवडणुका ह्या त्याच त्या मुददयांवर व्हायच्या. माझ्या आमदारकीच्या काळात अक्कलकोट तीर्थक्षेत्राचा झपाट्याचा विकास होत आहे. त्यामुळे यंदा आम्ही विकासाच्या मुद्यावर निवडणुकीला सामोरे जात आहोत.

अक्कलकोटतालुक्यातील अक्कलकोटनगरपालिकेच्या २५ जागांसाठी २५ उमेदवार, मैंदर्गी नगरपालिकेच्या २० जागांसाठी २० तर दुधनी नगरपालिकेच्या २० जागांसाठी २० उमेदवार भारतीय जनता पार्टीकडून रिंगणात उतरविण्यात आले आहे. अक्कलकोट, मैंदर्गी, दुधनी याठिकाणी भाजपाचाच नगराध्यक्ष होणार आहे. तसेच या तीनही पालिकेत भाजपाला बहुमत मिळणार असल्याचा विश्वास आमदार सचिन कल्याणशेट्टी यांनी दैनिक सोलापूर तरुण भारतशी बोलताना व्यक्त केला. रस्ते विकास, भुमीगत गटारीचे काम मोठ्या प्रमाणात चालु आहेत. ग्रामदैवत श्री मल्लिकार्जुन मंदिराचा जिर्णोध्दाराचे काम प्रगतीपथावर आहे. अक्कलकोट बसस्थानकाकाडे महाराष्ट्रातील मॉडेल बसस्थानक म्हणून गणले जाईल, अशा पध्दतीने काम चालू आहे. नवीन जलवाहिनीची कामे, जलजीवन मिशनच्या अंतर्गत कामे यांसारख्या विविध विकास कामांच्या माध्यमातून अक्कलकोटचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले जाईल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आम्ही विविध विकास कामांसाठी भरघोस निधी आणला आहे. त्यामुळे अक्कलकोटसह मतदार संघाचा झपाट्याने विकास होत आहे, असेही त्यांनी एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले. श्री



स्वामी समर्थांच्या पदस्पर्शाने व लीला कार्याने पावन झालेली भुमी म्हणून गणल्या अक्कलकोटमध्ये येणाऱ्या भाविकांची संख्या प्रचंड वाढत आहे. याअनुषंगाने वाढीव, पायाभुत सुविधा, ड्रेनेज, पाणी, रस्ते, मंदिर परिसर सुशोभित, वाहन तळ, उद्यान, व्यापारी संकुल यांसारख्या कामांसाठी शासनाकडे पाठपुरावा करत ३६८ कोटी रुपयांचा तीर्थक्षेत्र विकास आराखडा आणि विविध रस्त्यांच्या कामांसाठी नगरोत्थान प्रकल्पातून १२९ कोटी रुपयाचा निधी मंजूर करुन घेतला आहे. अक्कलकोट तीर्थक्षेत्री भाविक मध्यरात्री नंतर जरी उतरले तर अशांसाठी बसस्थानकात रात्री मुक्कामाची सोय असणार आहे. अशी सोय असलेले महाराष्ट्रातील बहुधा पहिलच बसस्थानक असेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.



### सोलापुरात काँग्रेस पक्षाला धक्का

# माजी उपमहापौर आप्पाशा म्हेत्रे यांचा राष्ट्रवादीत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**
सोलापुरात ऐन महानगरपालिका निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर काँग्रेस पक्षाला धक्का बसला आहे. राष्ट्रवादीचे सहसंपर्क प्रमुख अण्णा बनसोडे यांच्या उपस्थितीत बालाजी सरोवर येथे शनिवारी सकाळी माजी उपमहापौर आप्पाशा म्हेत्रे यांनी अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादीत प्रवेश केला.

दरम्यान, अण्णा बनसोडे तीन दिवसांच्या सोलापूर दौऱ्यावर आहेत. मागील दोन दिवसात वकील मंडळींसह अनेकांचा राष्ट्रवादीत प्रवेश झाल्यानंतर शेवटच्या दिवशी सोलापूर राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी काँग्रेस पक्षातील नेत्यांना आपल्या पक्षात घेण्यात यश मिळवले. अण्णा बनसोडे यांच्या हस्ते माजी उपमहापौर आप्पाशा म्हेत्रे यांच्या गळयात राष्ट्रवादीचे उपरणे घालून त्यांना अजित पवार यांच्या राष्ट्रवादीत सन्मानाने प्रवेश देण्यात आला. काँग्रेसमधील मोठे प्रस्थ राष्ट्रवादीत आले आहे, लवकरच आणखी मोठे लोक राष्ट्रवादीत प्रवेश करतील,असे अण्णा बनसोडे यांनी यावेळी बोलताना सांगितले.

अजित पवार यांची कार्यशैली महत्वाची असून याच पार्श्वभूमीवर आपण त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला असल्याचे म्हेत्रे यांनी यावेळी बोलताना सांगितले. महापालिका निवडणूकीच्या तोंडावर आणखी मोठे राजकीय भूकंप सोलापूरकरांना पाहावयास मिळतील, असे जिल्हाध्यक्ष संतोष पवार आणि कार्याध्यक्ष जुबेर बागवान यांनी सांगितले.

# कांद्याचे दर गडगडलेलेच; सोलापूरच्या स्थानिक बाजारात ४ ते २० रुपये किलो दर

### जागतिक बाजारपेठेत भारताच्या कांद्याची मागणी घटली

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**
कांदा उत्पादक शेतकऱ्यांची चिंता वाढवणारी घटना सद्यःस्थितीत घडत आहे. भारतीय कांद्याचे प्रमुख आयातदार असलेले बांगलादेश, सौदी अरब आणि फिलिपिन्स या देशांनी भारतीय कांद्याकडे पाठ फिरवली आहे. केंद्र सरकारच्या नव्या धोरणामुळे देशातील कांदा शेतकऱ्यांना याचा फटका बसत आहे. देशातील महागाई कमी करण्यासाठी कांद्याच्या निर्यातीवर बंधणं आणल्याने हे देश पाकिस्तान, येमेन आणि इराणकडून कांदा मागवत आहेत.



महत्त्वाच्या बाजारपेठा गमावल्यामुळे कांद्याचा दर घसरलाय. त्यामुळे शेतकऱ्यांना उत्पादन खर्चही काढणं अवघड झाले आहे. भारतीय कांद्याच्या निर्यातीत घट होण्यामागे केवळ देशांतर्गत धोरणेच नव्हे, तर आयातदार देशांनी घेतलेले निर्णयही जबाबदार आहेत. देशातील महागाई नियंत्रित ठेवण्यासाठी केंद्र सरकारने वारंवार कांदा निर्यात शुल्क वाढवले.

अस्थायी निर्यात बंदी यासारखे निर्णय घेतल्यानं आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारतीय निर्यातदारांची विश्वासार्हता कमी झालीय.निर्यातबंदीच्या निर्णयामुळे बांगलादेशने आता स्थानिक उत्पादन वाढवण्यावर भर दिलाय. यासह त्यांनी पाकिस्तान आणि चीन यांसारख्या पर्यायी पुरवठादारांकडून कांदा खरेदी करण्यास सुरुवात केली आहे. बांगलादेशातील स्थानिक कांदा बाजारात आला आहे. त्यामुळे तेथील व्यापाऱ्यांनी भारताकडून खरेदी करणे जवळपास थांबवले आहे. यासह सौदी अरेबियाने भारतीय निर्यातदारांना आयात परवाने देणे थांबवले आहेत. सौदीला येमेन आणि इराणकडून अधिक स्पर्धात्मक दरात कांदा मिळू लागला आहे. दरम्यान भारतीय कांद्याचे बियाणे वापरून बांगलादेश, श्रीलंका आणि चीनसारखे देश आता स्वतः कांद्याचे उत्पादन घेऊ लागलेत. यामुळे शेतकरी अडचणी आलेत. अनेक बाजारांमध्ये शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चापेक्षा कमी दराने कांदा विकावा लागतो आहे.

**सोलापुरात कांद्याचे दर :** राज्यामध्ये सोलापूर बाजार समितीमध्ये कांद्याचा दर सर्वाधिक असतो, असे मानले जाते. परंतु गेल्या काही महिन्यांपासून कांद्याचे दर घसरलेले आहेत. घाऊक बाजारपेठेचा कांद्याचे दर सुमारे १०० रुपयांपासून ते २,५०० रुपयापर्यंत आहेत. तर सरासरी दर हे ९०० रुपये इतके आहेत. परंतु किरकोळ बाजारात कांद्याचे दर कमीत कमी ४ रुपयांपासून ते जास्तीत जास्त २० रुपये किलोपर्यंत आहेत. खराब कांदा बाजारपेठेत विक्रीसाठी दाखल होत असल्याने कांद्याचे दर वाढत नसल्याचे अडत व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे सोलापूर शहरातील किरकोळ बाजारात हातगाडी आणि टेम्पोमध्ये भरून कांदा विक्री करताना, विक्रेते ४ रुपये किलो कांदा असे स्पीकर लावून कांदा विक्री करताना दिसून येत आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/



## ज्ञानामृत आनंदलहरी १२८२

**असाध्य ते साध्य करीतां सायास ।**
**कारण अभ्यास तुका म्हणे ।।**

नकारात्मक वृत्ती व कष्ट करण्याची तयारी नसणाऱ्या व्यक्तीला जवळपास सर्वच क्षेत्रात अपयश येते. आपल्या अपयशाचे खापर तो कोणावर तरी फोडतो किंवा काही तरी नाव ठेवुन मोकळा होतो. आपण कष्टामध्ये, प्रयत्नामध्ये कमी पडलो असे तो मानत नाही. आपण अपयशी का झालो? किंवा आपल्या अपयशाला आपणच कसे कारणीभूत आहोत याचा शोध घेणाऱ्याला भविष्यात यश मिळू शकते. आपल्या उणीवांची पुर्तता करण्याची मानसीकता जोपासून त्या उणीवा भरुन काढणाऱ्यांसाठीच यश असते. कांही न करता किंवा आपल्याच्याने हे होणे शक्य नाही, असे म्हणणाऱ्यांसाठी यश नाही. आपल्या बरोबरीचे लोक जे यश मिळवु शकतात, ते यश आपणही मिळवू शकतो. उदीष्टाकडे किंवा ध्येयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहायला हवे. सकारात्मक दृष्टी जोपासुन कष्ट करणाऱ्यांना कोणतीही गोष्ट अवघड नाही.जे साध्य होउच शकत नाही असे सकृत दर्शनी वाटते,ती असाध्य गोष्ट सुध्दा प्रयत्नांती साध्य होउ शकते. हे सांगताना तुकाराम महाराज म्हणतात की, **असाध्य ते साध्य करीतां सायास ।कारण अभ्यास तुका म्हणे ।।**



थोड्याशा यशाने हुरळुन जाणाऱ्यांसाठी किंवा पहिल्या पायरीस हार पत्करणाऱ्यांसाठीही यश नाही. आपल्या प्रयत्नात सातत्य टिकवुन ठेवणाऱ्यांसाठी यश आहे. एखाद्या क्षेत्रात यश मिळवण्या-साठी आजुबाजुची व घरची परिस्थिती चांगली असावी लागते, असा अनेकांचा समज आहे. पण खरे म्हणजे आजुबाजुच्या किंवा घरच्या परिस्थितीपेक्षाही मनाची परिस्थिती चांगली व मजबूत असायला हवी. मनाची स्थैर्यता किंवा मनाची तयारी नसेल तर आजुबाजुची किंवा घरची परिस्थितीही काही करु शकत नाही. आर्थिक दारिद्र्य असणारी किंवा शारिरिक दृष्ट्या दिव्यांग असणारी अनेक माणसं मोठ्या-मोठ्या पदावर पोहोचल्याचे आपण पाहातो. पण मानसिक दारिद्र्य किंवा नकारात्मक मानसिक अपंगत्व जोपासणारे धन, संपत्तीवाले असले तरीही बरेचसे हारलेलेच पाहावयास मिळतात. यावरुन कोणतीही गोष्ट साध्य करण्याची असेल तर प्रथम मानसिक तयारीची आवश्यकता असते. संत-महात्म्यांनी जन उध्दाराचा, समाजसेवेचा मार्ग पत्करला, तेंव्हा त्यांच्या भोवतीची परिस्थिती अत्यंत अडचनीची होती. त्यांना पावला-पावलाला अडथळे होते. पण त्यांची मनाची तयारी या सर्व अडथळयावर मात करुन यश संपादन करण्यात यशस्वी झाल्याचे आपण पाहातो. झोपडीत राहाणारे किंवा विविध अडचणींवर मात करुन यशस्वी होणारे आणि सर्व प्रकारची संपन्नता असूनही अपयशी होणारे समाजात काही कमी नाहीत. बचनागाचे विष पचविणारे किंवा सर्पाशी खेळ करणारे लोक आपण पहातो. प्रयत्नांअंती विषावर विजय मिळविता येतो. सर्पासारख्या विषारी जिवांशी मैत्री करता येते. असे विष पचविणारे किंवा सर्पाशी खेळणारे लोक आहेत. हे पाहिले म्हणजे खरोखर प्रयत्नांअंती कठीणातले कठीण साध्य होते, हे लक्षात येते. कोणतीही परिक्षा ही पास होण्यासाठी किंवा कोणतीही स्पर्धा ही जिंकण्यासाठीच असते. म्हणुनच आपण कोणालाही पास झालास का? तू स्पर्धा जिंकलीस का? असा सकारात्मक प्रश्न विचारतो. तु परिक्षेत नापास झालास का? किंवा तु स्पर्धा हारलास का? असे आपण कोणालाही विचारत नाही. यावरुन परिक्षा, स्पर्धा या पास होण्यासाठी, जिंकण्यासाठीच आहेत. हे लक्षात यायला हवे. जय जय राम कृष्ण हरी. संत तुकाराम महाराजांचा फोटो घ्यावा.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| वार : रविवार | दिनविशेष - १९९६: पु. ल. देशपांडे यांना महाराष्ट्र सरकारचा पहिला 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कार प्रदान. |
| दि. ३० नोव्हेंबर २०२५ | १९१७: कलकत्ता येथे आचार्य जगदीश चंद्र बोस इन्स्टिट्यूटची स्थापना झाली. |
| विक्रम संवत् २०८२ | १९६७: सामाजिक कार्यकर्ते राजीव दिक्षित यांचा जन्म. |
| शके - १९४७ | १९४५: पार्श्वगायिका वाणी जयराम यांचा जन्म झाला. |
| संवत्सर - विश्वावसु | |
| मास - मार्गशिर्ष शु. दशमी | |
| ऋतु - हेमंत | |
| नक्षत्र- उ. भाद्रपदा | |
| योग - वज्र, सिद्धी | |
| करण - तौतिल (१०.२७) | |
| ....राहू काल.... | |
| रविवार : दु.४.३० ते ६.०० | |



## एन. के. किड्स स्कूलच्या विद्यार्थ्यांची कृषी पर्यटन सहल उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

बाळे येथील एन. के. किड्स स्कूल तर्फे एकदिवसीय कृषी पर्यटन सहलीत विद्यार्थ्यांनी भरभरून आनंद लुटला. आ. सुभाष देशमुख यांनी राबवलेल्या कृषी पर्यटन उपक्रमाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना शेती, मत्स्य व्यवसाय, फळे, फुले व आयुर्वेदिक वनस्पतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे या उद्देशाने ही सहल आयोजित करण्यात आली होती. ही सहल हैदराबाद रोडवरील कल्याण कृषी पर्यटन केंद्र, तांदूळवाडी येथे पार पडली.

सहलदरम्यान विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची फळझाडे, फुलझाडे, औषधी वनस्पती, शेती पद्धती यांची जवळून पाहणी करून त्यांचे महत्त्व जाणून घेतले. कृषी पर्यटन केंद्राचे संचालक परमेश्वर शरणार्थी यांनी विद्यार्थ्यांना तसेच शिक्षकांना मत्स्य व्यवसाय, पर्ल व्यवसाय, त्यामध्ये वापरण्यात येणारी साधने व त्याची प्रक्रिया यांचीही माहिती दिली. केंद्रातील मिनी वॉटर पार्क, रेन डान्स, सिसो, झोका, घसरगुंडी आदी खेळांवर विद्यार्थ्यांनी मनसोक्त आनंद घेतला. रेन डान्स आणि वॉटर पार्कमध्ये सर्व विद्यार्थी भिजून चिंब झाले आणि सहलीचा आनंद अधिक खुलला. यावेळी मुख्याध्यापिका श्वेता कस्तुरे, मुख्य शिक्षिका दिपाली कुलकर्णी, अश्विनी शिंगण, पुनम कळसाईत, शितल सुतार, सेविका संगीता हेगडकर, सुरेखा शिंदे यांची उपस्थिती होती.

# डॉ. आंबेडकर प्रेरणाभूमीच्या राष्ट्रीय स्मारकासाठी लवकरच पाठपुरावा

### राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे; मिलिंद नगर येथील महार वतनदार परिषदेचा ९८ वर्षपूर्ती सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थीविहार प्रेरणाभूमी आणि ऐतिहासिक पंचांची चावडी या ऐतिहासिक स्थळांना राष्ट्रीय स्मारकचा दर्जासाठी आणि शासनाकडून निधी देण्यासाठी प्रयत्न करणार असल्याची ग्वाही विधानसभेचे उपाध्यक्ष तथा राष्ट्रवादीचे सहसंपर्क मंत्री अण्णा बनसोडे यांनी दिली.



विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या २६ व २७ नोव्हेंबर १९२७ रोजी महार वतनदार परिषदेच्या सोलापूर प्रथम भेटीस ९८ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल महार वतनदार ऐतिहासिक परिषदेत उपस्थित असलेल्या मान्यवर वतनदारांच्या वारसांचा सन्मान सोहळा महाराष्ट्र विधानसभेचे उपाध्यक्ष अण्णासाहेब बनसोडे यांच्या उपस्थित झाला. यावेळी ते बोलत होते. विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्थिविहार प्रेरणाभूमी थोरला राजवाडा येथे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष आनंद चंदनशिवे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम झाला.

प्रारंभी अण्णा बनसोडे यांनी विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अस्थिकलशास अभिवादन करून पुष्पहार अर्पण केला. यानंतर दिनांक. २७ व २७ नोव्हेंबर १९२७ या दिवशी भारतीय घटनेचे शिल्पकार विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे सोलापूर दौऱ्यावर आले असता थोरला राजवाडा, मिलिंद नगर, बुधवार पेठ, पंचांची चावडी येथे महार वतनदार ऐतिहासिक परिषद घेतली होती, त्या परिषदेत पहिल्यांदा उपस्थितीत झाली होती. त्यावेळचा संपूर्ण प्रसंग महापालिकेच्या माध्यमातून ब्राँझचा शिल्प बनवण्यात आला आहे. या ऐतिहासिक महार वतनदार परिषदेच्या शिल्पास अभिवादन केले. यानंतर कुमार तुकाराम बनसोडे, सुरेश बाबू तळभंडारे, मिलिंद गणपत बनसोडे, गंगाधर सरवदे, सोनप्पा सुतकर, सुमनताई बाबरे, मारुती नारायण साळवे, सुधाकर तळभंडारे, शोभा तळभंडारे, महादेव तळमोहिते या मान्यवरांचा व वारसांचा अण्णा बनसोडे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. आनंद चंदनशिवे प्रास्ताविक केले. यावेळी राष्ट्रवादी प्रदेश उपाध्यक्ष किसन जाधव, जिल्हाध्यक्ष संतोष पवार, कार्याध्यक्ष जुबेर बागवान, माजी उपमहापौर विष्णू निंबंबे, माजी नगरसेवक गणेश पुजारी, महिला अध्यक्ष संगीता जोगदंड, सुरेखा घाडगे, नुतन गायकवाड , पी बी ग्रुप प्रमुख गौतम चंदनशिवे, दशरथ कसबे अविनाश भडकुंबे, सुखदेव इंगळे, भारत बाबरे,किरण साळवे, श्रीमंत जाधव, पिंटू डावरे, धम्मपाल मैंदर्गीकर, भीमा इंगळे,रंगा वाघमारे, गौतम नागटिळक, अमर सोनकांबळे, मनोज थोरात, रवी काकडे,नाना कापुरे, उमेश रणदिवे, विनय शिरसागर, आशिष पात्रे,प्रतीक चंदनशिवे, भीमा मस्के, अक्षय मस्के, आदित्य चंदनशिवे, राजाराम लोखंडे, प्रथमेश सुरवसे,रवी सय्यद, दाजी वाघमारे, संदीप रणदिवे, बालराज जाधव, दत्तात्रय धावारे,सुनील कांबळे, सागर वाघमारे, प्रेम रणदिवे, रोहन तळभंडारे, सिद्धांत तळभंडारे, संतोष चंदनशिवे, स्वप्निल पुजारी, यशवंत गायकवाड, अमोल कदम, ज्योतिर्लिंग करंडे उपस्थित होते.

## दत्त जयंतीनिमित्त मंद्रुपमध्ये आजपासून विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**



दत्त जयंतीनिमित्त मंद्रुपमध्ये विविध धार्मिक कार्यक्रम ३० नोव्हेंबर ते ४ डिसेंबरपर्यंत विविध धार्मिककार्यक्रम होणार असून भाविकांनी याचा लाभ घेण्याचे आवाहन राजकुमार अतार महाराज यांनी केले आहे. ३० नोव्हेंबरपासून दररोज रात्री मंद्रुप येथील जय हनुमान भजनी मंडळाचे भजन कार्यक्रम होणार आहेत. तीन डिसेंबर रोजी गाणगापूर येथून पादुका प्रस्थान होणार आहेत. चार डिसेंबर रोजी पहाटे दत्त मूर्तीस व गाणगापूर येथून आणलेल्या पादुकांना महाअभिषेक करण्यात येणार आहेत. दुपारी १२ वाजता मंद्रूप पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक मनोज पवार यांच्या हस्ते महापूजा व आरती होणार आहे. त्यानंतर पाळणा कार्यक्रम होईल. यावेळी सरपंच अनिता कोरे, उपसरपंच भगवान व्हनमाने आदी भक्तगण उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी गावातून दत्त मूर्तीची सवाद्य भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री आठ वाजता मंद्रूप पोलीस ठाणे येथे पालखी पूजनाने व महाप्रसादाने दत्त जयंतीची सांगता होणार आहे.

## १५ कनिष्ठ अभियंत्यांना सहायक अभियंत्यांचा दर्जा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिणकर यांनी बांधकाम विभाग दोनमधील पंधरा कनिष्ठ अभियंत्यांना सहायक अभियंत्यांचा दर्जा दिला. त्यामुळे त्या अभियंत्यांनी सीईओ जंगम, अतिरिक्त सीईओ कोहिणकर यांचा सत्कार करुन आभार मानले. कनिष्ठ अभियंत्यांना सहायक अभियंत्यांचा दर्जा मिळावा, यासाठी गेल्या काही महिन्यांपासून कनिष्ठ अभियंते हे जिल्हा परिषदेच्या बांधकाम दोन विभागाकडे हेलपाटे मारत होते. त्याची दखल घेत सीईओ जंगम, अतिरिक्त सीईओ कोहिणकर आणि उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन अधिकारी स्मिता पाटील यांच्या पुढाकाराने बांधकाम विभाग क्रमांक दोनकडून १५ कनिष्ठ अभियंत्यांना सहायक अभियंत्यांचा दर्जा देण्यात आला आहे. यासाठी बांधकाम विभाग दोनचे कार्यकारी अधिकारी संतोष कुलकर्णी, उमाकांत राजगुरु, बंडू मोरे यांच्यासह इतर कर्मचाऱ्यांचे सहकार्य लाभले.

### शासनाच्या नियमानुसार दर्जा

जिल्हा परिषदेच्या बांधकाम दोन विभागात नुकतेच रुजू झालेल्या १५ कनिष्ठ अभियंत्यांना शासनाच्या नियमानुसार सहायक अभियंत्यांचा दर्जा देण्यात आला आहे. त्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, अतिरिक्त सीईओ संदिप कोहिणकर आणि डेप्युटी सीईओ स्मिता पाटील यांचा वाटा सिंहाचा आहे.

**संतोष कुलकर्णी**, कार्यकारी अभियंता, बांधकाम दोन

### या अभियंत्यांचा समावेश

श्रीधर नामदास, शुभम शिंदे, तुषार नाईकनवरे, वरुण दुरुगकर, प्रितेश शिंदे, अतुल रूपनवर, शशांक गवसणे, योगेश कानगुडे, वैभव फरताडे, रविकुमार म्हेत्रे, सुजित पाटील, सायली चव्हाण, आकाश ढवळे, सायली पराडे, प्रसाद गायकवाड या अभियंत्यांचा समावेश आहे.

## विद्यानिकेतन हायस्कूलमध्ये संविधान दिन साजरा

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

विद्यानिकेतन हायस्कूलच्या वतीने भारतीय संविधान दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक गोपीनाथ नवले हे होते. प्रास्ताविक सहशिक्षक जगदीश अळीमोरे यांनी केले. यानंतर मान्यवरांच्या हस्ते भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी कार्तिकी मंठाळकर, अनुष्का म्हेत्रे या विद्यार्थिनींनी भाषण सादर केले. कार्यक्रमास राजशेखर राजशेखर नाटीकर, अविनाश वळसंगकर, नितीन मुसळे, विद्याधर रंगदाळ, अनिता क्षीरसागर यांची उपस्थिती होती. सूत्रसंचालन वैशाली हिबारे, आभार शंकर गिरी यांनी मानले.



## २५ शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा

### महिला व बालकल्याण विभागाचा उपक्रम; ५५० विद्यार्थ्यांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

महानगरपालिका महिला व बालकल्याण विभागामार्फत झाशीची राणी लक्ष्मीबाई व माजी पंतप्रधान स्व.इंदिरा गांधी यांच्या जयंतीचे औचित्य साधून मनपाच्या २५ शाळांमध्ये सुंदर हस्ताक्षर कार्यशाळा घेण्यात आली. मनपा आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या सूचनेनुसार या प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन मनपाच्या प्राथमिक २२ व माध्यमिक ३ शाळांमध्ये करण्यात आले होते. याम ध्ये ५५० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. कार्यशाळेचे उद्घाटन अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांच्या हस्ते भारताच्या प्रथम शिक्षिका सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेसमोर दीपप्रज्वलनाने करण्यात आले. यावेळी महिला व बालकल्याण अधिकारी अजित कुमार खानसोळे, हस्ताक्षर तज्ज्ञ अभिजीत भडंगे ,मनपा प्रशासकीय कार्यालयीन प्रमुख अल्लाबक्ष शेख, मनपा शाळा क्र. १ चे मुख्याध्यापक जगन्नाथ सज्जन यांची प्रमुख उपस्थिती होती.

हस्ताक्षर तज्ज्ञ अभिजीत भडंगे यांनी या कार्यशाळेत विद्यार्थ्यांना सुंदर व वळणदार अक्षर काढण्याबाबत सोप्या पद्धतीने शिकवले. यावेळी लिपिक श्रीनिवास पेंढिटी, नितीन मुंढे, प्रथमेश सदाफुले, ऋषी लोखंडे, शिक्षिका हंचाटे आदी उपस्थित होते. प्रारंभी महिला व बालकल्याण अधिकारी अजित कुमार खानसोळे यांनी स्वागत केले. सूत्रसंचलन शिक्षिका खरबस यांनी तर आभार शिक्षक गोपू कांबळे यांनी मानले.

### वीणा पवार यांच्याकडून ५०० वह्या भेट

या कार्यक्रमात अतिरिक्त आयुक्त वीणा पवार यांनी सांगितले की, समारंभात पुष्पगुच्छ, फुले किंवा शाल न देता त्याऐवजी गरीब, गरजू विद्यार्थ्यांना वह्या, पुस्तके, पेन अशा शैक्षणिक वस्तू भेट द्याव्यात, जेणेकरुन त्याचा सदुपयोग होऊन एक आदर्श निर्माण होईल. या कल्पनेची सुरुवात वीणा पवार यांनी स्वतः कृतीतून केली. त्यांनी स्वतः ५०० वह्या विद्यार्थ्यांना भेट म्हणून दिल्या.

## इंडस टॉवर्सकडून पूरग्रस्तांना मदतीचा हात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

जगातील आघाडीच्या दूरसंचार पायाभूत सुविधा सेवा पुरवठादारांपैकी एक असलेल्या इंडस टॉवर्सने नैसर्गिक आपत्तीग्रस्त समुदायांना मदत करण्याची आपली बांधिलकी कायम ठेवत सोलापूर आणि नांदेड जिल्ह्यांतील प्रभावित कुटुंबांना हातभार लावला आहे. आपल्या प्रमुख कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी कार्यक्रम ''प्रगती'' अंतर्गत कंपनीने १,५००आवश्यक मदत किट्सचे वितरण केले.या किट्समध्ये तात्काळ पोषण आणि उपजीविकेच्या गरजा पूर्ण करणारी महत्त्वाची साहित्य सामग्री समाविष्ट होती.इंडस टॉवर्सचे कर्मचारी दोन्ही शहरांतील मदत कार्यात सक्रियपणे सहभागी झाले आणि पुरग्रस्त कुटुंबांना आवश्यक साहित्य पोहोचवण्यात आणि प्रत्यक्ष मदत करण्यात मोलाची भूमिका बजावली.

या उपक्रमाबाबत बोलताना इंडस टॉवर्स लिमिटेडचे चीफ ऑपरेटिंग ऑफिसर तेजिंदर कालरा यांनी सांगितले,इंडस टॉवर्समध्ये आम्ही केवळ कनेक्टिव्हिटी पुरवणाऱ्या कंपनीपेक्षा अधिक असल्याचा विश्वास बाळगतो. पुरामुळे नागरिकांचे जीवन आणि उपजीविका मोठ्या प्रमाणात प्रभावित झाली आहे.

इंडस टॉवर्स लिमिटेडचे सर्कल मुख्य कार्यकारी अधिकारी नीरज सिंह म्हणाले,अलीकडील पुरांच्या संकटामुळे सोलापूर आणि नांदेडम धील अनेक कुटुंबांना मोठा फटका बसला आहे. प्रभावित सर्वांप्रती आमच्या भावना व्यक्त करतो. या उपक्रमाद्वारे आम्ही योग्यवेळी मदत पोहोचवून या प्रदेशात लवकरात लवकर सामान्य स्थिती प्रस्थापित व्हावी अशी अपेक्षा आहे.

## लग्नाचा बदलता ट्रेंड
## साधेपणापासून कोटींच्या खर्चाकडे वाटचाल

आजच्या काळात लग्नसमारंभाची संकल्पना पूर्णपणे बदलली आहे. पूर्वी कुटुंबीय आणि नातेवाईकांच्या उपस्थितीत साध्या पद्धतीने, मर्यादित खर्चात लग्न पार पडत असे. गावात किंवा घराच्या अंगणात मंडप टाकून लग्नाचा विधी संपन्न करण्याची परंपरा होती. सनई-चौघड्यांच्या सुरांनी लग्नाची सुरुवात होत असे आणि साध्या भोजनाने पाहुण्यांचे स्वागत केले जात असे. मात्र गेल्या काही वर्षांत लग्नसोहळ्यांनी भव्यदिव्य रूप धारण केले असून आधुनिक, आकर्षक आणि हायटेक पद्धतीकडे मोठा कल वाढला आहे.



आता लग्न म्हणजे एक भव्य कार्यक्रम, ज्यासाठी लाखो ते कोटी रुपयांपर्यंतचा खर्च सहज केला जातो. डेस्टिनेशन वेडिंग, थीम वेडिंग, फोटोशूट लोकेशन्स, कॅन्डिड फोटोग्राफी, सिनेमॅटिक व्हिडिओज अशा नव्या संकल्पनांमुळे खर्चात मोठी भर पडली आहे. विवाहपूर्व फोटोशूट-ज्याला 'प्री-वेडिंग शूट' म्हटले जाते. याचा खर्चही कधी कधी लाखांमध्ये जातो.

पूर्वी सनई-चौघडीचे मंगल नाद ऐकू येत असत, मात्र आज ही पद्धत जवळजवळ लोप पावत आली आहे. त्याऐवजी डीजे, लाईव्ह बँड अशा आधुनिक लाईट-साऊंड तंत्रांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. वर-वधूची खास 'एन्ट्री' सुद्धा आता एक वेगळा कार्यक्रमच बनला आहे. लग्नातील सजावटही पूर्वीच्या फुलांच्या साध्या तोरणांच्या पलिकडे जाऊन थीम-बेस्ड सेटअप, क्रिस्टल डेकोरेशन, फ्लॉवर रेन, एलईडी वॉल, मल्टिमीडिया प्रेझेंटेशन अशा पद्धतीने केली जाते. डेकोरेशनचा खर्चच कधी कधी काही लाखांपर्यंत जातो. वेडिंग प्लॅनर्सची संकल्पना आजच्या पिढीत जोरदार रुजत आहे. संपूर्ण लग्नाची जबाबदारी हे व्यावसायिक हाताळतात-मेहंदी, संगीत, हळद, लग्न, रिसेप्शन यासाठी स्वतंत्र थीम ठेवली जाते. एकाच कार्यक्रमासाठी कधी कधी २० ते ३० जणांची व्यावसायिक टीम कार्यरत असते. याशिवाय लग्नानंतर दुसऱ्या दिवशी रिसेप्शन ठेवण्याचे प्रमाणही लक्षणीय वाढले आहे. रिसेप्शनसाठी वेगळे स्टेज डिझाईन, बाहेरगावचे फूड स्टॉल्स, लाईव्ह काउंटर, सेलिब्रिटी अँकर, लाईव्ह आर्टिस्ट अशा सुविधा दिल्या जातात. पाहुण्यांना खास अनुभव देण्यासाठी कुटुंबे मोठा खर्च करतात.

काळानुरूप निमंत्रण पत्रिकेतही मोठा बदल झाला आहे. साध्या पत्रिकांच्या जागी आता लाइव्ह म्युझिक कार्ड, एलईडी स्क्रीन असलेली बॉक्स कार्ड, क्रिएटिव्ह डिजिटल इन्व्हिटेशन यांचा वापर वाढला आहे. काही पत्रिका तर हजारो रुपयांपर्यंत पोहोचतात. या सगळ्या बदलांमुळे पूर्वी काही हजारांत आटोपून जाणारे लग्न आज लाखो-कोटींच्या खर्चात पार पडत आहेत. वाढता दिखाऊपणा, स्पर्धा, पाहुण्यांना वेगळा अनुभव देण्याची इच्छा आणि सोशल मीडियावरील 'इम्प्रेशन' या कारणांमुळे लग्नसोहळे आता केवळ एक विधी न राहता मोठा प्रकल्प आणि प्रतिष्ठेचा विषय बनले आहेत. एकूणच, बदलत्या जीवनमानासोबत लग्नाचे रूपही बदलले असून आधुनिकता, तंत्रज्ञान आणि आकर्षकतेच्या स्पर्धेत लग्नसमारंभ अधिक भव्य, खर्चिक आणि हायटेक होत चालले आहेत.




### मुलींच्या अपेक्षांमध्ये वाढ

**आजच्या आधुनिक युगात लग्नाविषयीची मुलींची दृष्टीकोन आणि अपेक्षा मोठ्या प्रमाणात बदलल्या आहेत. पूर्वी लग्न म्हणजे फक्त कुटुंबाची जबाबदारी आणि परंपरेचा स्वीकार असे मानले जात होते; पण आता मुली स्वतंत्र विचारसरणी, करिअर, समानतेचा हक्क आणि वैयक्तिक आनंद यांना प्राधान्य देत आहेत. आजच्या मुलींना जोडीदाराकडून फक्त आर्थिक स्थैर्य नको, तर सम जूतदारपणा, आदर, भावनिक आधार आणि परस्पर समता हवी आहे. त्या स्वतःचे निर्णय स्वतः घेऊ शकणाऱ्या, शिक्षण आणि करिअरमध्ये प्रगती करणाऱ्या आहेत; त्यामुळे त्यांना घरातील भूमिका फक्त पारंपरिक चौकटीत मर्यादित नकोय. समाजात वाढती जागरूकता, शिक्षणाची संधी आणि आर्थिक स्वावलंबन या घटकांमुळे मुलींना लग्न म्हणजे दोन व्यक्तींचे सहजीवन असा परिपक्व विचार रुजला आहे. त्यामुळेच लग्नाची कल्पना समंजस, समान आणि साथ देणारा जोडीदार यावर आधारित होत आहे.**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...

# परीक्षेतील गैरप्रकार टाळण्यासाठी दक्षता समिती

### बडया अधिकाऱ्यांची असणार नजर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षामध्ये होणारे गैरप्रकार टाळणे व सर्व परीक्षा केंद्रावरील वातावरण भयमुक्त करून विद्यार्थ्यांमध्ये गुणवत्ता वाढीसाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली 'दक्षता समितीचे' पुनर्गठण झाले आहे. यामध्ये विविध विभागातील नऊ प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश आहे. माध्यमिकचे शिक्षणाधिकारी या समितीचे सदस्य सचिव आहेत. पोलीस आयुक्त किंवा त्यांचा प्रतिनिधी, पोलीस अधिक्षक, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरणचे कार्यकारी अभियंता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचे प्रचार्य, प्राथमिक शिक्षणाधिकारी, योजना विभागाचे शिक्षणाधिकारी या समितीचे सदस्य आहेत. महाराष्ट्र राज्य, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत दरवर्षी इयत्ता १० वी व १२ वीच्या परीक्षा कॉपीमुक्त व निर्भय करण्यासाठी दक्षता समिती काम करणार आहे. दक्षता समितीने जिल्हास्तरावर इयत्ता १० वी व १२ वी परीक्षांसाठी परीक्षांचे प्रभावी आयोजनासाठी योग्य सहकार्य करावे. ज्या परीक्षा केंद्रावर कॉपीचे गैरप्रकार आढळून येताता अश्या केंद्रांना प्रत्यक्ष भेट देऊन तेथे योग्य व्यवस्था स्थापन करावी. तसेच इयत्ता १० वी व इयत्ता १२ वी परीक्षा गुणवत्तापूर्ण वातावरणात होण्यासाठी दक्षता समितीने प्रभावी उपक्रम राबवावे, अशा सूचना करण्यात आल्या आहेत.




**परीक्षेतील गैरप्रकारांना आळा बसणार**

दहावी व बारावी परीक्षा कॉपीमुक्त व गुणवत्तापूर्ण वातावरणात होण्यासाठी परीक्षा मंडळाकडून दक्षता समितीची पुर्नगठण करण्यात आली आहे. या समितीमध्ये शहर व जिल्ह्यातील प्रमुख अधिकाऱ्यांचा समावेश आहे. समितीचे सदस्य उपद्रवी केंद्रासह इतर परीक्षा केंद्रांना भेट देऊन पाहणी करणार आहेत. यामुळे परीक्षेतील गैरप्रकारांना आळा बसणार आहे.

**- सचिन जगताप,**
**शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद.**

# निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर परवानाधारकांकडील ३६ शस्त्रे जमा

### ३४५ पोलिस अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती
### ११२ जणांना तडीपार करण्याचा प्रस्ताव



**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ नोव्हेंबर-**

पंढरपूर नगरपरिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी ३४५ अधिकारी, कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. यामध्ये १५ पोलिस अधिकारी, २१० पोलिस अंमलदार, १२६ होमगार्डस्चा समावेश आहे. परवानाधारकांकडील ३६ शस्त्रे जमा करुन घेण्यात आली, अशी माहिती उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत डगळे यांनी दिली.

गुन्हेगारी पार्श्वभुमी असलेल्या ११२ जणांना तडीपार करण्याबाबतचे प्रस्ताव पाठविण्यात आले आहेत. उपविभागात विविध गुन्हे दाखल असलेल्या ९ सराईत गुन्हेगारांवर एमपीडीएअंतर्गत स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली. नाकाबंदीत संशयित वाहनांची झडाझडती घेण्यात येत आहे, असेही त्यांनी सांगितले.

मतदान केंद्रांची रचना, सीसीटीव्ही नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन, निवडणूक पूर्व व निवडणुकीनंतर ईव्हीएम मशीनच्या सुरक्षेसाठी आवश्यक सुरक्षा व्यवस्था पोलिस प्रशासनाकडून करण्यात आली आहे, असे पंढरपूर शहर पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत घोडके यांनी सांगितले.



# बोरामणी येथे शुक्रवारी हजरत पीर दावलमलिक उरुस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

बोरामणी (ता. द. सोलापूर) येथील ग्रामदैवत व हिंदू मुस्लीम समाजाचे श्रध्दास्थान म्हणून ओळख असलेल्या हजरत पीर दावलमलिक बाबा यांचा येत्या शुक्रवारी (दि. ५ डिसेंबर) रोजी ऊरुस संपन्न होत आहे.

प्रतिवर्षाप्रमाणे याहीवर्षी ऊरुस पंच समितीच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यात गुरुवार (दि. ४ डिसेंबर) रोजी रात्री ठीक ८ वा. ढोल ताशांच्या गजरात गावातून संदलची मिरवणूक निघणार आहे. तर ठीक १२. वा. संदलचे देवस्थानकडे प्रयाण होणार आहे. तर शुक्रवार (दि. ५ डिसेंबर) रोजी दिवसभर ऊरुस कार्यक्रम होत असून यावेळी भाविकांचे दर्शन व नैवद्य कार्यक्रम होणार आहे. शनिवार (दि. ६ डिसेंबर) रोजी दुपारी ठीक ४. वा. जंगी कुस्त्यांचा कार्यक्रम होणार आहे. यावेळी नामवंत मल्लांच्या कुस्त्या होणार आहेत. दर देवस्थान हे बोरामणी गावापासून चार किलोमिटर अंतरावर आहे. त्यामुळे प्रशासनाकडून



रस्त्याची डागडुजी करुन रस्ता व्यवस्थीत करण्यात आला आहे. ऊरुस दिवशी महाराष्ट्र, कर्नाटक तसेच मराठवाडा या भागातून भाविक मोठ्या प्रमाणावर दर्शनासाठी हजेरी लावतात. देवस्थान ठिकाणी बोरामणी ग्रामपंचायतीच्या वतीने भाविकांना पिण्याच्या पाण्याची सोय तसेच इतर सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तसेच दर्शनासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होत असल्याने कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी ग्रामीण पोलिसांचा बंदोबस्त ठेवण्यात आला आहे. तसेच भाविकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी म्हणून बोरामणी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वतीने सुविधा उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत. तेव्हा या उरुसचा भाविकांनी लाभ घ्यावा असे आवाहन उरुस पंच समिती व ग्रामस्तांच्या वतीने करण्यात आले आहे.

# दत्त विद्या मंदिर प्रशालेत प्रभात फेरी काढून संविधानाचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सुस्ते, दि. २९ नोव्हेंबर-**

सुस्ते येथील श्री दत्त विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयात संविधान दिन साजरा करण्यात आला.

प्रारंभी भारतीय संविधानाचे निर्माते डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या व संविधान उद्देशिका प्रतिमेचे पूजन संस्थेचे जेष्ठ संचालक अनिरुद्ध सालविठ्ठल, प्राचार्य अविनाश कटकधोंड, सरपंच विशाल कसबे यांच्या हस्ते व शिक्षक प्रतिनिधी श्रीकांत चंदनशिवे,जेष्ठ शिक्षक जैनुद्दीन शेख, देविदास चेळेकर, भारत झांबरे, महेश देशमुख, प्रथमेश गावडे, वैशाली म्हेत्रे, कांचन टकले, नागनाथ मैंदर्गी, अमोल हुंगे यांच्या प्रमुख उपस्थितीत पूजन करण्यात आले. व प्रशालेतील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांच्या समवेत विद्यार्थ्यांच्या प्रभात फेरीचे उद्घाटन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संविधान विषयी प्रशालेतील विद्यार्थ्यांची भाषणे झाली.

रॅलीची सांगता सामुदायिक संविधान उद्देशिकेच्या वाचनाने करण्यात आली. यावेळी नितीन वायदंडे, नवनाथ लोणकर, देवदत्त वाघ, प्रतिभा जावीर, गणेश पाटील, उज्वला कोळसे,




बबन कोकतरे, राहुल शिंदे, ज्युनिअर विभाग प्रमुख राजाराम घोडके, सरस्वती शिंदे, संदीप चौधरी, समाधान शेजाळ, विष्णूपंत घोगले, धनाजी देठे, अंजली बोधले, विजय पंडित, गजानन गायकवाड, सुजित मोरे, बबन पवार, बाळासाहेब बनसोडे, भीमा खंडागळे उपस्थित होते.



# १९० मुलींची मोफत हिमोग्लोबिन तपासणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२९ नोव्हेंबर-**

फॅमिली प्लॅनिंग असोसिएशन ऑफ इंडिया, सोलापूर शाखा आणि वालचंद कॉलेज ऑफ आर्ट्स अ‍ॅण्ड सायन्स यांच्या संयुक्त विद्यमाने आज मोफत हिमोग्लोबिन तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. शिबिरात १९० हून अधिक मुलींची मोफत तपासणी करण्यात आली. इयत्ता ११ वी व १२ वीतील १७ ते १९ वयोगटातील मुलींनी या शिबिरात सहभाग घेतला.

तपासणीदरम्यान ज्यांच्या हिमोग्लोबिनचे प्रमाण कमी आढळले त्या मुलींना आहारातील आवश्यक बदल, डाएट, पोषक पदार्थ, तसेच किशोरवयातील आरोग्य समस्या व त्यावरील उपाययोजना याबाबत मार्गदर्शन डॉ. कविता चंडक यांनी केले. शिबिरासाठी फॅमिली प्लॅनिंग असोसिएशनचे शाखा मॅनेजर सुगतरत्न गायकवाड, सिस्टर आशालता मस्के व लॅब टेक्निशियन प्रीती चौधरी यांनी भूमिका बजावली. समाजसेविका कल्पना गडगडे व आकाश गायकवाड यांनी तपासणी सुरळीत पार पाडण्यासाठी मेहनत घेतली. कार्यक्रमास वालचंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. संतोष कोटी, उपप्राचार्य अनुप म्हेत्रे, पर्यवेक्षक डॉ. जीवराज कस्तुरे तसेच प्राध्यापिका डॉ. विजया महाजन आणि डॉ. निशा वाघमारे उपस्थित होते. शिबिर यशस्वी करण्यासाठी विजया तडकल व शिल्पा डोळस यांनी परिश्रम घेतले.

# काझीकणबस येथे आजपासून ज्ञानेश्वरी पारायण व अखंड हरिनाम सप्ताह

**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

अक्कलकोट तालुक्यातील मौजे काझीकणबस येथे ग्रामस्थांच्या वतीने दि. ३० नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या कालावधीत श्री ज्ञानेश्वरी ग्रंथाचे पारायण व अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. दररोज काकडा, आरती, भजन, ज्ञानेश्वरी पारायण प्रवचन हरिपाठ कीर्तन व हरीजागर असे धार्मिक कार्यक्रम या कालावधीत संपन्न होणार आहेत.

हभप नितीन महाराज जगताप कीर्तनकार कवळी हिप्परगा, हभप गणेश महाराज सोनवणे लातूरकर, हभप माली महाराज जाहूरकर नांदेड, हभप तुकाराम महाराज येळवट, हभप राम महाराज चौले बीड, हभप ज्ञानेश्वर महाराज दिंडेगावकर यांचे कीर्तन व हभप बाबुराव शिंदे कुरनूर, हभप रामचंद्र महाराज कुंभार सास्तूरकर, हभप रामचंद्र नामदेव धर्मसाले काजीकणबस, हभप तुकाराम महाराज यळवट, हभप जोडभावे खुदावाडी, हभप गोपाळ महाराज कुंभार यांचे प्रवचन तसेच काल्याचे कीर्तन हभप वैभव महाराज कानेगावकर यांचे होणार असून जिल्ह्यातील शिवभजन व हरिजागर ही होणार आहे. यावेळी ग्रामस्थांनी दररोज चहा, नाष्टा व भोजनाची व्यवस्था केली असून भाविकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन पारायण समितीचे अध्यक्ष रामचंद्र गयाळे व उपाध्यक्ष दत्तात्रय धर्मसाले, हरिभजन मंडळाचे अध्यक्ष किशोर जाधव यांनी केले.

# स्वयंसेवकाची खरी ओळख : सेवाभाव

**मला समजलेला राष्ट्रीय स्वयंसेवक संघ भाग - ९**

**- डॉ. सचिन लादे, पंढरपूर**
**पुणे विभाग सहप्रचार प्रमुख रा.स्व.संघ.**
**मो.क्र.७५८८२१६५२६**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा गुरु म्हणजे भगवा ध्वज. या गुरूपासून स्वयंसेवकांनी तेज(सेवा),त्याग व तप(सातत्य) हे तीन गुण घेतले आहेत. यातील एक गुण म्हणजे सेवा. सेवाभाव हा स्वयंसेवकाचा स्थायीभाव असतो. कोणत्याही फळाची अपेक्षा न करता स्वयंस्फूर्तीने जो काम करतो तो स्वयंसेवक असा संस्कार संघाच्या शाखेतून होतो. त्यामुळे साहजिकच स्वयंसेवक कोणत्याही भेदभावाविना समाजाच्या मदतीला सतत धावून जात असतो. मग कुठे पूर येऊ देत, भूकंप होऊ देत, अपघात होऊ देत, दंगल होऊ दे अथवा सण उत्सवाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर गर्दी होऊ देत, अशा ठिकाणी स्वयंसेवक कर्तव्यभावनेने मदतीसाठी पुढे धावून जातो.

संघाच्या शाखेमध्ये जे उपक्रम घेतले जातात, खेळ घेतले जातात व ज्या चर्चा घडवून आणल्या जातात यातून स्वयंसेवकाचे मन तयार केले जाते. आपण सेवेसाठी आहोत, निरपेक्ष - निस्वार्थ भावनेने समाजाची, राष्ट्राची सेवा केली पाहिजे हा भाव स्वयंसेवकाच्या मनात होत तयार केला जातो, त्यामुळेच स्वयंसेवक अशा आपत्तीप्रसंगी कोणीही न सांगता - न बोलावता तो तत्परतेने धावून जातो. एका मान्यवरांनी परमपुजनीय सरसंघचालकांना असा प्रश्न विचारला, की संघाच्या शाखेमध्ये मृतदेह उचलण्याचे स्वयंसेवकांना प्रशिक्षण दिले जाते का? यावर परमपुजनीय सरसंघचालक म्हणाले, प्रशिक्षण दिले जात नसले तरी मृत झालेल्या व्यक्ती माझे बांधवच आहेत, त्यांच्यासाठी मला काहीतरी केले पाहिजे हा भाव मात्र आम्ही संघाच्या शाखेत निर्माण करतो. खरोखरच स्वयंसेवक आपत्तीप्रसंगी असणाऱ्या सेवा कार्यात असो अथवा देशभरात उभारल्या गेलेल्या एक लाख ऐंशी हजार प्रकल्पांमध्ये सेवा करण्याचा विषय असो या सर्व गोष्टींमध्ये स्वयंसेवक नित्य सेवाकार्य करीत असतात.

विशेषतः नाही रे वर्गासाठी, वनवासी बांधवांसाठी व शहरातील वाढणाऱ्या सेवावस्त्यांमध्ये (झोपडपट्टी) संघाचे स्वयंसेवक संस्कार, शिक्षण, आरोग्य, रोजगार, प्रबोधन या क्षेत्रामध्ये सेवाकार्य करताना दिसून येतात. एवढ्या मोठ्या प्रमाणावर देशभर चाललेल्या सेवाकार्याचा समाज व राष्ट्राला निश्चितच लाभ होत आहे म्हणूनच समाजाला व राष्ट्राला स्वयंसेवक हा आधार वाटतो. सेवाभाव हा स्वयंसेवकाची खरी ओळख आहे व सुदैवाने आजपर्यंत स्वयंसेवकांनी ती जपली आहे. समर्पणाची वृत्ती हीच संघ स्वयंसेवकाची खरी ओळख स्वयंप्रेरणेने समाज व राष्ट्राचे कार्य करण्याची वृत्ती स्वयंसेवकाकडे असायला हवी आहे, हा उद्देश संघाचे स्वयंसेवक खऱ्या अर्थाने पूर्ण करताना दिसून येत आहेत. वेळेचे समर्पण, पैशाचे समर्पण, शारीरिक व मानसिक स्तरावरचे समर्पण याचाच अर्थ तन-मन-धनपूर्वक समर्पण संघाचे स्वयंसेवक नित्य करताना दिसून येतात. संघामध्ये तुम्ही काम करत असताना कोणत्याही धन-लाभाची, पद-प्रतिष्ठेची अपेक्षा ठेवू शकत नाही, कारण संघाची कार्यपद्धती त्याप्रमाणे विकसित केलेली आहे. संघ स्वयंसेवक हे संघाला, समाजाला व राष्ट्राला आवश्यक असणारा वेळ देतात. कोणी महिन्यातून काही काळ, कोणी आठवड्यातून काही काळ, कोणी दिवसातून किमान काही काळ देण्याचा सातत्याने प्रयत्न करतात. हजारो - लाखो संघ प्रचारक म्हणविणाऱ्या स्वयंसेवकांनी आपले आयुष्यच समर्पित केले आहे, त्यांच्या त्याग व समर्पणाची तुलनाच होऊ शकत नाही. जसा वेळेचा त्याग आहे, तसाच पैशाचादेखील निरपेक्ष भावनेने स्वयंसेवक त्याग करतात. संघाला, समाजाला आवश्यक असेल तेव्हा स्वयंसेवक धनदेखील द्यायला मागे राहत नाहीत. मुळात संघ चालवण्यासाठी लागणारा पैसा स्वयंसेवकच उभा करतात. गुरुपौर्णिमेच्या दिवशी भगव्या ध्वजाला गुरु मानून त्याच्यासमोर गुरुदक्षिणेच्या रूपाने स्वयंसेवक धनाचे समर्पण करतात. देणगी अथवा वर्गणी या स्वरूपात ते धन देत नाहीत. हे धन देण्यामागे देखील समर्पणाचीच भावना आहे. संघाचे कार्यक्रम, बैठका, उत्सव, प्रशिक्षणे व स्वयंसेवकांनी उभारलेले प्रकल्प या सर्व गोष्टींसाठी स्वयंसेवकच धन देतात. समाजातून अथवा शासकीय मदतीने अशा प्रकारचे धन एकत्र केले जात नाही.

वेळेच्या व धनाच्या समर्पणापेक्षा आणखी महत्त्वपूर्ण समर्पण म्हणजे मानसिक पातळीवरचे समर्पण. अनेकदा मला ज्या गोष्टी आवडतात, त्या संघ स्वयंसेवकाला लागू होत नाहीत म्हणून त्या करायच्या नाहीत अथवा एखादी गोष्ट मला आवडत नाही तरीपण स्वयंसेवक म्हणून करणे गरजेचे असेल तर ती करणे यालाच मानसिक पातळीवरचे समर्पण म्हणतात. आपल्या आवडीनिवडी, ऐषआराम अशा सगळ्या गोष्टींना तात्विक मुरड घालत स्वयंसेवकाला संघ काम करावे लागते म्हणूनच हे मानसिक पातळीवरचे समर्पण जरी दिसून येत नसले तरी स्वयंसेवक ते करत असतात व यातूनच समाजासमोर एक शिस्तप्रिय स्वयंसेवक उभा राहत असतो. शारीरिक दृष्ट्या तो राबत असतो, कष्ट करत असतो, त्रास घेत असतो, या पद्धतीने शारीरिक पातळीवरचे समर्पण देखील तो करत असतो. अशा प्रकारची समर्पणाची वृत्ती हीच स्वयंसेवकाची खरी ओळख आहे. यामुळेच तर समाजाला, राष्ट्राला स्वयंसेवकाच्या कार्यातून आजपर्यंत अनेक गोष्टींचा लाभ झाला आहे व स्वयंसेवक आदराला पात्र ठरले आहेत.

सेवा व समर्पणातील सातत्य टिकवून ठेवणारे स्वयंसेवक राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेला १०० वर्षे पूर्ण होत आहेत. व्यक्तीनिर्माणातून राष्ट्रपुनरुत्थान व या राष्ट्राला परम वैभवाला नेण्याचे ध्येय साध्य करण्यासाठी गेल्या १०० वर्षापासून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ स्वयंसेवकांच्या बळावरच काम करत आहे. अत्यंत प्रतिकूल राजकीय व सामाजिक वातावरणात देखील स्वयंसेवकांनी अत्यंत निष्ठापूर्वक संयमाने संघाचे काम सातत्याने केले आहे. संघबंदी आली, स्वयंसेवकांना तुरुंगात जावे लागले, गैरसमजातून स्वयंसेवकांची घरे जाळली गेली, अनेकदा स्वयंसेवकांना समाजाच्या रोषाला सामोरे जावे लागले, राजकीय स्तरावरून संघ स्वयंसेवकांना सातत्याने त्रास दिला गेला, उपहासाची वागणूक मिळाली, तरीपण स्वयंसेवक खचले नाहीत, घाबरले नाहीत, आपल्या कामापासून हटले नाहीत व निष्ठा कमी होऊ दिली नाही. शंभर वर्षांचा विचार केला तर किमान चार पिढ्या अत्यंत जिद्दीने संघाचे कार्य करीत आहेत. कोणी निंदा केली म्हणून संघ स्वयंसेवकांनी काम सोडून दिले नाही व कोणी स्तुती केली म्हणून ते हुरळूनही गेले नाहीत. अनेक प्रकारच्या आपत्तींना सामोरे जात स्वयंसेवक आधी स्वतः जिद्दीने उभारला व समाज - राष्ट्राच्या कार्यासाठी त्याने स्वतःला वाहून घेतले. एखाद्या विचारासाठी एखाद्या संघटनेचे रोज काम करावयाचे, तेही निस्वार्थ - निरपेक्ष भावनेने, ही गोष्ट सोपी नाही. अशा प्रकारचे काम जगात कोणत्याही संघटना अथवा राजकीय पक्षाचेदेखील चालत नसेल. परंतु मला जसा संघ माहित झाला, तसं मी एकही दिवस संघाची शाखा बुडवली नाही असं सांगणारे या देशात लाखो स्वयंसेवक भेटतील. किती मोठं हे सातत्य म्हणावयाचे ! संघ कामात खंड पडणार नाही याचा विचार करून अनेकांनी शिक्षणाची क्षेत्रे व ठिकाणे बदलली, नोकऱ्या बदलल्या अथवा सोडल्या, व्यवसायात नुकसान होत असून देखील अनेकदा इतर व्यवस्था करून संघासाठीचा वेळ राखून ठेवला, घरातल्या शुभकार्याच्या वेळाही बदलल्या, अशा अनेक गोष्टीतून संघ स्वयंसेवकांनी कामातील सातत्य ठेवले. अनेक मोह बाजूला करून या कार्यात स्थिरपणे काम करत राहिले, म्हणूनच संघाचे काम सातत्याने वाढत गेले, लोकांना आवडायला लागले, समाज व राष्ट्राला आधार वाटावे असे ठरत गेले व यातूनच संघ स्वयंसेवकाची प्रतिमा समाजासमोर तयार झाली. सेवा व समर्पण भावनेने सातत्याने काम करणारे स्वयंसेवक खरोखरच समाजाच्या आदराला पात्र ठरले आहेत.

# वीसपेक्षा कमी पटाचे वर्ग; शिक्षकांची शुक्रवारपूर्वी समायोजन प्रक्रिया

### कमी पटाच्या शाळांवर कंत्राटी शिक्षक; टीईटी, सीटीईटी धारकांना संधी दिली जावी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

पटसंख्येनुसारच शिक्षकांची भरती होणार असल्याचे स्पष्ट संकेत न्यायालयानं दिला आहे. शिक्षकांची पद निश्चित करण्याचा अधिकार शासनाला आहे, मात्र अतिरिक्त शिक्षकांना सेवेतून कमी न करता त्यांचे जवळच्या शाळेत समायोजन करावं असे आदेशही त्यांनी दिलेत. तर १० पेक्षा कमी पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये कंत्राटी शिक्षक भरतीलाही परवानगी देत ती वैध करण्यात आली. संचमान्यतेचा १५ मार्च २०२४ चा शासन निर्णय उच्च न्यायालयाने मान्य केला आहे. त्यामुळे आता दहापेक्षा कमी पटाच्या शाळा तथा वर्गांवर प्रत्येकी एक तर २० पेक्षा कमी पटाच्या शाळांमध्ये एक कंत्राटी आणि एक नियमित शिक्षक नेमण्यात येणार आहे. त्यानुसार, राज्यातील कमी पटाच्या १८ हजार १०६ शाळा असून, त्यात सोलापूर जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या सुमारे १६५ आणि खासगी अनुदानित प्राथमिक सुमारे ५० शाळा आहेत.

१ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने ५२ वर्षे वयापर्यंतच्या शिक्षकांना दोन वर्षांत 'टीईटी' उत्तीर्ण होण्याचे आदेश दिले. २३ नोव्हेंबर रोजी झालेली टीईटी त्या शिक्षकांची पहिली संधी होती. तो निर्णय रद्द व्हावा, यासाठी शिक्षकांचे प्रयत्न सुरू असतानाच, १५ मार्च २०२४ चा संचमान्यतेचा शासन निर्णय उच्च न्यायालयाने मान्य केला आहे.

खासगी अनुदानित माध्यमिक शाळांमधील इयत्ता नववी व दहावीच्या ज्या वर्गात २० पेक्षा कमी विद्यार्थी आहेत, तेथील शिक्षकांचे दुसरीकडे समायोजन केले जात आहे. पण, माध्यमिक शाळांमधील पाचवी ते आठवीच्या वर्गावरील कमी पटाच्या वर्गांवरील शिक्षकांचे काय? यावरील निर्णय अजूनही शालेय शिक्षण विभागाने घेतला नाही. परंतु, त्या वर्गांवरील नियमित शिक्षक अतिरिक्त होणार असल्याने तेथे कंत्राटी शिक्षकच घ्यावे लागणार आहेत. सध्या शाळांच्या आकडेवारीत कंत्राटी शिक्षकांची नोंद केली जाते, ज्यामुळे कायम शिक्षकांच्या वास्तविक रिक्त पदांचा अचूक आकडा अस्पष्ट होत आहे. ही पद्धत कृत्रिमरीत्या 'शिक्षक संख्या पूर्ण आहे' असे दाखवते, आणि शिक्षक कमतरतेची समस्या लपवली जाते. कंत्राटी शिक्षकांचा समावेश म्हणजे नियमित भरती टाळण्यासाठी अप्रत्यक्ष प्रयत्न होय.

शासनाने मराठी शाळा टिकवण्यासाठी कठोर पावल उचलावे. जिल्हा परिषद शाळेची विद्यार्थ्यांची पटसंख्या कमी होत आहे. अशीच स्थिती असेल तर संचमान्यतेमध्ये शिक्षक अतिरिक्त ठरू शकतील. त्यामुळे शिक्षकांच्या नोकरीवर टांगती तलवार येऊ शकते. त्यामुळे विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढवणे गरजेचे आहे. एक ते पाच पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याचा निर्णय दुर्दैवी आहे. राज्यातील कमी पटसंखा शाळेत कंत्राटी भरती झाली तर टिईटी उत्तीर्ण उमेदवारांना संधी द्यावी .

**- प्रशांत शिरगुर,** राज्य उपाध्यक्ष, पवित्र पोर्टल शिक्षक भरती संघटना.

**झेडपी शाळांची स्थिती**

एकूण शाळा: २,७७५
दहापेक्षा कमी पटाच्या शाळा: ५३
२० पेक्षा कमी पटाच्या शाळा: ११२
कंत्राटी शिक्षकांची भरती : १६५
आरटीई ॲक्ट २००९ नुसार

CMYK

# आपला जिल्हा

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## सामाजिक कार्यकर्त्या सोनाली सगर यांचा शिवसेनेत प्रवेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

सामाजिक कार्यकर्त्या सोनाली सगर यांनी जिल्हाप्रमुख अमोल शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेना पक्षात प्रवेश केला, अमोल शिंदे यांनी त्यांचे स्वागत केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विचारांना प्रेरित होऊन शिवसेना पक्षात प्रवेश केला.




येणाऱ्या काळात शिवसेना पक्ष वाढविसाठी, गोर गरीब नागरिकांच्या समस्या सोडविण्याचा प्रयत्न व पक्षाची ताकद वाढविण्याचा प्रयत्न मी करेन असा विश्वास सोनाली सगर यांनी व्यक्त केला. याप्रसंगी उपजिल्हाप्रमुख अक्षय बिद्री, तालुका प्रमुख राजकुमार शिंदे, वैद्यकीय महिला जिल्हाप्रमुख अरुणा बेंजरपे, वाहतूक सेना विजय गरड, शशिकांत शिंदे, कुमार धुमाळ, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.



## नगरपरिषद निवडणूक प्रचारादरम्यान दगडफेक



### अशा घटनांना घाबरणार नाही : शितलदेवी मोहिते-पाटील

**तभा वृत्तसेवा,**
**अकलूज, दि.२९ नोव्हेंबर-**

अकलूज नगरपरिषदेच्या निवडणूक प्रचारास दिवसागणिक जोर वाढत आहे. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथे आयोजित केलेल्या प्रचार सभाप्रसंगी अज्ञात इसमाने दगडफेक केल्याची घटना घडली.

या दगडफेकबाबत बोलताना शितलदेवी मोहिते-पाटील म्हणाल्या, सावित्रीबाई फुले, रमामाता यांसारख्यांनी अशा घटनांना घाबरल्या नाहीत. आम्ही सावित्रीच्या लेकी आहोत. त्यामुळे अशा घटनांना अजिबात घाबरणार नाही. अकलूज नगर परिषद निवडणुकीच्या प्रचारादरम्यान आंबेडकर चौक येथे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाची सभा सुरु असताना रात्री ९ वाजण्याच्या सुमारास अज्ञात इसमाने दगडफेक केली. यात महिला जखमी झाल्या. तेवढ्यात सभास्थळावरील बत्तीही गुल झाली. तेव्हा, शितलदेवी मोहिते-पाटील यांनी मोबाईल टॉर्चच्या प्रकाशात भाषण करताना म्हणाल्या, अकलूज हे सुरक्षित व शांत गाव आहे. परंतु विरोधकांनी दहशत माजवायला सुरुवात केली आहे. शिवतेजसिंह मोहिते-पाटील याप्रसंगी बोलताना म्हणाले, अकलूज गावासाठी चार वर्षे प्रशासक होते.

तरीही आपण ६०० कोट रुपयांचा विकास निधी नेत्यांच्या माध्यमातून आणला आहे. जवळपास ४५ दिवस उपोषण करुन आपण हे नगरपरिषद मिळवली आहे. या नगरपरिषदेची प्रथमच निवडणूक होत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गट व शिवसेना उबाठाच्या उमेदवारास प्रचंड मताने विजयी करावे. यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार रेश्मा अडगळे व नगरसेवक पदाचे उमेदवार, कार्यकर्ते उपस्थित होते.

## वाहनांतील कर्णकर्कश गाणी; नागरिक त्रस्त

- उसाच्या मोळ्या पडल्याचेही कळत नाही
- शेतकऱ्यांचेही होतेय नुकसान

**तभा वृत्तसेवा,**
**पिलीव दि.२९ नोव्हेंबर-**

पिलीवसह माळशिरस तालुक्यातील विविध साखर कारखान्यांकडे ऊस वाहतूक करणारे वाहनचालक मोठमोठ्या आवाजात गाणी लावत वाहन दामटत आहेत. कर्णकर्कश आवाजातील या गाण्यांमुळे नागरिक संत्रस्त होत असल्याचा प्रकार सर्रास दिसून येत आहे.

सध्या सर्व कारखान्यांकडील गाळप सुरु आहे. त्याअनुषंगाने साखर कारखान्यांना ट्रॅक्टर वा अन्य वाहनांद्वारे ऊस वाहतूक करण्यात येत आहे. मात्र, कर्णकर्णश आवाजात गाणी लावून ही वाहने दामटण्यात येत आहे. विद्यार्थी, रुग्ण, वृध्द यांच्यासह नागरिकांना याचा असह्य त्रास होत आहे. विशेष म्हणजे, मोठ्या आवाजातील गाण्यांमुळे वाहन चालविताना उसाच्या मोळ्या पडल्याचेही ट्रॅक्टर चालकास कळत नाही. यामुळे शेतकऱ्यांचे नुकसान होत आहे. मर्यादेपेक्षा जास्त ऊस भरल्यामुळे ट्रॉली पलटी होत असल्याचे प्रकारही घडत आहेत.



पिलीव येथील बचेरी चौकातून ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर-ट्रॉल्या दिसत आहेत.

शाळा, दवाखाने परिसरात कर्णकर्कश आवाजातील गाणी आणि अति वेगात दामटत नेणाऱ्या या वाहनांमुळे लहान-मोठे अपघात झालेले-होत आहेत. मात्र, याकडे पोलिस प्रशासन, साखर कारखाने, आरटीओ कार्यालय यापैकी कोणाचेही लक्ष नसल्याचे दिसून येत आहे.

### वाहनचालकांना शिस्त कोण लावणार?

दहावी व बारावीच्या परीक्षा काही दिवसांवर येऊन ठेपल्या आहेत. या आवाजाचा विद्यार्थ्यांच्या अभ्यासावर परिणाम होत आहे. त्यामुळे कर्णकर्कश आवाजातील वाहन दामटत नेणाऱ्या चालकांना शिस्त कोण लावणार? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित केला जात आहे.

## मतमोजणी केंद्राच्या २०० मिटर परिसरात निर्बंध

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २९ नोव्हेंबर-**

जिल्ह्यातील ११ नगरपालिका निवडणुकीसाठी २ डिसेंबर रोजी मतदान घेण्यात येणार आहे. त्यानंतर ३ डिसेंबर रोजी लगेच मतमोजणी व निकाल जाहीर करण्यात येणार आहे. मतमोजणीच्या दिवशी मतमोजणी केंद्राच्या दोनशे मीटर परिसरात जिल्हाधिकारी कुमार आशिर्वाद यांनी निर्बंध लागू केले आहेत. दरम्यान, यादिवशी कडक पोलिस बंदोबस्त ठेवण्यात येणार आहे.

मतमोजणी केंद्रात निवडणूक कर्मचारी, उमेदवार, त्यांचे प्रतिनिधी, ठेकेदार यांच्याशिवाय अन्य कोणालाही प्रवेश बंदी करण्यात आली आहे. दोनशे मीटर परिसरात कोणतेही वाहन आणण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. याशिवाय मतमोजणी केंद्रात मोबाईल फोन किंवा इलेक्ट्रॉनिक्स वस्तू वापरण्यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत. मतमोजणी केंद्राच्या परिसरात घोषणाबाजी करणे, मिरवणूक काढणे, गुलाल उधळणे व डिजीटल फलक लावण्यावरही निर्बंध घालण्यात आले आहेत.






वाहनांच्या पुंगळ्या काढून आवाज करण्याचा प्रयत्न झाला तर त्यावरही कारवाई करण्यात येणार आहे. बार्शी नगरपालिकेच्या निवडणुकीची मतमोजणी येथील उपळाई रोडवरील शासकीय गोदामात, पंढरपूर: शासकीय धान्य गोदामात, अक्कलकोट : प्रियदर्शनी मंगल कार्यालयात, अकलूज: व्यायाम शाळा क्रीडासंकुलात, सांगोला: राजमाता अहिल्यादेवी होळकर सांस्कृतिक सभागृहात, करमाळा: यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाच्या सांस्कृतिक भवनात, कुर्डूवाडी: वखार महामंडळाच्या गोदामात, मंगळवेढा: शासकीय धान्य गोदामात, मोहोळ धान्य गोदामात, दुधनी: नगरपरिषद सभागृहात तर मैंदर्गी नगरपरिषदेच्या निवडणुकीची मतमोजणी येथील नगरपरिषदेत होणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

## बार्शीत १ लाख ९ हजार मतदार बजावणार मतदानाचा अधिकार

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २९ नोव्हेंबर-**

२१ प्रभागांसाठी एकूण ११२ मतदान केंद्रांची निश्चिती पूर्ण झाली आहे. या निवडणुकीत एकूण १ लाख ९ हजार १२ जण मतदानाचा हक्क बजावणार आहेत, अशी माहिती सहा. निवडणूक निर्णय अधिकारी तैमुर मुलाणी यांनी दिली.

प्रभागनिहाय मतदारांची आणि केंद्रांची संख्या याप्रमाणे; प्रभाग १ (५,१४९ मतदार)-५ केंद्र, प्रभाग २ (३,९२६ मतदार)- ४ केंद्र, प्रभाग ३ (४,९६७ मतदार)-५ केंद्र, प्रभाग ४ (४,७७४ मतदार)-५ केंद्र, प्रभाग ५ (३,८७० मतदार)-४ केंद्र, प्रभाग ६ (६,३२७ मतदार)-६ केंद्र. प्रभाग ७ (५,०६१ मतदार)-५ केंद्र, प्रभाग प्रभाग ८ (५,५९८ मतदार)-६ केंद्र, प्रभाग २ (४,६३८ मतदार)-५ केंद्र, प्रभाग १० (४,९५५ मतदार)-५ केंद्र, प्रभाग ११ (६,५५३ मतदार)-७ केंद्र, प्रभाग १२ (४,६९० मतदार)-५ केंद्र, प्रभाग १३ (६, १७८ मतदार)- ६ केंद्र. प्रभाग १४ (५,२३३ मतदार)-५ केंद्र, प्रभाग १५ (५,५२१ मतदार)- ६ केंद्र, प्रभाग १६ (५,२८१ मतदार)- ५ केंद्र, प्रभाग प्रभाग १७ (५,३१२ मतदार)-६ केंद्र, प्रभाग १८ (४,६९४ मतदार)-५ केंद्र, प्रभाग १९ (५,७१३ मतदार)-६ केंद्र, प्रभाग २० (६,१४६)-६ केंद्र, प्रभाग २१ (४,४२१)-५ केंद्र.

## महत्त्वाचे



### विविध गुन्ह्यात जप्त केलेल्या ४४ मोटरसायकली मूळ मालकांना परत

**मंगळवेढा दि.२९ नोव्हेंबर**

कोरोना कालावधीत व अन्य विविध गुन्ह्यात मंगळवेढा पोलिस ठाण्याच्या वतीने करण्यात आलेल्या कारवाईतील ४४ मोटरसायकली मूळ मालकांचा शोध घेवून परत करण्यात आले. दरम्यान, मागील दोन महिन्यापुर्वी ५० मोटरसायकलच्या मालकांचा शोध घेवून त्यांना त्या परत करण्यात आल्या होत्या. कोरोना कालावधीत रस्त्यावर फिरण्यास बंदी घालण्यात आली होती. या दरम्यानही काही मोटरसायकलस्वार निर्भिडपणे रस्त्यावर फिरत असताना पोलिसांनी त्यांच्या गाडया जप्त करून पोलिस स्टेशनच्या आवारात आणून लावल्या होत्या. इतर अन्य गुन्हयातील मोटारसायकलीही जप्त करण्यात आल्या होत्या. परिणामी पोलिस स्टेशनचे आवार मोटर सायकलीमुळे खचाखच भरल्याचे चित्र होते. कोल्हापूर परिक्षेत्राचे आयजी सुनील फुलारी, पोलिस अधिक्षक अतुल कुलकर्णी यांच्या सल्ल्याने डीवायएसपी डॉ.बसवराज शिवपुजे, पोलिस निरीक्षक दत्तात्रय बोरीगिड्डे आदींनी संबंधितांचा शोध घेवून ज्यांच्या त्यांच्या मोटरसायकली परत दिल्या. मोटरसायकल घेताना संबंधित मालकांच्या चेहऱ्यावर समाधानाचे भाव होते.

### स्वतःच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी मोटरसायकलस्वाराविरुध्द गुन्हा दाखल

**मंगळवेढा दि.२९ नोव्हेंबर**

**बठाण-मंगळवेढा रस्त्यावरील अपघात प्रकरण**

बठाण-मंगळवेढा मार्गावर भरधाव वेगात मोटरसायकल चालवून ट्रॅक्टरला पाठीमागून ठोकर मारून गंभीर जखमी होवून स्वतःच्या मृत्युस कारणीभूत होवून पाठीमागे बसलेल्या मुलीला गंभीर जखमी केल्याप्रकरणी मयत पुरुषोत्तम संभाजी शिंदे (वय २४, रा.बठाण) याच्या विरूध्द मंगळवेढा पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे. यातील फिर्यादी सानिया जब्बार नदाफ (रा.डोणज) हिचे वडील जब्बार नदाफ हे बठाण येथे सालगडी म्हणून कामास असताना मयत पुरुषोत्तम शिंदे यांची ओळख झाली होती. या ओळखीचे रुपांतर मैत्रीमध्ये झाले. दि.११ नोव्हेंबर २०२५ रोजी पुरुषोत्तम शिंदे यानी नवीन स्प्लेंडर मोटर सायकल खरेदी केली होती. या मोटरसायकलवरुन फिर्यादी व मयत हे अधूनमधून फिरण्यासाठी जात असत. दि.२३ नोव्हेंबर २०२५ रोजी बठाण येथून या मोटरसायकलवर बसून मंगळवेढयाकडे येत असताना सायंकाळी ६.०० वाजण्याच्या सुमारास दामाजी कारखान्याच्या पुढे एक कि.मी. अंतरावर आले असता मंगळवेढाच्या दिशेने ट्रॅक्टर जात होता. मोटरसायकलचा वेग जास्त असल्याने पुरुषोत्तम शिंदे यांचा मोटरसायकलवरील ताबा सुटून ट्रॅक्टरला पाठीमागून ठोकर मारून अपघात केला. सदर अपघातात पुरुषोत्तम शिंदे हा गंभीर जखमी झाला. त्याला प्रथम मंगळवेढा ग्रामीण रुग्णालयात तदनंतर सोलापूर सिव्हील हॉस्पीटल येथे उपचारासाठी नेले. उपचार सुरु असताना तो मयत झाला. या अपघातात फिर्यादीलाही कमरेजवळ तसेच कपाळ व डोळयाला दुखापत झाल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे.




## विरोधक केवळ स्वार्थासाठी निवडणुकीत : परिचारक

### नगराध्यक्षपद आरक्षित असते तर हे दिसलेच नसते

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. २९ नोव्हेंबर -**

पंढरपूर नगरपालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महात्मा फुले चौक येथे भाजप आणि शहर विकास आघाडीच्या वतीने नुकतीच कॉर्नर सभा आयोजित करण्यात आली होती. या प्रचारसभेत माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी विरोधकांच्या स्वार्थी तसेच जातीय राजकारणावर कठोर शब्दात टीका केली.

यावेळी व्यासपीठावर प्रभाग क्रमांक १७ मधील उमेदवार शंकर सूरवसे, गुरु दोडिया, संजय निंबाळकर, सुजित सर्वगौड आदी मान्यवर उपस्थित होते. परिचारक म्हणाले, परवा नगरपालिकेत गोंधळ घातला, प्राथमिक गोष्टी माहित नसल्याने गोची झाली आणि दोष इतरांना देण्यात येत होता. येथील नगराध्यक्षपद ओबीसी किंवा एससी साठी आरक्षित झाले असते तर हे विरोधक पंढरपूरकडे फिरकले देखील नसते. केवळ सर्वसामान्य महिलासाठी नगराध्यक्षपद गेल्याने स्वार्थ साधण्यासाठी नगरपालिका निवडणूक लढवत आहेत.

एकदा निवडणूक झाली की पुन्हा नॉट रिचेबल, मिस्टर इंडिया होणार, आम्ही काय पैशासाठी राजकारण करत नाही, राजकारण हा आमचा धंदा नाही. याबरोबरच त्यांनी विरोधकांकडून होत असलेल्या अपप्रचारावर खरमरीत टीका केली. पंढरपूरच्या विकासासाठी नागरिकांचे पाठबळ असणं आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

#### भविष्यात पंढरीत भाविकांची वर्दळ वाढणार

भविष्यात पंढरीत मोठ्या प्रमाणात भाविक येणार असून रस्ते, पार्किंग, पाणी, राहण्याची उत्तम व्यवस्था दिली पाहिजे. सुदैवानं केंद्रात आणि राज्यात आपले सरकार आहे हे सरकार अजून चार वर्षे आहे. त्यामुळे निधी कमी पडणार नाही.

## प्रभाग पाचमध्ये राष्ट्रवादी काँग्रेस, शिवसेना उबाठात सरळ लढत

### कुर्डुवाडीत चौधरी एकवटले; जातीचे समीकरण प्रभावी ठरणार

**तभा वृत्तसेवा,**
**कुर्डूवाडी, दि.२९ नोव्हेंबर-**

कुर्डूवाडी नगरपालिका निवडणूकीत प्रभाग पाच अ मध्ये मंजुश्री उगाडे व शिवसेना उबाठा पक्षाच्या अबोली चौधरी तर प्रभाग ब मध्ये माजी उपनगराध्यक्ष शब्बीरभाई सय्यद यांचे पुत्र ईस्माईल सय्यद शिवसेनेकडून तर राष्ट्रवादी काँग्रेसकडून भाग्यश्री पाटील लढत आहेत.

२० वर्षे माजी आ.संजयमामा शिंदे यांचे कट्टर समर्थक शिवाजी चौधरी व संभाजी चौधरी हे राष्ट्रवादी काँग्रेसकडून तिकीट नाकारल्याने शिवसेनेत प्रवेश करते झाले. साहजिकच त्यांना मानणारे सर्व चौधरी शिवसेनेच्या बाजूने एकवटल्याने प्रभागात शिवसेनेची बाजू भक्कम मानली जात आहे. सुरवातीस एकतर्फी वाटणारी लढत चौधरींच्या शिवसेना प्रवेशामुळे सरळ-सरळ राष्ट्रवादी काँग्रेस व शिवसेना (उबाठा) यांच्यात अटीतटीची होणार असल्याचे दिसते. प्रभाग पाच अ हा महिलांचा इतर मागास प्रवर्गासाठी तर ब हा सर्वसाधारण पुरूषासाठी राखीव आहे. या प्रभागातील मतदारसंख्या २ हजार २०० असून यामध्ये मराठा ६५०, इतर मागास १०००, मुस्लिम २०० तर इतरमध्ये अंदाजे ४०० इतके मतदार आहेत. आजपर्यंत प्रत्येक निवडणूकीत अंदाजे ७५ ते ८० टक्के मतदान होत आले आहे. उपनगराध्यक्ष शब्बीर सय्यद यांच्यानंतर २५ वर्षानी शिवसेना जिल्हाध्यक्ष धनंजय डिकोळे यांनी ईस्माईल सय्यद यांना राष्ट्रवादी काँग्रेसने तिकीट नाकारताच शिवसेनेत ओढत पाच ब मधून तिकीट जाहीर केल्याने मुस्लिम वर्गाची सहानभूती मिळवण्यात त्यांनी यश मिळाले आहे. संजयमामा शिंदे यांच्या यशवंत मोटार वाहतूक संस्थेचे चेअरमन राहीलेले जावेद सय्यद, संभाजी चौधरी व शिवाजी चौधरी यांना या अगोदरच्या निवडणूकांचा अनुभव असल्याने याचा फायदा होण्याची शक्यता असल्याचे दीसते.






त्यांच्या विरोधात राष्ट्रवादी काँग्रेस कडून संजयमामांचे कट्टर समर्थक मानले जाणारे श्रीकांत पाटील यांच्या पत्नी भाग्यश्री पाटील या निवडणूक रिंगणात आहेत. शिवजयंतीच्या माध्यमातून पाटील यांचेही सामाजीक काम असल्याने त्यांनाही मानणारा वर्ग येथे आहे. प्रभाग पाच अ मध्ये सागर चौधरी यांच्या मातोश्री या विद्यमान नगरसेवक होत्या. शिवसेनेने यावेळी अबोली चौधरी यांना उमेदवारी दिली आहे. रस्ते, गटार, पाणी व्यवस्थापन, पथदीवे, सार्वजनिक शौचालये यावर विद्यमान नगरसेविका यांचे उत्तम काम असल्याचे मानले जाते. एका सामान्य वर्गातून आलेल्या अबोली चौधरी या उद्योगपती असलेले अनिल उगाडे यांच्या पत्नी मंजुश्री उगाडे यांच्या विरोधात निवडणूक रिंगणात असल्याने यांच्यातील लढत धनशक्ती विरूध्द जनशक्तीची मानली जात आहे.

जातीचे समिकरण पाहता याठीकाणी ओबीसी व मराठा समाज मोठ्या प्रमाणावर आहे. मराठा समाज श्रीकांत पाटील यांच्यासाठी तर अबोली चौधरी या ओबीसी असल्याने मराठा समाजाबरोबर ओबीसी फॅक्टरही प्रभावी ठरणार आहे यात शंका नाही.

## जादा परताव्याचे आमिष; परिचारिकेला ४ लाख ८० हजारांचा गंडा

### चार जणांविरुध्द गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि.२९ नोव्हेंबर-**

जादा परताव्याचे आमिष दाखवून एका परिचारिकेला ४ लाख ८० हजार रुपयाला गंडा घातल्याप्रकरणी चार जणांविरुध्द बार्शी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

सुनील नवनाथ वायचळ, गणेश नवनाथ वायचळ, सुयोग गणेश वायचळ व सौरभ गणेश वायचळ असे गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. बार्शी शहरातील सुश्रुत हॉस्पीटलमध्ये नर्स अर्थात परिचारिका म्हणून कार्यरत असलेल्या रुक्साना इमरान डिग्रजे (वय-३६, रा.वाणी प्लॉट, बार्शी) यांनी याबाबत दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आपण हिरेमठ हॉस्पीटल येथे परिचारिका म्हणून कामावर असताना वायचळ कुटुंबीयांशी विश्वासाचे संबंध निर्माण झाले. भाजी मार्केट परिसरात तुझ्या फायद्याचे काम आहे, आमच्या घरी ये, असे सांगून सुनील वायचळ यांनी



दि.२५ सप्टेंबर २०२४ रोजी मला त्यांच्या घरी बोलावून घेतले. तेथे उपस्थित सर्व संशयितांनी 'If Globel Compan' नावाची ट्रेडिंग कंपनी १० टक्के परतावा देते, असे सांगून गुंतवणुकीचा प्रस्ताव ठेवला. अनेक लोकांना याचा फायदा झाल्याचे त्यांच्याकडील लॅपटॉपवर दाखविले. जरी कंपनी बुडाली तरी पैशांची जबाबदारी स्वतः घेऊ, असा विश्वासही सुनील वायचळ यांनी दिला. त्यांच्या या आमिषाला बळी पडून भगवंत सहकारी बँकेतून मी कर्ज घेतले. त्यांनी माझ्याकडून फॉर्म भरुन घेतले.

दि.२३ ऑक्टोंबर २०२४ रोजी एक लाख रुपये, दि.५ नोव्हेंबर २०२४ रोजी २ लाख ८० हजार रुपये तर १६ डिसेंबर २०२४ रोजी एक लाख रुपये असे एकूण ४ लाख ८० हजार रुपये त्यांच्या ४०९००२१६२७७६ या खात्यावर वर्ग करुन घेतली. ही गुंतवणूक केल्यानंतर डिमॅट खातेही उघडून दिले गेले नाही.

दरम्यान, काही दिवसांनी १ लाख ५० हजार रुपये परतावा देण्यात आला. मात्र त्यानंतर पैसे देणे बंद केले. याबाबत सतत विचारणा केल्यावर पैसे देणार नाही, पोलिसांकडे गेलीस तरी उपयोग नाही असे म्हणत धमक्या दिल्या. उर्वरित ३ लाख ३० हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली, असे फिर्यादीत नमूद आहे.